


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, ■ सोमवार १६ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




# पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले!

## प. बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान

## सर्व राज्यांमध्ये मतमोजणी ४ मे रोजी




## आजपासून आचारसंहिता लागू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-: पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम या चार राज्यांसह पुदुचेरी केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांची घोषणा आज (दि. १५) निवडणूक आयोगाने केली. आसाम, केरळम, पुदुच्चेरी येथे ९ एप्रिल २०२६ रोजी मतदान होईल. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे. तर पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक दोन टप्प्यांमध्ये होणार असून, येथे २३ एप्रिल आणि २९ एप्रिल २०२६ रोजी मतदान होईल. पाचही राज्यांमधील मतमोजणी ४ मे २०२६ रोजी होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

### पश्चिम बंगाल (मतदारसंघ २९४)

पाश्चिम बंगालमध्ये निवडणूक दोन टप्प्यांत पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात (१५२ जागा) ३० मार्चला आधिसूचना येईल, ६ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील आणि २३ एप्रिलला मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात (१४२ जागा) २ एप्रिलला अधिसूचना निघेल, ९ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील आणि २९ एप्रिलला मतदान होईल. दोन्ही टप्प्यांसाठी अर्जांची छाननी अनुक्रमे ७ आणि १० एप्रिलला होईल, तर निकाल ४ मे रोजी एकत्रितपणे जाहीर केला जाईल.

### आसाम (मतदारसंघ : १२६)

आसाममधील विधानसभा निवडणुकीची अधिसूचना १६ मार्च रोजी जाहीर होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २३ मार्च असून, २४ मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. अर्ज मागे घेण्यासाठी २६ मार्च पर्यंत मुदत असेल.

### केरळम (मतदारसंघ : १४०)

केरळम विधानसभेसाठी निवडणूक प्रक्रिया १६ मार्च रोजी अधिसूचनेने सुरू होईल. नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख २३ मार्च असून छाननी प्रक्रिया २४ मार्च रोजी पार पडेल. उमेदवारांना आपले नाव २६ मार्च पर्यंत मागे घेता येईल.

### तमिळनाडू (मतदारसंघ : २३४)

तमिळनाडूमध्ये निवडणूक अधिसूचना ३० मार्च रोजी प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ६ एप्रिल पर्यंत वेळ असेल आणि ७ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल. अर्ज मागे घेण्याची मुदत ९ एप्रिल पर्यंत आहे.

### पुदुचेरी (मतदारसंघः ३०)

पुदुचेरी केंद्रशासित प्रदेशासाठी १६ मार्च रोजी अधिसूचना काढली जाईल. इच्छुकांना २३ मार्च पर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. त्यानंतर २४ मार्च रोजी अर्जांची तपासणी होईल आणि २६ मार्च पर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**निवडणूक भारताच्या समृद्ध संस्कृतीचा उत्सव**

आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, या निवडणुका म्हणजे केवळ लोकशाहीची प्रक्रिया नसून, भारताच्या समृद्ध संस्कृतीचा उत्सव आहे. तो आपल्या देशातील 'विविधतेतील एकता' खऱ्या अर्थाने अधोरेखित करतात. आसाम, केरळम, पुदुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये १०० वर्षांहून अधिक वयाचे (शतायुषी) आणि ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या लक्षणीय आहे. निवडणुकीसाठी एकूण २.१८ लाख मतदान केंद्रे उभारली जातील. प्रत्येक केंद्रावर सरासरी ७५० ते ८५० मतदार असतील. सर्व राज्यांत 'आदर्श मतदान केंद्रे' उभारली जातील. काही केंद्रे पूर्णपणे महिलांद्वारे, तर काही दिव्यांग बांधवांद्वारे चालवली जातील; तसेच सर्व मतदान केंद्रांवर १००% वेबकास्टिंग (थेट प्रक्षेपण) करण्याची सोय असेल, (पान २ वर)

### पश्चिम बंगालमध्ये भाजपविरुद्ध ममता बॅनर्जींचा सामना

२९४ विधानसभा मतदारसंघ असणारे पशचिम बंगाल राज्य सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानले जात असून, तिथे केंद्रीय सुरक्षा दलाच्या सुमारे ४८० कंपन्या आधीच तैनात करण्यात आल्या आहेत. आयोगाने स्पष्ट केले आहे की, केंद्रीय दलांच्या तैनातीचा निर्णय आता जिल्हा पोलीस प्रमुखांऐवजी आयोगाद्वारे नियुक्त केलेले पोलीस निरीक्षक जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून घेतील. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा सत्ता राखण्याच्या तयारीत आहेत, तर विरोधी पक्ष भाजप सत्तापालट करण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरला आहे. येथील निवडणुका 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एंईं) नंतर होत आहेत, जो मुद्दा राजकीय वादाचा आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेला विषय ठरला होता.

### पाच राज्यांमध्ये १७. ४ कोटी मतदार, ८२४ विधानसभा मतदारसंघ

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, आसाम, केरळम, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरी या राज्यांमध्ये एकूण १७.४ कोटी मतदार आणि ८२४ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे २.१९ लाख मतदान केंद्रे तयार करण्यात आली असून साधारण २५ लाख कर्मचारी निवडणूक कामात तैनात केले जातील. साम विधानसभेची मुदत २० मे, केरळची २३ मे, पुदुचेरीची १५ जून, तामिळनाडूची १० मे आणि पश्चिम बंगाल विधानसभेची मुदत ७ मे रोजी संपत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतदारांच्या संख्येचा आढावा देताना सांगितले की, अंतिम यादीनुसार आसाममध्ये सुमारे २.२५ कोटी, केरळममध्ये २.७ कोटी, पुदुचेरीमध्ये ९.४४ लाख आणि तामिळनाडूमध्ये ५.६७ कोटी मतदार आहेत; तसेच २८ फेब्रुवारीच्या अंतिम यादीनुसार पश्चिम बंगालमध्ये ६.४४ कोटी मतदार असून, माननीय न्यायाधीशांच्या निर्णयानुसार जी काही अतिरिक्त (पुरवणी) यादी येईल, ती यामध्ये नंतर समाविष्ट केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## राज्यसभा निवडणुकीपूर्वी घोडेबाजार!

## काँग्रेस आमदारांना 'ब्लँक चेक'ची ऑफर; २ संशयित ताब्यात



**ओडिशा/वृत्तसंस्था-** राज्यसभा निवडणुकीच्या तोंडावर देशाच्या राजकारणात घोडेबाजाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ओडिशातील काँग्रेस आमदारांना फोडण्यासाठी बंगळुरू येथील एका रिसॉर्टमध्ये शिरून त्यांना कोट्यवधी रुपयांची लाच आणि चक्क ब्लँक चेक ऑफर केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**नेमकं प्रकरण काय?-** १६ मार्च रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीत क्रॉस वोटिंग टाळण्यासाठी ओडिशामधील ९ पैकी ८ काँग्रेस आमदारांना बंगळुरूजवळील बिदादी येथील वंडरला रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले आहे. मात्र, रविवारी ओडिशातीलच चार अज्ञात व्यक्तींनी या रिसॉर्टमध्ये (पान २ वर)

## पुण्यात मेट्रोचे २०० किलोमीटर जाळे उभारणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे/प्रतिनिधी :** पुणे हे देशातील अत्यंत वेगाने वाढणारे शहर असून, येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. भविष्यात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्रात एकूण २०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे उभारण्याचा आमचा मानस आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुण्यातील 'मेट्रो भवन'च्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, बापू पठारे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रोचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. शिवाजीनगर ते हिंजवडी हा मार्ग लवकरच प्रवाशांच्या सेवेत येईल, ज्यामुळे पुणेकरांचा मोठा प्रवास सुखकर होईल. हा मार्ग सुरू झाल्यानंतर शहरात (पान २ वर)

## बारामती व राहुरीची पोटनिवडणूक जाहीर, निवडणूक आयोगाकडून घोषणा!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज सांयकाळी पत्रकार परिषद घेऊन पश्चीम बंगाल, आसाम या तामिळनाडू व केरळ या राज्यांतील निवडणूकीची घोषणा आज त्यांनी केली. याबरोबरच महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटका, नागालँड, त्रिपूरा, या राज्यांतील पोटनिवडणूकांची देखील घोषणा करण्यात आली.

यापैकी गोवा, कर्नाटक, नागलँड, व त्रिपूरा या राज्यातील पोटनिवडणूकीसाठी ९ एप्रिलला मदतान होईल तर महाराष्ट्र व गुजरातमधील पोटनिवडणूकीसाठी २३ एप्रिलला मतदान हाईल

**अजित पवार यांच्या बारामती मतदारसंघात पोटनिवडणूक**

महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदार संघाची पोट निवडणूक जाहीर केली आहे. महाराष्ट्राचे तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार याचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यामुळे त्यांचा मतदारसंघ असलेल्या बारामती विधानसभेची जागा रिक्त आहे. तसचे नगर मधील राहूरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कार्डिले यांचे निधन झाल्याने तिही जागा रिक्त आहे. या दोन जागांवरील पोटनिवडणूकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होईल व ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे.

**शिवाजी राव कार्डीले यांच्या निधनाने राहूरीची जाग रिक्त** -अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी (पान २ वर)


### दृश्यम' स्टाईलनं पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

## ५० लाखांच्या व्यवहारातून निवृत्त प्राध्यापकाला गोळी घालून संपवले! तिघांना अटक




**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये आर्थिक व्यवहारातून सेवानिवृत्त प्राध्यापकाची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे आरोपींनी खून केल्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी अक्षरशः 'दृश्यम' चित्रपटासारखा बनाव रचल्याचे तपासात समोर आले आहे. या घटनेतील मयत राजाराम उत्तम लोंढे हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. (पान २ वर)

## गॅसटंचाईचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील खानावळींवर परिणाम



**पुणे/प्रतिनिधी :** विद्यापीठात गॅसटंचाईमुळे फूडमॉल तसेच अनेक खानावळी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. तर, विद्यापीठाच्या कुलसचिवांनी पत्र काढत गॅसपुरवठ्याबाबत निश्चिंत राहण्याचे आवाहन केले आहे. दुसरीकडे, विद्यार्थी संघटनांनी मात्र विद्यापीठाने काय उपाययोजना केल्या असा प्रश्न उपस्थित केला आहे.

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतात सीएनजी आणि एलपीजीचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. घरगुती वापरासाठी पीएनजी पुरवठा टिकवून ठेवण्याची काळजी म्हणून सरकारने औद्योगिक क्षेत्राला गॅसपुरवठा कमी केला आहे. संबंधित सर्व परिस्थितीचा विपरीत परिणाम जवळपास ५ हजार रहिवासी विद्यार्थी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील खानावळी व उपाहारगृहांवर झाला आहे. विद्यापीठातील खानावळींमध्ये भोजन घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना (पान २ वर)




## 'होर्मुझ सामुद्रधुनी जगासाठी खुली केवळ शत्रूंसाठी बंद- इराणकडून भूमिका स्पष्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्य पूर्वेतील युद्धाच्या भडक्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी ठप्प झाली असतानाच, इराणने महत्त्वाची भूमिका घेतली आहे.मध्य पूर्वेतील युद्धाच्या भडक्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी ठप्प झाली असतानाच, इराणने महत्त्वाची भूमिका घेतली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराकची यांनी स्पष्ट केले की, होर्मुझची सामुद्रधुनी जगातील सर्व राष्ट्रांसाठी खुला आहे, केवळ शत्रूंसाठी बंद असेल. इराणच्या या भूमिकेमुळे गेल्या १५ दिवसांपासून समुद्रात अडकून पडलेल्या ७५० जहाजांच्या सुटकेचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

परराष्ट्र मंत्री अराक म्हणाले की, 'होर्मुझ सामुद्रधुनी सागरी वाहतुकीसाठी खुली आहे. ती केवळ आमच्या शत्रू राष्ट्रांच्या आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांच्या मालकीच्या टँकर्ससाठी बंद आहे, जे आमच्यावर सतत हल्ले करत आहेत. इतर सर्व देशांच्या व्यापारी जहाजांना या मार्गावरून जाण्यास काहीच अडचण नाही.'

### भारताला मोठा दिलासा?

इराणच्या या विधानामुळे सर्वात मोठा दिलासा अडकून पडलेल्या मालवाहू जहाजांना मिळण्याची चिन्हे आहेत. नौवहन मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, सुमारे ७५० होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकून पडले आहेत, यात एकूण २८ भारतीय मालवाहू जहाजे या भागात अडकली आहेत. यातील २४ जहाजे पश्चिमेला आणि ४ जहाजे पूर्व भागात अडकून पडली आहेत. ही जहाजे अडकल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईची भीती निर्माण (पान २ वर)



# दर्यापूर येथील लोक न्यायालयात १६८ प्रकरणे निकाली



**खल्लार/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार व जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधि सेवा समिती दर्यापूर यांच्या वतीने दर्यापूर न्यायालयात राष्ट्रीय लोक न्यायालयाचे १४ मार्च रोजी आयोजन करण्यात आले होते. लोकन्यायालयामध्ये दर्यापूर येथिल सर्व न्यायालयातील प्रलंबित ८७ प्रकरणे व ८१ दाखलपूर्व प्रकरणे आपसांत समझोता होवुन निकाली करण्यात आली. एकूण १६८ प्रकरणे निकाली करण्यात आली.

न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व फौजदारी प्रकरणे या लोकन्यायालयात एकाच दिवशी एकाच निर्णयात निकाली झाल्यामुळे त्यामधिल पक्षकारांची कोर्टबाजीतुन सुटका झाली आहे व त्यांचा वेळ, पैसा, श्रम व मानसिक त्रास वाचला आहे. लोक न्यायालयासाठी एकूण पाच पॅनलची निर्मिती करण्यात आली होती. पॅनल प्रमुख न्यायाधिश म्हणुन जिल्हा न्यायाधिश सत्यवान डोके, दिवाणी न्यायाधिश महेश शिलार , आशिष जोशी , अजयप्रकाश यादव व एस. डी. कमलाकर यांनी काम पाहीले. तसेच लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा न्यायालयाच्या अधिक्षक मोरे , सहायक अधिक्षक चतुर, नाझर, विनोद गवई, न्यायालयीन कर्मचारी सिद्धार्थ लोणारे व अभिजीत धांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर लोक न्यायालयामध्ये एका मोटार अपघात नुकसानभरपाईच्या प्रकरणात अर्जदार व विमा कंपनीमध्ये आपसांत तडजोड होवुन विमा कंपनीने मृतकाच्या वारसांना एक कोटी पन्नास लाख रुपये नुकसानभरपाई देवुन सदर प्रकरण लोक न्यायालयात निकाली निघाले. सदर प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, मृतक नामे कैलास नारायण कापरे हे चंद्रपूर येथिल सुपर थर्मल पॉवर येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलामध्ये कार्यरत असताना दि. ८ फेब्रुवारी २२ ला मोटारसायकलवरुन जात असताना एका भरधाव वेगात येत असलेल्या टीप्पर ट्रकने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली व त्यामध्ये ते गंभिर जखमी झाले व उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघाताचे वेळेस मृतकाचे वय ३० वर्षे होते. मृतकाच्या मागे त्यांची पत्नी, दोन लहान मुले व वृद्ध आईवडील आहेत. त्यांनी सदर अपघातात कैलास कापरे यांचा मृत्यू झाला व त्यांच्या कुटुंबाचा आधार हरपला म्हणुन नुकसानभरपाई मिळण्यासाठी अचलपूर येथिल जिल्हा न्यायालयात टीपर ट्रकचा चालक, मालक व विमा कंपनीच्या विरोधात प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरण प्रलंबित असताना दि. २५ जुलै २५ रोजी दर्यापूर येथे नव्याने जिल्हा न्यायालयाची स्थापना करण्यात आली. सदर प्रकरणातील अर्जदार हे अंजनगाव सुर्जी येथे दर्यापूर न्यायालयाच्या न्यायकक्षेत रहात असल्यामुळे सदर प्रकरण दर्यापूर जिल्हा न्यायालयात वर्ग झाले. १४ मार्च रोजी आयोजित राष्ट्रीय लोक न्यायालयासमोर सदरचे प्रकरण ठेवण्यात आले होते. सदर प्रकरणामध्ये मृतकाचे वारस व गो डिजिट जनरल इन्शुरन्स कंपनीमध्ये लोक न्यायालयाचे पॅनल प्रमुख, जिल्हा न्यायाधिश सत्यवान डोके व पॅनल मेंबर अॅड. लिना गहेरवाल यांच्या पॅनल समोर एक कोटी पन्नास लाख रुपयांत तडजोड होवुन नुकसानभरपाईची रक्कम इन्शुरन्स कंपनीने मृतकांच्या वारसांना देण्याबाबत समझोता करण्यात आला. सदर प्रकरणात मृतकांच्या वारसांतर्फे अॅड. व्ही. आर. गोडबोले व गो डिजिट जनरल इन्शुरन्स कंपनीतर्फे अॅड. अभिजित तनपुरे यांनी काम पाहिले.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिराला नागरिकांचा उत्सफुर्त प्रतिसाद

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तहसिल कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत खल्लार व सामदा येथे (दि.१४) विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवा व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिबिरादरम्यान महसूल सेतू विभागामार्फत विविध प्रमाणपत्रे, संजय गांधी निराधार योजनेचे आदेशपत्र, शिधापत्रिका वाटप तसेच अद्यावत ७/१३ व ८(अ)उतारे नागरिकांना देण्यात आले. भूमी अभिलेख विभागामार्फत मिळकत पत्रिका व नकाशांचेही वाटप करण्यात आले.



महिला व बालविकास विभागाच्या वतीने बचत गटांना आदेशपत्रे देण्यात आली तसेच विविध विभागांच्या योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. यावेळी उपस्थित नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन अनेक अर्ज स्वीकारण्यात आले व काही प्रकरणांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. या शिबिराला दोन्ही मंडळातील मोठ्या संख्येने नागरिक, शेतकरी व महिला उपस्थित होते. अनेक प्रश्न जागेवरच निकाली निघाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाला उपविभागिय अधिकारी राजेश्वर हांडे, तहसिलदार डॉ. रविंद्र कानडजे, नायब तहसिलदार प्रमोद काळे तसेच तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## १ व 10 वरील उर्वरित

### पाच राज्यांमधील विधानसभा

असेही ज्ञानेश कुमार यांनी सांगितले.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि डीएमके (अ्श्ख) प्रमुख एम. के. स्टालिन सलग दुसऱ्यांदा सत्ता अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांना एआयएडीएमके (ँध्अ्श्ख) आणि भाजप युतीचा सामना करावा लागणार आहे. मात्र, यावेळचे मोठे आकर्षण म्हणजे अभिनेते आणि राजकारणी विजय यांनी त्यांच्या 'टीव्हीके' (ऊन्ख) पक्षासह राजकारणात एन्ट्री केली आहे. यामुळे राज्यातील निवडणुका तिरंगी होणार आहेत.

केरळममध्ये डावे विरुद्ध काँग्रेस

केरळम येथे नेहमीप्रमाणे 'डावे विरुद्ध काँग्रेस' असा सामना रंगणार आहे. दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा असलेल्या या राज्यात सीपीएमचे ज्येष्ठ नेते पिनाराई विजयन सलग दुसऱ्यांदा विजय मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील निकालांमुळे काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे, पण अंतर्गत गटबाजी रोखण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असेल.

आसाममध्ये भाजपचे मुख्यमंत्री सरमा यांची कसोटी

ईशान्य भारताचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा दुसऱ्या टर्मसाठी सज्ज आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुनरागमन करण्याच्या आशेवर आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत माजी प्रदेशाध्यक्ष भूपेन बोरा यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेससमोरील आव्हान वाढले आहे.

पुदुचेरीत मुख्यमंत्री एन. रंगासामी सत्ता अबाधित ठेवण्याच्या प्रयत्नात

केंद्रशासित प्रदेश पुदुचेरी येथे 'ऑल इंडिया एनआर काँग्रेस' आणि मुख्यमंत्री एन. रंगासामी तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत, तर विरोधी पक्ष डीएमके बदलासाठी जोर लावत आहे.

### राज्यसभा निवडणुकीपूर्वी घोडेबाजार!

प्रवेश मिळवला. या व्यक्तींनी काँग्रेस आमदारांना भेटून एका विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे आमिष दाखवल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

**'ब्लँक चेक' आणि जीवे मारण्याची धमकी**

ओडिशा काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे उपनेते अशोक कुमार दास यांनी बिदादी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार चार व्यक्तींनी आमदारांना प्रत्येकी कोट्यवधी रुपये आणि कोरा चेक देऊन मत खरेदी करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा काँग्रेस आमदारांनी ही ऑफर धुडकावून लावली, तेव्हा संबंधित व्यक्तींनी त्यांना शिवीगाळ केली. तसेच, ओडिशात परतलात तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

दोन आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

बंगळुरू दक्षिणचे पोलीस अधीक्षक आर. श्रीनिवास गौडा यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, 'आमदारांच्या तक्रारीवरून प्राथमिक चौकशी सुरू आहे. वीरेंद्र प्रसाद, सुरेश, अजित कुमार साहू आणि सिमाचल महाकुड या चौघांची नावे तक्रारीत आहेत. त्यापैकी दोन जणांना आम्ही ताब्यात घेतले आहे.'

निवडणुकीचे समीकरण

ओडिशामध्ये सत्ताधारी भाजप सरकारने राज्यसभेसाठी अतिरिक्त उमेदवार उभा केल्यामुळे काँग्रेसच्या गोटात धाकधूक होती. यामुळेच खबरदारीचा उपाय म्हणून १२ मार्च रोजी या आमदारांना कर्नाटकात हलवण्यात आले होते. हे आमदार आता मतदानाच्या काही तास आधीच भुवनेश्वरला परतणार आहेत.

### पुण्यात मेट्रोचे २००

जवळपास ५५ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यान्वित असतील. याशिवाय, पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांत आणखी ५५ किलोमीटरच्या मार्गांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याव्यतिरिक्त ८० किलोमीटरचे अतिरिक्त नियोजन असून, भविष्यात एकूण २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभे करण्याचे लक्ष सरकारने ठेवले आहे. मेट्रो प्रशासनाने आता टप्प्या-टप्प्याचे नियोजन न करता संपूर्ण क्षेत्राचा एकत्रित आराखडा तयार करा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

पुण्याच्या प्रगतीचे प्रतीक 'भवन' : सुनेत्रा पवार

पुणे मेट्रो भवन केवळ प्रशासकीय मुख्यालय नसून आधुनिक पुण्याच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि सुयोग्य नियोजनाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही इमारत पुण्याच्या प्रशासकीय वैभवात महत्त्वाची भर घालणारी ठरेल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही राज्याच्या विकासाची महत्त्वाची केंद्रे असल्याने येथे वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला होता. त्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने मोठे प्रकल्प राबवून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.

गॅसचा तुटवडा नाही, काँग्रेस अफवा पसरवतेय

अमेरिका इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे पुण्यासह राज्यात सिलिंडरसाठी मोठ्या प्रमाणात रांगा लागत आहेत. यावर विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना फडणवीस म्हणाले, देशात किंवा राज्यात कुठेही गॅसचा तुटवडा नाही. राहुल गांधी आणि काँग्रेसचे नेते जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, गॅस एजन्सीबाहेर रांगा लावू नयेत आणि गर्दी करू नये, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.

### बारामती व राहुरीची

विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे ६ वेळा आमदार राहिलेले दिग्गज नेते शिवाजीराव कार्डिले (वय ६७) यांचे ऑक्टोबर २०२५ मध्ये अल्पशा आजाराने निधन झाले होते. यामुळे ही जाग रिक्त झाली होती आता या जागेसाठी पोट- निवडणूक होणार आहे.

### दृश्यम' स्टाईलनं पुरावा

नोकरीनिमित्त ते कुटुंबासह छत्रपती संभाजीनगर शहरात राहत होते. विशाल राठोड आणि आकाश पवार हे त्यांचे दोघे शहरात त्यांचे चांगले मित्र होते आणि ते नेहमी एकत्र फिरत असत. या दोघांनी 'खतरों के खिलाडी'सारखा खेळ सुरू करायचा असल्याचे सांगत लोंढे यांच्याकडून मोठी रक्कम घेतली होती. मात्र पैसे परत देणे शक्य नसल्याने त्यांनी हत्या करण्याचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे.

आरोपींनी खोदले खड्डे- पूर्वनियोजित कटानुसार आरोपींनी गेवराई तांडा परिसरात व्ँ च्या सहाय्याने सुमारे पाच फूट खोल असे दोन खड्डे खोदून ठेवले होते. हत्येच्या दिवशी आरोपींनी लोंढे यांना सोबत घेऊन दौलताबाद परिसरात दारू पार्टी केली. त्यानंतर परतत असताना लोंढे यांच्याकडे असलेल्या परवानाधारक पिस्तुलातूनच आरोपींनी त्यांच्या डोक्यात गोळी झाडून त्यांची हत्या केली. खून केल्यानंतर आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी लोंढे यांना घेऊन आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी फिरल्याचा बनाव रचला. त?यानंतर त?यातील एका खड्ड्यात लोंढे यांना पुरले यावेळी मृत प्राध्यापकांचा मोबाईल वारंवार ऑन-ऑफ करण्यात आला. तसेच त्यांना सिग्मा हॉस्पिटलजवळ सोडल्याची खोटी माहितीही देण्यात आली. दरम्यान ६ फेब्रुवारी २०२६ रोजी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. दोन दिवसांपूर्वी मयताचे बंधू उत्तम लोंढे यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन विशाल राठोड आणि आकाश पवार यांच्यावर संशय व्यक्त केला. यानंतर पोलिसांनी दोघांची चौकशी सुरू केली.

चौकशीदरम्यान आकाश पवार वारंवार 'मी दारू प्यायलो होतो, मला काही आठवत नाही' असे सांगत होता. मात्र पोलिसांनी विशाल राठोड याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने संपूर्ण गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींनी सांगितले की, लोंढे हे पैसे परत मागत होते आणि वारंवार अपमान करत होते. त्यामुळे रागातून त्यांनी हत्येचा कट रचला. खून केल्यानंतर मृतदेह एक दिवस गाडीत ठेवण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री करण आडे या साथीदाराच्या मदतीने गेवराई तांडा परिसरातील आधी खोदलेल्या खड्ड्यात मृतदेह पुरण्यात आला.

या प्रकरणी पोलिसांनी विशाल राठोड, आकाश पवार आणि करण आडे या तिघांना अटक केली असून प्राथमिक माहितीनुसार सुमारे ५० लाख रुपयांचा आर्थिक व्यवहार असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मृत प्राध्यापकांचा मोबाईल पुण्यात नेऊन सुरू केला आणि 'मला कुणी त्रास देऊ नका, मी २५ ते ३० दिवस येणार नाही' असा स्टेटस ठेवून फोन बंद केल्याचेही तपासात उघड झाले, मी त्यावरून पोलिसांना त्यांचा संशय आला. त्याबाबत संपूर्ण माहिती छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिली आहे.

### गॅसटंचाईचा सावित्रीबाई फुले

कळविण्यात येते की, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या आदेशानुसार, जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना १०० टक्के गॅस सिलिंडरचे वाटप करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तसेच, या अनुषंगाने विद्यापीठाकडूनही जिल्हाधिकारी पुणे जिल्हा यांना देखील पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली आहे. याबरोबरच विद्यापीठातील भोजनगृहांमध्ये अन्नपुरवठा करण्यासाठी विद्यापीठस्तरावर पूर्णक्षमतेने प्रयत्न करण्यात येत असून, भोजनगृहांमध्ये भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी याबाबत निश्चिंत राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवांनी केले आहे.

विद्यापीठ परिसरातील भोजनगृहांमधील अन्नपुरवठ्याबाबत प्रभारी कुलसचिवांनी एक जाहीर प्रकटन प्रसिद्ध केले आहे. यामध्ये ते म्हणाले आहेत की, गॅसटंचाईवर विद्यापीठस्तरावर संपूर्ण क्षमतेने प्रयत्न करण्यात येत असून, भोजनगृहांमध्ये भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी याबाबत निश्चिंत राहावे. प्रश्न हा आहे की, नेमकी कोणत्या प्रकारची उपाययोजना विद्यापीठ प्रशासनाने केली आहे, याची स्पष्टता नाही. हळूहळू सर्व मेस, उपाहारगृहे आणि भोजनगृहांमध्ये अन्नपदार्थ कमी केलेले आहेत. यावर पर्याय काय आहे?

राहुल ससाणे, अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

### 'होर्मुझ सामुद्रधुनी जगासाठी

झाली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर झाला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, कच्च्या तेलाच्या किमतींनी ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. फेब्रुवारी २०२६ मधील दर ६९.०१ डॉलर्स प्रति बॅरल होते. तर, १२ मार्च २०२६ मध्ये हे दर १२७.२२ डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले आहेत. अवघ्या १२ दिवसांत कच्च्या तेलाचा सरासरी भाव प्रति बॅरल तब्बल ३२ डॉलर्सनी वाढला आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्के तेल ४० देशांकडून आयात करतो. १२ मार्च रोजी तेलाचे भाव १२७ डॉलरवर पोहोचल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण येण्याची शक्यता आहे. मात्र, इराणने भारतासारख्या मित्रराष्ट्रांसाठी मार्ग खुला ठेवल्यास, ही दरवाढ काही प्रमाणात स्थिरावण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

### शाळेतील अस्वच्छता शिक्षकांना

मोठमोठेअधीकारी झाल्याचा इतिहास आहे.परंतू गेल्या काही वर्षापासून शहरातील शाळांची अंत्यंत दैनावस्था झाली असून शिक्षक हे विद्यार्थ्यांना शिकवण्याएवजी फक्त पगारवाढीवाढीकडे लक्ष देत असल्याचे चित्र दिसून येते.आणि हीच बाब हेरुन अंजनगाव सुर्जी चे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी शहरातील किल्ला शाळेला दिलेल्या भेटीदरम्यान शाळेत अत्यंत संतापजनक दृश्य पाहायला मिळाले. शाळेच्या मुख्याध्यापकांच्या खोलीत गुटख्याच्या पुड्या आढळल्या, तर विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत गाळ साचलेला होता.महापुरुषांचे फोटो धुळखात पडले होते आणि विद्यार्थ्यांना वाटायची सुमारे ४०० ते ५०० प्रमाणपत्रे निष्काळजीपणामुळे खराब झाली होती.शासनाने दिलेले संगणक, मोठी स्क्रीन असलेले टीव्ही आणि ऑनलाइन शिक्षणाचे साहित्य धूळखात पडून असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांसाठी आलेले नवीन टेबल आणि बेंच एका बंद खोलीत अडकून पडले होते.वर्ग खोलीतील प्रत्येक कोप-यात कच-याचे ढिग लागले होते.जिथे जनावरेही राहू शकणार नाहीत अशा ठीकाणी विद्यार्थी शालेय पोषन आहार घेत होते. अशी शाळेची दयनीय अवस्था पाहून नगराध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. केवळ आदेश न देता नगराध्यक्ष गायगोले यांनी स्वतः आणि त्यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांनी हातात झाडू घेऊन संपूर्ण शाळा आणि प्रत्येक वर्ग स्वच्छ केला. अस्वच्छता आणि कामातील हलगर्जीपणाबद्दल त्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांची एक पगारवाढ थांबवण्याचा शेरा 'शेरे बुकात' नोंदवत प्रभारी मुख्याधिका-यांना तसे आदेश दिले.ही चर्चा संपूर्ण शहरात वा-यासारखी पसरल्यानंतर शिक्षकांमध्ये एकच चर्चा रंगली.

किल्ला शाळेच्या कचरा सफाईसाठी शेवटी आरोग्य विभागाचे कर्मचा-यांना पाचारण करावे लागले आणि शाळेतील वर्ग खोल्यानमधून दिड ट्राली कचरा निघाल्याने विद्यार्थी शाळेत कसे शिक्षण घेत होते याबद्दल आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

शहरातील न.प.शाळांचा दर्जा सुधरावण्यासाठी प्रथम वाशीम जिल्ह्यातील साखरा येथील जि.प. आंतराष्ट्रीय शाळेला भेट दिली होती हे विषेश. नगराध्यक्षानी शाळांचा दर्जा सुधरवण्यासाठी शहरातील तज्ञ माजी प्राचार्य रविद्र कोकाटे,विनोद हाडोळे,सेवा निवृत्त मुख्याध्यापक दिलीप कावलकर,गोपाल वानखडे,मो.नईम यांची मदत घेतली.

### नवीन वर्गखोल्यांचे बांधकामामुळे

अमरावती जिल्हा नियोजन समिती तर्फे प्राप्त मनपा शाळांच्या भौतिक सुविधांकरिता २ कोटी इतक्या निधी अंतर्गत महापालिकेच्या ५ शाळांमध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन आ. खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा बुधवारा येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे., मनपा हिंदी शाळा क्रमांक ७ विलास नगर येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. मनपा मराठी शाळा शेंगांव येथील कंपाऊंड वॉल व वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. मनपा शाळा वडाळी येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. मनपा शाळा नूर नगर येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. अशी विविध कामे करण्यात येत आहे. यावेळी आमदार महोदयांनी कुदळ मारीत व नामफलकाचे अनावरण करून भूमिपूजनाचीं औपचारिकता साधली. पुढे बोलतांना आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, अमरावती क्षेत्रात मनपाच्या एकुण ६३ शाळा सद्यास्थितीत कार्यरत असुन यात मनपाच्या व जिल्हापरिषद कडुन वर्ग (हस्तांतरित) झालेल्या शाळांचा समावेश आहे. सन २०२२ -२३ पासुन मनपा शाळांच्या पटसंख्येत सातत्याने वाढ होत असल्याने काही ठिकाणी अतिरिक्त वर्गखोल्या बांधकामाची मागणी वारंवार होत आहे. खाजगी शाळेच्या तोडीने मनपा शाळांना विकास व्हावा म्हणून शाळांमध्ये वर्ग खोल्या, स्वच्छता गृह, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, डिजीटल शाळा, वायफाय सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. सद्यास्थित अमरावती मनपाच्या वार्षीक तरतुद मधुन व उत्पन्नातुन ही कामे होणे व विद्यार्थ्यांना सोई सुविधा पुरविणे अशक्य दिसुन येते. म्हणूनच जिल्हा नियोजन समितीच्या वार्षीक नियोजनात नवीन लेखाशीर्ष निर्माण करून अमरावती महानगरपालीका हद्दीतील प्राथमिक / माध्यमिक शाळांसाठी निधी प्राप्त होण्यासाठी तरतूद करण्यासाठी आपले प्रयत्न आहे. जिल्हा नियोजन समिती मार्फत जिल्हा परिषद शाळांना निधीची तरतूद करण्यात येते. त्याच पार्श्वभूमीवर अमरावती महानगर पालिका शाळांच्या भौतिक सुविधांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे आ. सुलभा खोडके यांनी याप्रसंगी सांगितले.

या भूमीपुजन कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, नगरसेवक चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर, प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, मनीष बजाज, प्राध्यापक संजय शिरभाते, प्राध्यापक संजय तिरथकर, नगरसेविका ललित रतावा, ममता आवारे, रेखा तायवाडे, नगरसेवक व नगरसेविका, मनपा शिक्षणाधिकारी प्रकाश मेश्राम, उपअभियंता लक्ष्मण पावडे, शिक्षक योगेश पखाले, माजी नगरसेवक भूषण बनसोड, आशिष गावंडे, रत्नदीप बागडे , प्रवीण भोरे, ऋतुराज राऊत, कर्नलसिंह राहाल, सुनील जावरे, अभिलाष नलोडे , राजेंद्र दाळू,शरद जवंजाळ, सुजल तेलखडे , अमित तायडे, प्रथमेश गवई, हर्षल रोंघे, सागर इंगळे, जयेश सोनोने, मनीष पाटील, निलेश वडे , बंडू निंभोरकर,अविनाश पारडे, महेश साहू, अजेश बिजोरे, निशिकांत मानकर, आदींसह शिक्षकवृंद तसेच सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय लोक अदालतीत ७०९२

रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झाला. तसेच मोटार अपघात प्रकरणांमध्ये १ कोटी ५० लाख रुपयांच्या विमा हप्त्यांचा लाभ पीडितांना दिला गेला. याबाबत जिल्हा न्यायाधीश एस.टी. डोके, विधीज्ञ गोडबोले, अॅड. तनपुरे व कंपनीच्या अधिका-यांचे विशेष सहकार्य लाभले. अमरावती जिल्हा न्यायालयातील एका अपघात प्रकरणात ९९ लाख रुपयांमध्ये यशस्वी तडजोड होऊन प्रकरण मिटविण्यात आले. यामध्ये पॅनल प्रमुख जिल्हा न्यायाधीश संजय भट्टाचार्य, पॅनल सदस्य अॅड. अक्षय पवार आणि इतरांनी परिश्रम घेतले.

**स्पेशल ड्राईव्हमध्ये १३६३ प्रकरणे निकाली-** उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ९ ते १३ मार्च २०२६ दरम्यान आयोजित विशेष मोहीम अंतर्गत १३६३ प्रकरणांचे यशस्वी निवारण करण्यात आले. या यशस्वी लोक अदालतीचे श्रेय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष आर.जी. वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव डी.एस. वमने, न्यायाधीश वर्ग, अधिवक्ता जिल्हा वकिल संघ अध्यक्ष सुनिल देशमुख, जिल्हा सरकारी वकिल परिक्षित गणोरकर तसेच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याला जाते.

### अल्पवयीन मुलीचा विवाह रोखला

बालिका अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर 'बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६' अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली. या कायद्याप्रमाणे मुलीचे किमान विवाह वय १८ वर्षे व मुलाचे २१ वर्षे निश्चित असून, अल्पवयीन मुलांचे विवाह लावणे, प्रोत्साहन देणे किंवा त्यात सहभाग घेणे हा गुन्हा आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, या प्रकरणी वऱ्हाड मंडळी तसेच मुलीकडील संबंधित व्यक्तींविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले यांनी नागरिकांना आवाहन केले की, बालविवाहासारख्या कुप्रथेविरुद्ध प्रशासन सतर्क असून अशा घटनांवर कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अशा घटना आढळल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर माहिती देऊन बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे.

### परिचारिकेची १ लाख १८ हजारांची

११ मार्च रोजी आरोपींनी पीडितेला अधिक नफा मिळण्याचे आमिष दाखवत विविध खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पैसे ट्रान्सफर करण्यास सांगितले. त्यानुसार तिने ३ हजार, ४ हजार, १५ हजार, ४० हजार आणि ३० हजार रुपये अशा हप्त्यांमध्ये एकूण १लाख १८ हजार रुपये पाठवले. यानंतर पीडितेने पैसे परत मागितले असता आरोपींनी आणखी ५६ हजार रुपये जमा करण्याची मागणी केली. तेव्हा तिला व तिच्या कुटुंबीयांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की फसवणुकीच्या काही रकमेचा मागोवा घेऊन ती रोखण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### अवैध दारू विक्री करणारे

( वय ५४, रा. संजय गांधी नगर, अमरावती) याच्या ताब्यातून १५ नग १८० एमएल बॉबी संत्रा ( किंमत अंदाजे १,२०० रुपये) दारू जप्त केली आहे. सर्व आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आले आहेत.

### पिकनिकसाठी निघालेल्या कुटुंबांच्या

बोरधरण येथे जात होते. देवळी-पेंढरी घाट मार्गावर वाहन पोहोचल्यावर अचानक ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व ऑटो उलटला. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले. त्यानंतर सर्व जखमींना नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रज्वल लटारे यांनी जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली. या अपघातात समर सिन्हा (१२), अनु सिन्हा (१५), प्रशांत डोंगरे (१४), संगीता डोंगरे (३२), गुंजन डोंगरे (३१), तिलेश सिन्हा (३६), मदनलाल सिन्हा (५०) व आदर्श सिन्हा (३) हे जखमी झाले असून सर्वजण नागपूर येथील रहिवासी आहेत.

### जंगलातील वणव्याशी दोन हात करताना

तुटपुंज्या साधनांनी ते आग विझवण्याचा प्रयत्न करत होते.

आगीच्या ज्वाळांनी त्यांना चहुबाजूंनी घेरले. जीव वाचवण्यासाठी त्यांनी एका झाडाचा आसरा घेतला, मात्र आगीची धग इतकी प्रचंड होती की ते झाडावरच ६० टक्क्यांहून अधिक भाजले गेले. झाडावरून खाली उडी मारून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने यवतमाळ आणि त्यानंतर पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले होते. आठ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर शनिवारी त्यांचा मृत्यू झाला.

### चिखलदरा हद्दीत ५.५ किलो

श्रीकांत खानंदे, हर्षद काळे यांचे पथक कारवाईत सहभागी होते. पोलीसांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अवैधरित्या अंमली पदार्थ वापराच्या घटनांवर प्रशासन सतत लक्ष ठेवत असून, गुन्हे शाखा आणि पोलिस पथके अशा मोहीमांचे यशस्वी आयोजन करीत आहेत. पुढील तपास अद्याप सुरू असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### डीजे धुमाल वाहनाला मालवाहूची

जतीन सुहाढोल याच्यासह सुन्नू वर्मा, लकी झुनझुनकर, जतीन वाघमारे, प्रज्वल वाघमारे, ऋषिकेश भोसकर, मनीष भोयर, अभय खेकडे, राहुल खेकडे, अभय चौरे, अतिश भोसकर, पवन भोयर, योगेश सावरकर, मनीष बिहाडे आदी जखमी झाले. सर्व जखमींना स्थानिकांच्या मदतीने तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. त्यांनी बचावकार्य सुरू करून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली व पंचनामा केला. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १६ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शासन आदेशाविना मालेगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाचे स्थलांतर ?

## ई–क्लास शासकीय जमिनीवर उभ्या राहिल्या प्रशासकीय इमारती व कर्मचा–यांची निवासस्थाने !

■ प्रतिनिधी | कारंजा ■

*मालेगाव येथील वनपरिक्षेत्र कार्यालय मौजे ईराळा (पो. कळंबेश्वर) येथे कोणत्याही अधिकृत शासन आदेशाशिवाय स्थलांतर करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला असून या प्रकरणामुळे वन विभागाच्या प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे कार्यालय स्थलांतरा नंतर ईराळा येथे प्रशासकीय इमारत तसेच वन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थानांचे बांधकाम करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.*

प्राप्त माहितीनुसार, मालेगाव येथे कार्यरत असलेले वनपरिक्षेत्र कार्यालय अचानकपणे मौजे ईराळा येथे हलविण्यात आले. मात्र या स्थलांतरासाठी कोणताही शासन निर्णय, विभागीय आदेश किंवा सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. प्रशासकीय कार्यालयाचे स्थलांतर करण्यासाठी शासन स्तरावर निर्णय घेणे तसेच संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची (प्रधान सचिव वनविभाग) मंजुरी घेणे आवश्यक असते. या प्रक्रियेचे पालन झाले का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### शासकीय बांधकामासाठी आवश्यक प्रक्रिया

शासकीय इमारतींच्या बांधकामासाठी महाराष्ट्र वित्तीय नियम तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांनुसार पुढील प्रक्रिया बंधनकारक असते : प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी, अधिकृत अंदाजपत्रक माहिती, मान्यता, निधीची अधिकृत तरतूद, निविदा प्रक्रिया.

परंतु ईराळा येथे उभारण्यात आलेल्या इमारतींसंदर्भात या सर्व प्रक्रियेची पूर्तता झाली का, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बांधकामासाठी वापरण्यात आलेला निधी नेमका कोणत्या योजनेतून मंजूर झाला, हा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

### भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत चौकशीची मागणी.

या प्रकरणात शासकीय निधीचा गैरवापर किंवा अधिकारांचा दुरुपयोग झाला असल्यास भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत कारवाई होऊ शकते. या कायद्याच्या कलम १३(१)(ड) नुसार शासकीय पदाचा गैरवापर करून आर्थिक फायदा मिळविणे किंवा शासनाला नुकसान पोहोचविणे हा गंभीर गुन्हा मानला जातो.

याशिवाय भारतीय दंड संहिता (IPC) अंतर्गतही कारवाईची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे :

कलम ४०९ – शासकीय संपत्तीचा अपहार

कलम १२०-बी – संगनमताने गुन्हा करणे

म्हणूनच या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) किंवा इतर सक्षम यंत्रणेमार्फत करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

### वनरक्षकांनी मुख्यालयी राहणे का आवश्यक?

वन विभागाच्या सेवा नियमांनुसार वनरक्षकांनी त्यांच्या नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र वन विभाग सेवा नियम व कार्यपद्धती आदेशांनुसार वनरक्षकांनी त्यांच्या संबंधित नियतक्षेत्र (बीट) किंवा मुख्यालयाच्या परिसरातच वास्तव्य करणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.

### या नियमामागील प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत : जंगलातील वनसंपत्तीचे संरक्षण

वनगुन्हे (अवैध वृक्षतोड, शिकार, तस्करी) रोखण्यासाठी तात्काळ कारवाई, रात्रंदिवस गस्त (पेट्रोलिंग) ठेवणे, जंगलातील आग, अवैध उत्खनन किंवा अतिक्रमण यावर त्वरित प्रतिसाद देणे.

वनरक्षक मुख्यालयापासून दूर राहत असल्यास जंगलातील घटना, वनगुन्हे किंवा आपत्कालीन परिस्थितीवर त्वरित नियंत्रण ठेवणे कठीण होते. त्यामुळे वन विभागाच्या विविध परिपत्रकांमध्ये वनरक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच वास्तव्य करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### २१ नियतक्षेत्रे असताना निवासस्थाने एकाच ठिकाणी?

माहिती अधिकारातून प्राप्त माहितीनुसार मालेगाव वनपरिक्षेत्रांतर्गत एकूण २१ नियतक्षेत्रे (बिट) आहेत. त्यामध्ये :तपोवन, अमाना १, अमाना २, अमाना ३, भौरद, मेडशी, काळाकामठा १, काळाकामठा २, पांगरा १, पांगरा २, देवठाणा १, देवठाणा २, देवठाणा ३, मुंगळा १, मुंगळा २, रेगाव १, रेगाव २, कोळगाव, किन्हीराजा १, किन्हीराजा २ आणि कवरदरी या क्षेत्रांचा समावेश आहे. या विविध भागांमध्ये नियतक्षेत्रे असतानाही ईराळा येथे मोठ्या प्रमाणात वनरक्षकांसाठी निवासस्थाने उभारण्यात आल्यामुळे कर्मचारी मुख्यालयी राहण्याच्या मूलभूत नियमालाच धक्का बसल्याची चर्चा सुरू झाली आहे.

स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. शासन आदेशाशिवाय कार्यालयाचे स्थलांतर, ई-क्लास शासकीय जमिनीवर बांधकाम, निधीच्या वापरातील पारदर्शकतेचा अभाव आणि नियमांचे संभाव्य उल्लंघन या सर्व बाबींची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणातील सर्व कागदपत्रे सार्वजनिक करावीत तसेच आवश्यक असल्यास स्वतंत्र चौकशी समिती नेमून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी वाशिम या प्रकरणात कोणती भूमिका घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ई-क्लास शासकीय जमिनीवर बांधकामाचा मुद्दा.

ईराळा येथे उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारती व शासकीय निवासस्थानांचा संबंध ई-क्लास शासकीय जमिनीशी जोडला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. राज्यातील महसूल नियमांनुसार ई-क्लास जमीन ही शासनाची सार्वजनिक मालमत्ता मानली जाते. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम २०, ३७ आणि ४८ नुसार शासकीय जमिनीचा वापर बदलण्यासाठी किंवा त्या जमिनीवर कायमस्वरूपी बांधकाम करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची म्हणजेच जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाची मंजुरी आवश्यक असते. अशा मंजुरीशिवाय शासकीय जमिनीवर बांधकाम करणे हे नियमबाह्य मानले जाते. सूत्राच्या माहितीनुसार मौजे ईराळा येथील संबंधित स्थानिक प्रशासनाची ई क्लास जमिनीवर बांधकाम करण्यासाठी 'ना हरकत' व इमारत बांधकाम करण्यासाठी परवानगी घेतली नसल्याची बाब समोर येत आहे.

### संशय निर्माण करणारे प्रमुख मुद्दे

- महसूल, वन व आर्थिक नियमांचे उल्लंघन झाल्याची शक्यता
- शासन आदेशाविना वनपरिक्षेत्र कार्यालयाचे स्थलांतर
- ई-क्लास शासकीय जमिनीवर इमारती व निवासस्थानांचे बांधकाम
- प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरीचा अभाव
- वनरक्षक मुख्यालयी राहण्याच्या नियमांचे संभाव्य उल्लंघन
- बांधकामासाठी लागलेल्या निधीच्या स्त्रोताबाबत संभ्रम
- भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व IPC अंतर्गत चौकशीची मागणी

# नागरिकांच्या दारी महसूल सेवा पोहोचविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न - विश्वनाथ घुगे

## वाशिम तालुक्यातील राजगाव येथे महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात



**वाशिम :** प्रशासकीय सेवा थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवून त्यांच्या समस्या तत्काळ सोडविणे हा महाराजस्व समाधान शिबिरांचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले.

राजगाव येथे १४ मार्च २०२६ रोजी आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

या शिबिरासाठी प्रशासनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यामध्ये उपविभागीय अधिकारी देवकर, तहसीलदार निलेश पळसकर, नोडल अधिकारी कैलास देवळे, नायब तहसीलदार आडे, नप्ते, चौधरी, देवळे, लटारे, भूमिअभिलेख उपअधीक्षक प्रवीण कुंजीर, दुय्यम निबंधक विजय सूर्यवंशी, गट विकास अधिकारी रवींद्र सोनोने, तालुका आरोग्य अधिकारी श्रीमती चव्हाण, तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे, नगर रचना अधिकारी ललित राठोड, तसेच मंडळ अधिकारी सुभाष जवंजाळ यांच्यासह वाशिम तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राजगाव मंडळातील विविध गावांतील ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सुमारे १५ महत्त्वपूर्ण सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, ७/१२ उताऱ्यातील दुरुस्ती, तसेच विविध शासकीय योजनांसाठी अर्ज स्वीकृती आदी सेवांचा समावेश होता. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्हीची बचत झाली.

कार्यक्रमादरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे व उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते अनेक लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जांनुसार विविध दाखले व प्रमाणपत्रांचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले.

राजगाव परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला असून प्रशासनाच्या दप्तरमुक्त व गतिमान कामकाजाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभाग, भूमिअभिलेख विभाग तसेच नोंदणी व मुद्रांक विभाग यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात शाहीर इंगोले यांनी सादर केलेल्या पथनाट्याने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

# राष्ट्रीय लोक न्यायालयात एकाच दिवशी ६ कोटी ८९ लक्ष रुपयांची ८४४ प्रकरणे निकाली

■ प्रतिनिधी | वाशिम ■



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार शनिवार दि. १४ मार्च, २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व तालुका तसेच जिल्हा न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

लोक अदालतीचे उद्घाटन उपस्थित पक्षकारांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम, जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, तसेच जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनुप बाकलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एका दिवसात वाशिम जिल्ह्यामध्ये न्यायालयात ठेवण्यात असलेल्या एकूण प्रलंबित ४ हजार ५५२ तसेच दाखलपूर्व प्रकरणे १० हजार ४२७ प्रकरणांपैकी ८०६ प्रलंबित प्रकरणे तसेच ३८ दाखलपूर्व प्रकरणे, असे एकूण ८४४ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

या प्रकरणांमध्ये एकूण रुपये ६ कोटी ८९ लक्ष ५४ हजार २८७ रूपये एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली. राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यासाठी वकील संघ तसेच जिल्हा पोलीस दलाचे मोलाचे सहकार्य लाभले. लोक अदालतीकरीता रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय येथील विद्यार्थी उपस्थित होते.

## राजस्थानी महिलांचा गणगौर उत्सव साजरा



■ प्रतिनिधी | शेलुबाजार ■

राजस्थान महिला मंडळ शेलुबाजारच्या वतीने उत्साहात वार्षिक पारंपरिक गणगौर उत्सव साजरा होत असून राजस्थानी मारवाडी समाजाकरिता हा महत्त्वाचा उत्सव असून गणगौर गीत गायन करून या उसामध्ये सर्व मारवाडी महिला उपस्थित राहून पारंपारिक पद्धतीने राजस्थानी गणगौर महिला उत्सव केला. या कार्यक्रमांमध्ये शेलुबाजार येथील सर्व महिला मारवाडी समाज एकत्रित येऊन दररोज प्रत्येकाच्या घरी ठरल्यावेळी उपस्थित होतात गौराजी व ईसरजी कृष्णा दैवताचे पूजन करतात तसेच गणगौर कृष्णाचे गीत सादर करून गायन करतात व सर्व महिला मंडळ सहभागी होऊन आनंद व्यक्त करतात या कार्यक्रमाचे आयोजन गणगौर महिला समिती शेलुबाजारच्या वतीने होत असून राजस्थानी मारवाडी समाजाकरिता अतिशय महत्त्वाचा गणगौर उत्सव समजला जातो.

## मालेगांव नगर पंचायतमधील ऑफलाईन टेंडर चे कार्यादेश देण्यात येऊ नये

### काँग्रेस नगर सेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव नगर पंचायत मधिल ऑफलाईन टेंडर उघडण्यात येऊ नये अशी मागनी कांग्रेस नगर सेवकानी ज़िल्ह्याधिकारी यांचे कड़े दिनांक १३.०३.२०२६ रोजी लेखी केली आहे

मालेगांव नगर पचांयत ने मागिल महिण्यापासुन वेगवेगळया कामाकरिता जाहिरात देऊन ऑफलाईन टेंडर/निविदा बोलाविल्यात. सदरहु बहुतांश कामाचे टेंडर हे सदरहु निविदेचे जाहीरात ही वृत्तपत्रामध्ये देण्यासोबतच त्या निविदेची एक प्रत ही नगर पंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागाच्या सुचना फलकावर लावणे बंधनकारक असतांना सुध्दा नगर पंचायत ने यापैकी एकही निविदा ही सुचना फलकावर लावलेली नाही त्यामुळे सदरहु निविदा ही मॅनेज करण्याच्या हेतुनेच नगर पंचायत ने निविदा सुचना फलकावर लावलेली नसल्याचे दिसते व त्यामुळे सदरहु निविदेमध्ये व त्यामधील कामामध्ये भ्रष्टाचार होण्याची शवयता नाकारता येत नाही. मागिल महिण्यापासुन झालेले ऑफलाईन टेंडर च्या निविदा हया टेंडर मॅनेज करण्याच्या हेतुने फवत तिनच निविदा नगर पंचायत ने बोलाविल्या व गोपनिय पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली व यामुळे सदरहु ऑफलाईन टेंडर हे फवत तिनच ठेकेदार यांना दिलेले आहेत व यामुळे सदरहु टेंडर हे मॅनेज झाल्याचे दिसते व यामुळे नगर पंचायत चे आर्थिक नुकसान सुध्दा होऊ शकते व त्यामुळे मालेगांव नगर पचांयत मधील अनेक कामे ही ऑफलाईन टेंडरची असल्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचार होऊ शकतो तसेच नमुद ऑफलाईन टेंडरची निविदा ही सुचना फलकावर लावलेली असल्यास ती नगर पंचायत मधील सि.सी.टी.व्ही कॅमेऱ्यामध्ये सुध्दा दिसेल.

## संकल्प प्रतिष्ठानतर्फे संतोष बायस्कार यांचा सत्कार!



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील तऱ्हाळा येथील संतोष बायस्कार यांचा मोठ्या उत्साहात सत्कार करण्यात आला. श्री संकल्प प्रतिष्ठानचा १० वा वर्धापन दिन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या सोहळ्यात रक्तदान - जीवनदान क्षेत्रात अनेक वर्षांपासून विशेष कार्य केल्याबद्दल समाजसेवेचा गौरव म्हणून कर्मयोगी गाडगेबाबा रक्तदाता संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष बायस्कार तऱ्हाळकर यांचा 'संकल्प सेवा सन्मान पुरस्कार' देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी सुधाकर गिते होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापक किशोर बुटोले, निलेश गुप्ता, सुरेश राठी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कर्मयोगी गाडगेबाबा रक्तदाता संघाच्या माध्यमातून समाजसेवक संतोष बायस्कार तऱ्हाळकर हे रक्तदान शिबीरे घेऊन गोरगरीब व गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देतात हे उल्लेखनीय! तसेच कर्मयोगी गाडगेबाबा संदेश अभियान मार्फत गाडगेबाबांची वेशभुषा धारण करून ग्रामस्वच्छता अभियान राबवितात व 'कीर्तन गाडगेबाबाचं' सादर करून युवकांना रक्तदानाचा संदेश देतात.

समाजातील युवक व रक्तदात्यांपर्यंत रक्तदान जनजागृती तसेच रक्तदानाचा संदेश पोहचावा यासाठी राजनंदिनी फिल्म्स द्वारा संतोष बायस्कार तऱ्हाळकर निर्मित 'नातं रक्ताचं' हा एक तासाचा लघुचित्रपट निर्माण केला आहे.

# वीर चक्र प्राप्त कॅप्टन भिवसन अंभोरे यांचा नावाचा शिलालेख रेल्वे स्टेशनच्या दर्शनी भागात लावा

## माजी सैनिक संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



येथील रेल्वे स्टेशनमध्ये वीर चक्र प्राप्त ऑनरेरी कॅप्टन नायब सुभेदार स्मृतीशेष भिवसन अंभोरे हे वाशीम जिल्ह्यातील रिठद येथील मुळ रहिवासी असलेले महार रेजिमेंट यांनी सैन्यात क्षणांनी दि १७ सप्टेंबर १९६५ रोजी भारत पाक युध्दादरम्यान भारतीय सैन्यात शौर्य आणि कर्तव्याप्राप्ती त्यांना भारत सरकारने वीर चक्र शौर्य पदक बहाल केले होते. म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने वाशीम रेल्वे स्टेशनवर त्यांच्या नावांचे शिलालेख महाराष्ट्र राज्याचे पहीले कृषी मंत्री नामदार आबासाहेब खेडकर यांचे हस्ते १९६७ रोजी शिलालेखाचे अनावरण करण्यात आले होते.

परंतु अमृत भारत स्टेशन अंतर्गत दक्षीण मध्ये रेल्वेने वाशीम रेल्वे स्टेशन स्थानकाचे नुतनीकरणाचे काम सुरू आहे. जुने रेल्वे स्टेशन तोडून नवीन रेल्वे स्टेशन बांधकाम सुरू आहे. तेंव्हा नविन रेल्वे स्टेशनच्या भिंतींवर ऑनररी कॅप्टन नायब सुभेदार स्मृतीशेष भिवसन अंभोरे वीर चक्र यांच्या नावांचे पूर्वी प्रमाणे नवीन शिलालेखाचे नुतनीकरण करून लावण्यात यावे.

अशी मागणी दि. १३ मार्च २०२६ रोजी त्रिदिप आजी माजी सैनिक बहुउद्देशीय संघटना वाशीम वतीने संघटनेचे अध्यक्ष दिपक ढोले, सचिव काशीनाथ भिसे, सहसंघटक रमेश भगत व डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी दक्षीण मध्ये रेल्वे विभाग नांदेड अंतर्गत वाशीम रेल्वे स्टेशन मास्टर यांना निवेदनाद्वारे मागणी करून सविस्तर चर्चा केली आहे.

यावेळी निवेदनातून अशी मागणी केली आहे की, वीर चक्र प्राप्त कॅप्टन नायब सुभेदार स्मृतीशेष भिवसन अंभोरे यांचे कार्य हे कौतुकास्पद असून त्यांचा सन्मान म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा व वाशीम जिल्ह्यांचा सन्मान होण्यासाठी वीर चक्र प्राप्त कॅप्टन नायब सुभेदार स्मृतीशेष भिवसन अंभोरे यांच्या नावांचा शिलालेख रेल्वे स्टेशनवर दर्शनी भागात लावावा. निवेदनावर संघटना अध्यक्ष दिपक ढोले, सचिव काशीनाथ भिसे, सहसंघटक रमेश भगत व डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांचेसह संघटनेच्या आजी माजी सैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०८ ■ सोमवार, १६ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# एआयकडे वळा, शेती समृद्ध करा-पालकमंत्र्यांचे आवाहन

## -महाविस्तार ॲप नोंदणीत वर्धा राज्यात अव्वल; सेवाग्राम येथे 'कॉटन परिषद' लवकरच



**वर्धा जनमाध्यम :** शेतकऱ्यांचे जीवनमान अधिक समृद्ध करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार अत्यावश्यक असून उत्पादन वाढीसोबत खर्चात बचत साधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सेलसुरा येथे अन्न व पोषण सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय कृषि व स्ट्रॉबेरी महोत्सवाचे उद्‌घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ चे संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सरिता गाखरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जीवन कतोरे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर, उपविभागीय कृषि अधिकारी वैष्णवी शिंदे, उपसंचालक राणी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण नियमितपणे मिळावे यासाठी सेलसुरा येथील कृषी विज्ञान केंद्रात स्वतंत्र शेतकरी सभागृह उभारण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीमार्फत सादर करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. जिल्ह्यातील स्ट्रॉबेरी, टोमॅटो व भाजीपाला उत्पादकांना योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र मंच स्थापन करून शेतकऱ्यांना थेट बाजारभाव व विक्री व्यवस्थेबाबत माहिती द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने सन २०२६ हे वर्ष महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रगतिशील महिला शेतकरी व कृषी सखींसाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे अभ्यास दौरा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आहे. विदर्भ हा कापूस उत्पादनासाठी प्रसिद्ध असल्याने उत्पादन वाढ व तांत्रिक मार्गदर्शनासाठी सेवाग्राम येथे लवकरच कॉटन परिषद आयोजित करण्याबाबत नियोजन सुरू असल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली.

एआयवर आधारित 'महाविस्तार' कृषी ॲपच्या नोंदणी मोहिमेत वर्धा जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल जिल्ह्यातील शेतकरी व कृषि विभागाचे त्यांनी विशेष कौतुक केले. आधुनिक बियाणे, यांत्रिकी साधने, सुधारित वाण आणि वैज्ञानिक पद्धतींचा वापर करून शेती अधिक उत्पादनक्षम करणे शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतीसोबत फळबाग, भाजीपाला, दुग्धव्यवसाय यांसारख्या पूरक व्यवसायांकडे वळल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पालकमंत्र्यांनी गौशाळा, रोपवाटिका तसेच नैसर्गिक पद्धतीने तयार होणाऱ्या जैविक किटकनाशक प्रयोगशाळेची पाहणी केली. जिल्ह्यातील प्रगतिशील व प्रयोगशील शेतकरी तसेच कृषी विभागातील अधिकारी-कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

जिल्हाभरातून मोठ्या संख्येने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाबद्दल उत्सुकता, आत्मविश्वास आणि बदलाची सकारात्मक चाहूल स्पष्टपणे जाणवत होती. आधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळाल्यास शेती केवळ व्यवसाय न राहता समृद्धीचा मजबूत पाया ठरू शकते, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

# डीजे धुमाल वाहनाला मालवाहूची धडक : १ ठार, १४ जखमी

## वर्धा-आर्वी मार्गावर मध्यरात्री भीषण अपघात



**खरांगणा (मो.) जनमाध्यमः** वर्धा-आर्वी मार्गावरील खरांगणा (मो.) परिसरात मध्यरात्री भीषण अपघात होऊन एक जण ठार तर १४ जण जखमी झाले. समोरासमोर झालेल्या या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली.

ही घटना शनिवार-रविवारच्या मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास घाट मार्गावर घडली. मिलिंद उर्फ मिलन अनिल एकापुरे (वय २५, रा. सुकळी-भादोड) असे मृताचे नाव आहे. तो एमएच-४० एन-२६३८ क्रमांकाच्या मालवाहू वाहनाने खरांगणाहून आर्वीकडे जात होता. त्याच वेळी एमएच-३१ एफसी-५६६६ क्रमांकाचे डीजे धुमाल बँड पार्टीचे वाहन आर्वी येथील विवाह सोहळा आटोपून वर्धाकडे परतत होते.

घाट मार्गावर दोन्ही वाहने समोरासमोर येताच जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की दोन्ही वाहने उलटली व चक्काचूर झाली. या दुर्घटनेत मालवाहू चालक मिलिंद एकापुरे याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा साथीदार मोहन उईके गंभीर जखमी झाला.

धुमाल बँडच्या वाहनातील चालक जतीन सुहाढोल याच्यासह सुन्नू वर्मा, लकी झुनझुनकर, जतीन वाघमारे, प्रज्वल वाघमारे, ऋषिकेश भोसकर, मनीष भोयर, अभय खोकडे, राहुल खेकडे, अभय चौरे, अतिश भोसकर, पवन भोयर, योगेश सावरकर, मनीष बिहाडे आदी जखमी झाले. सर्व जखमींना स्थानिकांच्या मदतीने तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. त्यांनी बचावकार्य सुरू करून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली व पंचनामा केला.

या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

### लालपरी गायब शासन झोपेत, मुली उन्हात

# शाळा की शौर्यपरीक्षा? वाघ-अस्वलांच्या भीतीतून मुलींचा सहा किमी प्रवास



**आष्टी शहीद जनमाध्यम :** मुलींसाठी मोफत शिक्षण, मोफत पास, सबलीकरणाच्या गप्पा पण बम्बरडा गावातील शालेय मुलींच्या वाट्याला मात्र कडक उन्हात सहा किलोमीटरची जीवघेणी पायपीट आष्टी तालुक्यातील या दुर्गम गावात आजही एसटीची लालपरी पोहोचत नसल्याने शासनाच्या योजनांची पोलखोल झाली आहे.

आष्टीपासून सुमारे १५ किमी अंतरावर घनदाट जंगलात वसलेले बम्बरडा गाव आदिवासी व गवळी समाजाचे आहे. शेती व दुग्धव्यवसायावर गुजराण करणाऱ्या या गावात अस्वल-वाघांचा वावर असतानाही मुलींना रोज जीव मुठीत धरून शिक्षणासाठी बाहेर पडावे लागते. रस्ता तयार असूनही बससेवा सुरू नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

विद्यार्थिनी गावातून पायदळ चालत चामला व पुढे थार गावापर्यंत जातात, तेव्हाच बस मिळते. शाळा सुटल्यानंतर पुन्हा तोच धोकादायक प्रवास करावा लागतो. जंगल, निर्जन रस्ता आणि हिंस्त्र प्राण्यांची भीती शिक्षणासाठी इतकी मोठी किंमत या मुलींना मोजावी लागत आहे.

पोलीस पाटील मोहित बगलेकर यांनी हा प्रकार कॅमेऱ्यात कैद करून अधिकाऱ्यांकडे धाव घेतली, मात्र ठोस उपाययोजना अद्याप नाही. उलट तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याची ग्रामस्थांची खंत आहे. घरापर्यंत लालपरी हा फक्त घोषणांचा फुगा आहे का असा प्रश्न आता बम्बरडा ग्रामस्थ विचारत आहेत.

# आनंदयात्रा ठरली भययात्रा; पिकनिकसाठी निघालेल्या कुटुंबांवर दुर्घटनेची छाया

## -मृत्यूच्या दाढेतून बचाव; घाटात ऑटो पलटला, सुदैवाने सर्वजण जखमी अवस्थेत बचावले



**सेलू जनमाध्यम :** नागपूर येथील दोन कुटुंबीय पिकनिकसाठी निघाले असताना देवळी-पेंढरी परिसरातील घाट मार्गावर त्यांचा ऑटो उलटून अपघात झाला. या दुर्घटनेत लहान मुलांसह आठ जण जखमी झाले. ही घटना रविवारी दुपारी सुमारे १.३० वाजता घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या सुभाषनगर येथील सिन्हा व डोंगरे कुटुंबीय एमएच-४९ एस-४४३६ क्रमांकाच्या ऑटोने बोरधरण येथे जात होते. देवळी-पेंढरी घाट मार्गावर वाहन पोहोचल्यावर अचानक ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व ऑटो उलटला. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले.

त्यानंतर सर्व जखमींना नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रज्वल लटारे यांनी जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली.

या अपघातात समर सिन्हा (१२), अनु सिन्हा (१५), प्रशांत डोंगरे (१४), संगीता डोंगरे (३२), गुंजन डोंगरे (३१), तिलेश सिन्हा (३६), मदनलाल सिन्हा (५०) व आदर्श सिन्हा (३) हे जखमी झाले असून सर्वजण नागपूर येथील रहिवासी आहेत.

# पोलिस भरती १३४ पदांसाठी लेखी परीक्षा शांततेत; १६ उमेदवारांची दांडी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा पोलिस दलातील १३४ रिक्त पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेली लेखी परीक्षा रविवारी (१५ मार्च) कडेकोट बंदोबस्तात शांततेत पार पडली. पात्र ठरलेल्या १,७११ उमेदवारांपैकी १,६९५ जणांनी परीक्षा दिली, तर १६ उमेदवारांनी ऐनवेळी दांडी मारली.

**१,७११ पात्रांपैकी १,६९५ जणांनी दिली परीक्षा : निकालाकडे लागली हजारो डोळ्यांची नजर**

शारीरिक व मैदानी चाचण्यांनंतर घेतलेल्या या परीक्षेमुळे भरती प्रक्रियेचा अंतिम टप्पा जवळ आला असून आता निकालाकडे उमेदवारांचे लक्ष खिळले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून परीक्षा केंद्र परिसर पोलिसांनी अक्षरशः किल्लेबंद केला होता.

भरतीसाठी तब्बल ७,३१३ अर्ज प्राप्त झाले होते. ११ ते २३ फेब्रुवारीदरम्यान पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर शारीरिक व मैदानी चाचण्या घेण्यात आल्या. त्यात ५,५९९ उमेदवार सहभागी झाले, तर १,७१४ जण अनुपस्थित राहिले. या प्रक्रियेत २,०२५ उमेदवार अपात्र ठरले, तर सुमारे ३,५७४ जण पुढील टप्प्यासाठी पात्र झाले.

# शिवशाही बसप्रवासात साडेचार लाखांचे दागिने लंपास

## बॅग मागील सीटवर ठेवण्याचा गैरफायदा; अज्ञाताविरुद्ध गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-यवतमाळ दरम्यानच्या बसप्रवासात एका महिलेच्या बॅगेतील सुमारे साडेचार लाख रुपयांचे सोन्या-हिऱ्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर १४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

किरण ठाकरे (वय ५२, रा. आनंदनगर, यवतमाळ) या पतीसमवेत पुणे येथे गेल्या होत्या. ९ रोजी त्या सकाळी वर्धा येथे पोहोचल्या. त्यानंतर यवतमाळला जाण्यासाठी वर्धा बसस्थानकावरून त्यांनी शिवशाही बसमध्ये प्रवास सुरू केला. त्यांच्याकडे चार बॅगा असल्याने काही बॅगा त्यांनी बसच्या मागील रिकाम्या आसनांवर ठेवून स्वतः पुढील सीटवर बसल्या.बस यवतमाळ ासस्थानकावर पोहोचल्यानंतर त्यांनी सर्व बॅगा घेतल्या आणि घरी गेल्यानंतर त्या उघडल्या असता कपडे अस्ताव्यस्त असल्याचे दिसून आले. ट्रॉली बॅगेत ठेवलेले ३५ ग्रॅम वजनाचे सुमारे अडीच लाख रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र, १५ ग्रॅम वजनाचे सुमारे एक लाख रुपयांचे दुसरे मंगळसूत्र, सुमारे एक लाख रुपयांचे कट डायमंडचे कानातले तसेच इतर कृत्रिम दागिने असा एकूण सुमारे ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे निदर्शनास आले.

घटनेनंतर किरण ठाकरे यांनी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी यवतमाळ पोलिसांनी प्रकरण वर्धा शहर पोलिसांकडे वर्ग केले आहे. बसप्रवासादरम्यान सामानाबाबत अधिक सतर्कता बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## विकासाचा जीवनदुवा अखेर मार्गी

# सायखेडा-गोकुळसरा पुलासाठी दिल्ली हादरली

### नितीन गडकरी यांचा हिरवा कंदील : ग्रामस्थांच्या डोळ्यांत आनंदाश्रू



**वर्धा जनमाध्यम :** गावासाठी आईच्या मायेने झटणारा नेता लाभला, तर विकासाची पहाट उगवायलाच हवी आणि सायखेडा-गोकुळसरा परिसरात ती पहाट अखेर उगवत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तालुक्यातील गोकुळसरा येथील ग्रामस्थांनी खासदार अमर काळे यांची भेट घेऊन कृतज्ञतेने धन्यवाद अर्पण केले. दिल्लीच्या सत्तादालनात गावाचा आवाज पोहोचवणाऱ्या या पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू तर ओठांवर आभारांची ओंजळ होती.

पाणीटंचाई, रस्त्यांची दुर्दशा, वीजपुरवठ्याचे प्रश्न आणि मूलभूत सुविधांची कमतरता या सर्व वेदनांना खासदारांनी संसदेतून आवाज दिला. संबंधित विभागांशी सातत्याने पाठपुरावा करून गावाच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. आमच्या अस्तित्वाची दखल आता घेतली जात आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.वर्षानुवर्षे वर्धा नदी ओलांडताना जीव मुठीत धरावा लागणाऱ्या सायखेडा-गोकुळसरा परिसराला आता दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. वर्धा नदीवरील बहुप्रतिक्षित पुलासाठी खासदारांनी थेट दिल्ली गाठून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि सीआरएफ निधीतून तातडीची मंजुरी देण्याची मागणी केली. गडकरींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने पुलाच्या कामाला लवकरच वेग मिळणार, अशी आशा आता ठोस विश्वासात रूपांतरित होत आहे.

# बहिणीच्या वादातून साळ्याचा जावयावर जीवघेणा हल्ला

## छातीत चाकू भोसकून गंभीर जखमी; लहादेवीतील थरारक घटना

**आर्वी जनमाध्यम :** बहिणीसोबत वारंवार वाद का घालता, या कारणावरून संतापलेल्या साळ्याने जावयाच्या छातीत चाकू भोसकून त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील लहादेवी येथे घडली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमीवर सेवाग्राम येथे उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश कोकाटे (वय २३, रा. लहादेवी) याने जावई सुनील धुर्वे (वय २६, रा. लहादेवी) याच्या छातीत चाकू भोसकला. ही घटना १३ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता घडली. सुनील धुर्वे यांनी सुमारे वर्षभरापूर्वी उमेशच्या बहिणी भारती हिच्याशी प्रेमविवाह केला होता. या विवाहाला उमेशचा तीव्र विरोध असल्याने दोन्ही कुटुंबांत तणावाचे वातावरण होते आणि परस्पर संवादही बंद होता.

दरम्यान, घटनेच्या दिवशी सुनील आणि त्याची पत्नी भारती यांच्यात शाब्दिक वाद सुरू असताना उमेश तेथे आला. बहिणीच्या बाजूने बोलताना त्याचा सुनीलशी वाद वाढला आणि झटापट सुरू झाली. संतापाच्या भरात उमेशने जवळील चाकू काढून सुनीलच्या छातीत वार केला. रक्तबंबाळ अवस्थेत सुनील कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ हस्तक्षेप करून जखमीला आर्वी येथील रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी १४ रोजी तक्रार दाखल झाल्यानंतर उमेश कोकाटे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# उष्माघाताचा धोका वाढला; प्रशासनाची युद्धपातळीवर तयारी

## सरकारी रुग्णालयांत शितगृह, औषधसाठा मुबलक : ४० अंशांच्या उंबरठ्यावर जिल्हा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून तापमानाने चाळीशीचा टप्पा गाठल्याने उष्माघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी आरोग्य यंत्रणेने युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये विशेष शीतगृहे (कोल्ड रूम) तयार करण्यात आली असून आवश्यक औषधे, सलाईन आणि आपत्कालीन साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील एक जिल्हा सामान्य रुग्णालय, दोन उपजिल्हा रुग्णालये, आठ ग्रामीण रुग्णालये तसेच ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघातग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र थंड कक्ष तयार करण्यात आले आहेत. या कक्षांमध्ये कुलर बसविणे, तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी विशेष व्यवस्था करणे आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सतर्क ठेवणे अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उष्माघाताची लक्षणे दिसणाऱ्या रुग्णांना तातडीने या शितगृहात दाखल करून उपचार करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

उष्माघाताच्या उपचारासाठी आवश्यक इंजेक्शने, औषधे, सलाईन तसेच जीवनरक्षक साधनसामग्री उपलब्ध ठेवण्यात आली आहे. वाढत्या तापमानामुळे 'हॉट' होत चाललेल्या वर्धा जिल्ह्यात यंदा उष्माघातामुळे बळी जाऊ नयेत, यासाठी आरोग्य विभागाने कंबर कसल्याचे चित्र दिसून येत आहे.



**तापमान ४० अंशांच्या घरात-** होळी व धुलिवंदनानंतर जिल्ह्यातील तापमानात झपाट्याने वाढ झाली असून सध्या पारा ४० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचला आहे. आगामी दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमंत वाघ आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांच्या नेतृत्वात सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उष्माघातासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. काही रुग्णखाटा उष्माघातग्रस्तांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**कुठे किती राखीव रुग्णखाटा**

जिल्हा रुग्णालय :
आयसीयू — १० खाटा
पुरुष वॉर्ड — ५ खाटा
महिला वॉर्ड — ५ खाटा
बालरुग्ण — २ खाटा
आपत्कालीन विभाग-१ खाट
उपजिल्हा रुग्णालये (२) प्रत्येकी ५ खाटा
ग्रामीण रुग्णालये (८)- प्रत्येकी २ खाटा,प्राथमिक आरोग्य केंद्रे (३३) प्रत्येकी १ खाट

**लहान मुले व वृद्धांना विशेष धोका-** उन्हाळ्यात उष्माघाताचा सर्वाधिक धोका लहान मुले आणि वृद्धांना असतो. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पुरेसे पाणी पिणे, दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळणे, हलके व सैल कपडे वापरणे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे आरोग्य विभागाने आवाहन केले आहे.

# विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष पदासाठी गिरीश गांधी विजयी

**नागपूर/प्रतिनिधीः-** विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुका पार पडल्या असून आज अध्यक्षपदाच्या मतमोजणीचे निकाल जाहीर झाले आहे. त्यानुसार विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून गिरीश गांधी निर्वाचित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉ. गिरीश गांधी यांना एकूण २२६१ मते पडलीत. उर्वरित २२ कार्यकारणी सदस्य पदाचे निकाल उद्या रात्रीपर्यंत लागण्याची शक्यता आहे. त्यांचे फक्त ६०० मत मोजून झाले आहेत.

आज मतमोजणीला सकाळी साडेनऊ वाजता प्रारंभ झाला. अध्यक्षपदासाठी उभे असलेले पाच उमेदवाराना मिळालेली मते खालील प्रमाणे.

गिरीश गांधी यांना एकूण २६६१ तर प्रदीप दाते यांना ११८७ तसेच डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना ७०१ तर डॉ. रवींद्र शोभने यांना २०५ आणि रंजन दारव्हेकर यांना ११४ मते पडली. एकूण ६३ मतं अवैध ठरली आहेत. या निवडणुकीसाठी ४९३५ मतदारांनी आपला हक्क बजावला होता. गिरीश गांधी हे एकूण १४७४ मतांची आघाडी घेऊन विजयी झाले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी पारखी यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सदर मतमोजणी सुरू आहे. संपूर्ण मतमोजणी आणि उर्वरित सदस्यांचे निकाल उद्या रात्रीपर्यंत लागण्याची शक्यता आहे.

# ‘नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळयात फक्त हिंदूंचीच दुकाने हवी’




## भाजप नेते नितेश राणे यांचा इशारा

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात २०२७ मध्ये होणार असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात फक्त हिंदूंचीच दुकानं हवी. कुंभमेळ्याला हजेरी लावणाऱ्यांनी याच दुकानांतून खरेदी करण्याला प्राधान्य द्यावे. सिंहस्थ कुंभमेळ्यात जर कोणी मुसलमान दुकान लावण्याचा प्रयत्न करत असेल तर ते दुकान उखडून टाका असा इशारा भाजप नेते नितेश राणे यांनी दिली. ते नाशिकमध्ये हिंदू हित रक्षातर्फे आयोजित नित्य गरजांना आवश्यक अशा शेकडो हिंदू कारागीर व लघु व्यावसायिकांच्या यादीचे प्रकाशन व लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. याप्रसंगी नितेश राणे ‘हिंदूंचा रुपया हिंदूलाच’ या विषयावर बोलले. हिंदू व्यक्तीने त्याच्या गरजेच्या वस्तू आणि सेवांची खरेदी करताना हिंदू व्यवसायिकालाच प्राधान्य द्यावे, असे भाजप नेते नितेश राणे म्हणाले. याप्रसंगी मंचावर कामाख्या देवीचे कालीचरण महाराज, आमदार सीमा हिरे, हिंदू हित रक्षाचे प्रवीण जोशी उपस्थित होते.

भारतात हिंदूंच्या बाजूने आणि हिंदूंच्या हितासाठी बोलायचे नाही तर काय पाकिस्तानमधील इस्लामाबादमध्ये जाऊन बोलायचे ? असा प्रश्न भाजप नेते नितेश राणे यांनी उपस्थित केला. त्यांना ’गजवा - ए - हिंद’च्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारताला इस्लामिक राष्ट्र बनवायचे आहे. पण आम्ही हे कधीच होऊ देणार नाही. यासाठी सर्व हिंदूंनी एकत्र येण्याची गरज आहे. आपण सतर्क आणि जागरूक राहायला पाहिजे. कुणाच्याही जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रावर हिंदू असे लिहिलेले असते, त्यावर मंत्री किंवा आमदार असे लिहिलेले नसते. त्यामुळे शेवटच्या श्वासापर्यंत मी हिंदूंसाठी उभा आहे. आज जर आपण हिंदू म्हणून एकत्र आलो नाही तर पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही, असे मंत्री नितेश राणे म्हणाले.

आम्ही हिंदुत्ववादी विचाराचे सरकार निवडून देण्यासाठी तुमच्याकडे आलो होतो आणि तुम्ही हिंदुत्ववादी सरकार निवडून दिले. त्यावेळी आम्ही आश्वासन दिले होते की, आम्ही धर्मांतर विरोधी कायदा आणू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हिंदूंच्या रक्षणासाठी ठोस कायदे करण्याचे काम सुरू आहे. आम्ही आमदार व मंत्री फक्त हिंदूंमुळे बसलो आहोत त्यांनी आम्हाला मत दिले नाही आणि आम्ही त्यांच्याकडे मत मागायला देखील गेलो नाही.

# पवित्र पोर्टलशिवाय शिक्षक झालेल्यांची खैर नाही-मंत्री भुसे



**मुंबई :** पवित्र संगणक प्रणाली बंद असल्याचा गैरफायदा घेत काही शिक्षण संस्थांनी शिक्षकांची रिक्त पदे त्यांच्या स्तरावर भरली आहेत. मात्र पोर्टलशिवाय करण्यात आलेल्या शिक्षक नियुक्त्या शासन धोरणाशी विसंगत असल्याने त्यांना मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शुक्रवारी विधानसभेतील तारांकीत प्रश्नाच्या लेखी उत्तरात स्पष्ट केले.

पवित्र पोर्टल प्रणाली बंद होती, त्या काळातील शिक्षक नियुक्त्यांना मान्यता द्यावी, असे उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. मात्र त्याला शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्यावर अंतरीम स्थगिती दिलेली आहे. पवित्र पोर्टल कार्यन्वीत झाल्यानंतरच्या काळात पोर्टलशिवाय शिक्षक नियुक्त्यांची तपासणी करण्या साठी शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली विभागनिहाय समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत.राज्यात पवित्र पोर्टल पोर्टल डावलून अनेक शिक्षण संस्थांनी केलेल्या शिक्षक भरतीचे शासन काय करणार, असा ठाकरे शिवसेनेचे दिंडोशीचे आमदार सुनील प्रभू यांनी शुक्रवारी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. अनेक शिक्षण संस्थांनी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती करण्याऐवजी जुन्या मान्यता दाखवून शिक्षक भरती केल्याचे मध्यंतरी प्रकरण उघडकीस आले होते.

# सौरउर्जा प्रकल्पामध्ये महाराष्ट्र देशात पहिला



१ लाख ८ हजार घरांवर पॅनल बसविले

**मुंबई :** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमल बजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. देशात या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यांपैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले.

१ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकांवर आहेत.

महिना ३०० युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे, अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना सुरू आहे. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पातून ग्राहकांच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे त्याचे बिल शून्य होते. अतिरिक्त वीज विकून त्याला उत्पन्नही मिळते.

# ई-रिक्षा, बाईकसाठी परमिट बंधनकारक

## प्रक्रिया सुलभ करण्यासाठी परिवहन विभागाकडून ‘सिंगल विंडो’ पद्धतीची तयारी



**मुंबई :** राज्यात प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा, ई-बाईकसाठी यापुढे परिवहन विभागाकडून रितसर परमिट (परवाना) घेणे बंधनकारक करण्यात येणार आहे. पारंपरिक रिक्षा आणि टॅक्सीप्रमाणेच या वाहनांसाठीही समान नियम लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. याशिवाय परमिट मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी परिवहन विभागाकडून ‘सिंगल विंडो’ (एक खिडकी) पद्धत सुरू करण्याची तयारी सुरू आहे.

राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित दिली आहे. वाढत्या इलेक्ट्रिक वाहनांच्या पार्श्वभूमीवर प्रवासी वाहतुकीत नियमबद्धता आणण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाईकसाठी परमिट प्रक्रिया लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, आतापर्यंत ई-रिक्षांना प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या प्रवासी वाहनांसाठी एकसमान नियम लागू करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व वाहनांसाठी एकसारखी परमिट प्रणाली लागू होणार आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मानद डी. लिट द्या!



**मुंबई :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मानद डी. लिट (डॉक्टर ऑफ लिटरेचर) पदवी बहाल करावी, असा प्रस्ताव विद्यापीठाच्या शनिवारी पार पडलेल्या अधिसभा बैठकीत सादर करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींचा अभ्यास करून पुढील अधिसभेत हा प्रस्ताव सादर केला जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केले.

भाजप नेत्या आणि सिनेट सदस्य शीतल शेठ देवरूखकर यांनी हा प्रस्ताव सादर केला. सावरकर यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, इतिहास आणि साहित्य क्षेत्रात दिलेले योगदान यांचा उल्लेख करून त्यांना डी. लिट ही पदवी बहाल करावी, अशी मागणी शेठ देवरूखकर यांनी केली. त्याला ठाकरे गटाच्या युवासेनेने पाठिंबा दिला. मात्र सावरकर यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान वादातीत असल्याची भूमिका घेत प्राध्यापकांच्या बुक्टू या संघटनेने प्रस्तावावर तटस्थ भूमिका घेतली. सावरकरांनी मराठी साहित्यातही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी विज्ञाननिष्ठ राष्ट्रवाद जोपासला. सामाजिक समतेची मांडणी करून त्यांनी जातीय भेदभावाला विरोध केला होता, असे शेठ देवरूखकर यांनी प्रस्ताव सादर करताना बैठकीत सांगितले.

# गॅसटंचाईची झळ गोरगरिबांच्या ‘पारले-जी’ बिस्किटला




४ दिवसांपासून उत्पादन बंद

**मुंबई :** आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता थेट स्थानिक उद्योगांवर उमटू लागले आहेत. बुलढाणा जिल्ह्याच्या खामगाव येथील ‘शिवांगी बेकर्स’ कंपनी ही प्रसिद्ध ‘पारले-जी’ बिस्किटांचे उत्पादन करते. अशातच या कंपनीला गॅसच्या तीव्र टंचाईला समोर जावं लागलं आहे. त्यामुळे गेल्या गुरुवारपासुन हि कंपनी बंद पडली आहे. परिणामी, कंपनीच मोठे आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय शेकडो कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, शिवांगी बेकर्समध्ये प्रामुख्याने ’क्रीम’ आणि ’ग्लुकोज’ बिस्किटांचे उत्पादन घेतले जाते. येथील बिस्किट बनवण्याचे बेकिंग ओव्हन पूर्णपणे गॅसवर चालतात. मात्र युद्धाच्या संकटामुळे व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर मर्यादा आल्या आहेत, परिणामी कंपनीला आवश्यक असलेला गॅस पुरवठा खंडित झाला असून, ग्लुकोज ओव्हनसह संपूर्ण उत्पादन प्रक्रिया थांबवावी लागली आहे. कंपनीत सुमारे ५०० कामगार कार्यरत आहेत. उत्पादन बंद राहिल्याने या कामगारांच्या कुटुंबासमोर आर्थिक पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. कामगारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागेल, अशी भीती व्यक्त केली .

## बारामती अन् राहुरीची पोटनिवडणूक बिनविरोध होऊ द्या, अन्यथा..; देवेंद्र फडणवीसांचं आवाहन अन् इशाराही

**मुंबई** : बारामती विधानसभा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा या दोन्ही ठिकाणी बिनविरोध पोटनिवडणूक झाली पाहिजे. मात्र, आमच्यावर निवडणूक लादली गेली तर आम्ही लढायला तयार आहोत, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना आवाहन आणि इशारा दोन्हीही दिलं आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदारांचे निधन झाल्यामुळे या दोन्ही मतदारसंघात पुढील महिन्यातच निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर येथील मतदारसंघात निवडणुकांच्या हालचाली देखील सुरू झाल्या आहेत. त्यामुळे, मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी येथील निवडणुका बिनविरोध होण्याची मागणी केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांचे गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात निधन झाले. तेव्हापासून राहुरी विधानसभेची जागा रिक्त आहे. त्यामुळे, आता या जागेवर पोटनिवडणूक होणार असून निवडणुकीत भाजप राहुरी मतदारसंघातून कोणाला उमेदवारी देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस मानद ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित



**अहिल्यानगर**- राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित ३९ व्या पदवीप्रदान समारंभात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपालांच्या हस्ते ’डॉक्टर ऑफ सायन्स’ या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयसीएआर) माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंह, कुलगुरू डॉ. विलास खर्चे व राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांत शेती क्षेत्रात मूलगामी बदल करण्याचे काम शासनाने केले आहे. पायाभूत सुविधांमध्ये शाश्वत बदल करून कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविता येईल. पावसाचा पडणारा थेंब अन् थेंब साठविला पाहिजे, यासाठी शासनाने जलयुक्त शिवार योजना आणली; ज्यामुळे महाराष्ट्रात भूजल पातळी वाढली.

# लाडक्या बहिणींना मिळणार थेट ३ हजार रुपये



एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पैसे मिळेल

**मुंबई** -ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे. अशा कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दीड हजार रुपये जमा करण्यात येतात.

ही योजना महिला वर्गामध्ये चांगलीच लोकप्रिय झाली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून लाडक्या बहिणींना मिळणाऱ्या या लाभात अनियमितता आल्याचं दिसून येत आहे. मागील काही महिन्यांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत्या, या निवडणुकांच्या अचारसंहितेमुळे लाडक्या बहिणींना पैसे मिळण्यास विलंब झाल्याचं पहायला मिळालं. ती म्हणजे जानेवारी महिन्यानंतर या योजनेतील महिला लाभार्थ्यांना या योजनेचे पैसेच मिळाले नव्हते. मात्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार फेब्रुवारी महिना आणि मार्च महिना अशा दोन महिन्यांचे पैसे लाभार्थी महिलांना एकदाच मिळणार आहेत. नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये तीन हजार रुपये जमा होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# संक्षिप्त

## ४०४ अपघात प्रकरणांत ३६ कोटींची भरपाई

**मुंबई :** मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत मुंबई येथील मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात मोठ्या प्रमाणावर मोटार अपघात भरपाईच्या प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीत एका मोटार अपघात प्रकरणात तब्बल १ कोटी २० लाख इतक्या भरपाईची तडजोड करण्यात आली, जी या सत्रातील सर्वाधिक सेटलमेंट ठरली.या लोकअदालतीत एकूण ४०४ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली असून, त्यामध्ये तब्बल ३६ कोटी ४७ लाख २९ हजार ३४१ इतक्या रकमेची तडजोडीने भरपाई निश्चित करण्यात आली. त्यामुळे अनेक अपघातग्रस्त व त्यांच्या कुटुंबीयांना दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांतून मोठा दिलासा मिळाला. लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी एकूण ७ पॅनेल गठित करण्यात आले होते. या पॅनेलसमोर एकूण ६६९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी अनेक प्रकरणांमध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणण्यात आली आणि ४०४ प्रकरणांचा अंतिम निपटारा करण्यात आला.



## मुंबईच्या महापौर लाल दिव्यात अडकल्या

मुंबई -महापालिकेच्या नवनिर्वाचित महापौर रितू तावडे सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्यांच्या नव्या अधिकृत गाडीवर लावलेल्या लाल आणि निळ्या दिव्यांमुळे सध्या सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये चर्चा सुरू आहे. केंद्र सरकारने २०१७ मध्ये सामान्य सरकारी वाहनांवर लाल दिवा, नामफलक, ध्वज किंवा अधिकार दर्शवणारी चिन्हे लावण्यास बंदी घातली होती. त्यानंतर आता रितू तावडे यांच्या गाडीला लावलेले लाल-निळे दिवे पाहून अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, या प्रकरणावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ‘मी त्याची माहिती घेतली. लाल दिवा गाडीवर वैगरे नव्हता.



## आता एकच कनेक्शन, पीएनजी गॅसधारकांना गॅस सोडावा लागणार

**मुंबई :** देशातील वाढत्या गॅस टंचाईवर सरकारने भूमिका मांडली असून घरगुती गॅसधारकांसाठी कुठलाही तुडवटा नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. मात्र, केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या बुकिंगचा कालावधी वाढवला असून व्यवसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यामुळे, सरकार गॅसटंचाई नाही असे सांगत असले तरीही गॅसटंचाई गावागावात जाणवत आहे. त्यातच, केंद्र सरकारने आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता पीएनजी गॅस कनेक्शन असलेल्यांना एलपीजी गॅस कनेक्शन सोडावे लागणार आहे. त्यामुळे, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम नागरिकांच्या घरातील किचनवर झाल्याचं दिसून येत आहे.



## राज्यात उन्हाचा तडाखा वाढला

**पुणे :** राज्यात दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाने सोमवारपासून (१६ मार्च) शाळांच्या वेळेत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, राज्याच्या काही भागांत उष्णतेची लाट असतानाच विदर्भ आणि मराठवाड्यात अवकाळी पावसाचे सावट घोंघावत आहे.शनिवारी राज्याच्या अनेक भागांत उन्हाचा पारा ३८ अंश सेल्सिअसच्या पार पोहोचला होता. दुपारच्या सत्रात वाढणाऱ्या उष्णतेमुळे विशेषतः प्राथमिक शाळेतील चिमुकले विद्यार्थी अस्वस्थ होत आहेत. अनेक ग्रामीण शाळांचे छप्पर लोखंडी पत्र्याचे असल्याने दुपारच्या वेळी वर्गात बसणे असह्य होत होते.



## मंत्री विखे पाटील आणि मनोज जरांगे यांच्या विरोधात तक्रार

मुंबई - राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्यात १२ लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याची माहिती माध्यमांमध्ये दिली होती, मात्र हा आकडा फसवा असून प्रत्यक्ष वाटप अत्यंत कमी झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. तर दुसरीकडे, मनोज जरांगे पाटील यांनी ४ कोटी २२ लाख मराठा समाज कुणबी आरक्षणात गेल्याचे अनधिकृत आणि खोटे वक्तव्य केल्याचे या तक्रारीत म्हटले आहे. अशा प्रकारच्या चुकीच्या विधानांमुळे मराठा आणि ओबीसी समाजामध्ये अनावश्यक संशय आणि जातीय तणाव वाढत असून, हे वक्तव्य जाणीवपूर्वक केल्याचा आरोप विदुर लाघडे पाटील यांनी केला आहे.



## आखाती देशांतील युद्धाची गोंदिया-भंडारा राईस मिल उद्योगाला झळ

**गोंदिया :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम आता देशांतर्गत उद्योगांवरही स्पष्टपणे दिसू लागले आहेत. पूर्व विदर्भातील महत्त्वाचा मानला जाणारा राईस मिल उद्योग या परिस्थितीमुळे गंभीर संकटात सापडला आहे.गोंदिया जिल्हा ‘राईस सिटी’ म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भात गिरण्या असून त्यावर हजारो कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे.

## नोकरशाहीवर चाप कधी लावणार -वरुण सरदेसाई

**मुंबई:** विरोधी पक्षातील लोकांवर ईडी, सीबीआय, एसीबीच्या चौकशी लावल्या. त्यांना तुरुंगात टाकले पण ही संपूर्ण यंत्रणा खराब करणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांची कधी चौकशी लावली का. सरकार कोणाचेही असो. ‘आपल्या बापाचे जातेय काय’ अशा अर्विभावात नोकरशाही आहे, अशी टीका शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी विधानसभेत करुन भ्रष्टाचारी अधिकारी वर्गाला लक्ष केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भारताची भूमिका

आंतरराष्ट्रीय राजकारण किंवा युद्धाचे भारतात पडसाद उमटणे यात अस्वाभाविक असे काही नाही. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात इराणविरोधातील अमेरिका-इस्रायल युद्धामुळे उद्भवलेल्या परिस्थितीवरून गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. युद्ध, इंधन टंचाईबद्दल संसदेत चर्चा होणे अपेक्षित असले, तरी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर निवेदन करत असताना विरोधकांनी सभात्याग केला. पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करणे, नागरिकांची व भारतीय समुदायाची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि ऊर्जासुरक्षा व व्यापारासारख्या राष्ट्रीय हितसंबंधांचे संरक्षण करणे, या तिहेरी तत्त्वांवर भारताची भूमिका आधारलेली आहे, असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. आखाती देशांशी घनिष्ट आर्थिक संबंध व लोकसंपर्क असल्याने युद्धजन्य परिस्थिती भारतासाठी विशेष काळजीची बाब आहे, हे खरेच. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षणविषयक केंद्रीय समितीच्या १ मार्च रोजी झालेल्या बैठकीत भारतीयांची सुरक्षा, प्रादेशिक स्थैर्य, व्यापार व आर्थिक देवाणघेवाणीवर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आखाती देशांमधील भारतीय प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा विचार करून संबंधित मंत्रालयाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही दिले गेले. आखाती देशांमध्ये एक कोटी भारतीय राहतात. शिक्षण किंवा नोकरीसाठी हजारो भारतीय इराणमध्येदेखील आहेत. हा प्रदेश भारताच्या ऊर्जासुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. येथील अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे देशावर व्यापक परिणाम होऊ शकतात, अशी कबुली जयशंकर यांनी दिली. स्वातंत्र्योत्तर काळात कोरियन युद्ध थांबवण्यात भारताने महत्त्वाची भूमिका निभावली होती. कम्युनिस्ट गटातील उत्तर कोरिया व अमेरिकेसह पाश्चात्त्य गटांचे समर्थन लाभलेला दक्षिण कोरिया यांच्यात युद्ध सुरू झाले त्यावेळी भारताने सुचवलेला मध्यस्थीचा तोडगा संयुक्त राष्ट्रसंघाने मान्य केला आणि भारतीय शांतिसेनेच्या देखरेखीखाली जून १९५३ मध्ये कोरियात शांतता प्रस्थापित झाली होती.११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गगनचुंबी मनोऱ्यांना धडक दिली आणि पेंटॅगॉनवर हल्ला चढवला. अमेरिका मध्य पूर्वेतील नैसर्गिक स्रोतांवर ताबा मिळवत आहे. पॅलेस्टाईनविरोधी लढाईत इस्रायलला सहाय्य करत आहे. त्याविरोधात संघटन करण्यासाठी मुस्लिम कट्टरतावाद्यांनी धर्माचा आधार घेतला होता. त्याचवेळी काश्मीरपासून भारतातील नवी दिल्ली, मुंबई अशा शहरांतील अतिरेकी घटनांमध्ये वाढ झाली होती. मात्र जोपर्यंत अमेरिकेवर हल्ला झाला नव्हता, तोपर्यंत त्यांना याच्याशी काही देणे-घेणे नव्हते. परंतु तत्कालीन पंतप्रधान वाजपेयी यांनी तेव्हा धोरणीपणा दाखवला. अमेरिका व दोस्त राष्ट्रांनी दहशतवादविरोधी युद्ध छेडण्याची भूमिका घेतल्यावर भारताने राजनैतिक हालचाली करून, काश्मीरमधील दहशतवादालाही त्याच्याशी निगडित करून घेण्यात यश मिळवले.भारताचे सहकार्य आवश्यक असल्याने अमेरिकेने पाकिस्तानला काश्मीरमध्ये कारवाई न करण्याचा दम दिला. त्यानंतर काही काळ या घटना कमी झाल्या. १३ फेब्रुवारी २०१२ रोजी नवी दिल्लीतील इस्रायली दूतावासाशी निगडित कर्मचारी व एका राजनयिक अधिकाऱ्याच्या पत्नीला घेऊन जाणाऱ्या मोटारीवर कारबॉम्बद्वारे हल्ला झाला. यामागे इराणी अतिरेकी असल्याचा पोलिसांना संशय होता. इराण-भारत मैत्रीसंबंध पाहता आणि भारत तेथून मोठ्या प्रमाणावर तेल आयात करत असल्यामुळे हे प्रकरण चतुराईने हाताळणे आवश्यक होते. त्यावेळी हल्लेखोरांना मदत करणाऱ्या काहीजणांना अटकही झाली. आण्विक धोरणावरून नाटो देशांनी इराणची आर्थिक कोंडी केली. परंतु भारत त्यात सामील झाला नव्हता. त्यामुळे भारत-इराण संबंध बिघडवण्याच्या उद्देशाने इस्रायलच्या गुप्तचर संस्थांनी दिल्लीतील बॉम्बहल्ल्याचे कारस्थान रचले असावे, अशा शंका वर्तवण्यात आल्या होत्या.सध्या इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला युद्धाच्या खाईत लोटले आहे आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांबद्दलची चिंता जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक व्यापार संघटना अशा सर्वांनीच व्यक्त केली आहे. हे युद्ध चुटकीसरशी संपेल आणि इराण ताबडतोब शरण येईल, अशा वल्गना ट्रम्प करत होते. परंतु तसे घडलेले नाही. कोणत्याही मुद्द्याचे किंवा समस्येचे निराकरण केवळ लष्करी कारवाईने होऊ शकत नाही. नियम, कायदे, संवाद आणि कूटनीती हाच कोणत्याही संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग असतो, हीच भारताची भूमिका राहिली आहे. युद्धातून मार्ग काढण्यासाठी भारताने युद्धात सहभागी झालेल्या अथवा ज्यांच्यावर हल्ला झाला, त्या देशांच्या प्रमुखांशी चर्चा केली. अमेरिकेबरोबरचा भारताचा व्यापार मोठा असून, चीनला शह देण्यासाठी भारताला अमेरिकेशी संबंध दृढ करणे आवश्यक आहे.इस्रायल हा भारताचा प्रमुख संरक्षण भागीदार असून, भारत इस्रायलकडून प्रगत क्षेपणास्त्रे, रडार प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्धसामग्रीची आयात करतो. इस्रायलमधील एल्बिट कंपनीच्या सहकार्याने हैदराबादमध्ये ड्रोन आणि सुटे भाग यांची निर्मिती केली जाते. तर ग्वाल्हेरमध्ये लहान शस्त्रांचे उत्पादन होते. अंतराळ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारत-इस्रायल भागीदारी वाढत आहे. इस्रायल भारताला ब्रह्मोसपेक्षाही वेगवान असे 'गोल्डन होरायझन' क्षेपणास्त्र देणार आहे. याउलट भारत आणि इराण यांचे संबंध प्राचीन असले, तरीदेखील भारत-इराण व्यापार गेल्या सहा-सात वर्षांत १७ अब्ज डॉलर्सवरून १.६८ अब्ज डॉलर्सवर आला आहे. परराष्ट्र धोरण ठरवताना कोणत्याही गटात सामील न होता भारताने प्रथम आपले आर्थिक, व्यापारी व संरक्षणात्मक हित महत्त्वाचे मानण्याचे धोरण स्वीकारले. शेवटी तात्त्विक भूमिकेचे अवडंबर न माजवता व्यवहार जपणे आणि त्याचवेळी जागतिक शांततेसाठी आग्रही भूमिका घेणे, ही भारताची परराष्ट्रनीती राष्ट्रहिताची असली तरी, सध्याच्या तणावपूर्ण युद्धस्थितीत त्यावर ठाम राहताना संबंध बिघडणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे मोठे आव्हान आहे.

# कर्जमाफी योजनेतील घोळ यंदा तरी संपेल?

**यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्र्यांनी शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. याआधीही केंद्राने आणि राज्याने कर्जमाफी योजना जाहीर केल्या होत्या. पण त्यांच्यातील अनेक त्रुटींमुळे त्यांचा शेतकऱ्यांना पुरेसा आणि नीट फायदा होऊ शकला नाही. यामुळे या कर्जमाफी योजनेचा किती शेतकऱ्यांना लाभ मिळणार याकडे सगळ्यांचे लक्ष असेल.**

राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांची कर्जमाफी हा महत्त्वाचा आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. राज्यात अजूनही ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या कृषी आणि संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे. राज्यात सिंचनाची पुरेशी व्यवस्था नसल्याने शेती पावसावरच अवलंबून असते. अशा वेळी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'च्या माध्यमातून शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करून दिलासा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

अर्थात, या योजनेचा किती शेतकऱ्यांना लाभ मिळणार यावर सारे अवलंबून असेल. कारण केंद्राची एक, तर राज्याच्या दोन अशा तीन कर्जमाफी योजनांमध्ये अनेक त्रुटी राहिल्या होत्या. अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्र्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाईल, असे जाहीर केले. तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. सरसकट सर्व शेतकऱ्यांना लाभ मिळणार का, याची अद्याप स्पष्टता नाही. कर्जमाफीच्या संदर्भात 'मित्र' संस्थेचे प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील सर्व बँकांमध्ये शेतकऱ्यांचे किती कर्ज थकीत आहे याची आकडेवारी जमा केली आहे. समितीचा अहवाल सादर झाल्यावरच शेतकऱ्यांची संख्या समजू शकेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. समिती एप्रिलमध्ये अहवाल सादर करेल. त्यानंतरच सरकार पुढील कार्यवाही करेल. त्यानंतरच कर्जमाफीची अंतिम आकडेवारी समजू शकेल. कर्जमाफीची अंमलबजावणी करताना अशा काही अटी घातल्या जातात की, अनेक शेतकरी या योजनेत टिकू शकत नाहीत.

केंद्र सरकारच्या २००८च्या कर्जमाफी योजनेतून तसेच राज्य सरकारने राबविलेल्या दोन कर्जमाफी योजनांमधून शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले. पण कर्जाच्या संकटातून शेतकरी बाहेर येऊ शकला नाही. कर्जमाफीचा फायदा बँकांना अधिक होतो, अशी टीका होते. अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच आहेच. गेल्या काही वर्षांत सरकारने कर्जासाठी सहकारी बँकांपेक्षा राष्ट्रीयीकृत तसेच व्यावसायिक बँकांना प्राधान्य दिले. सहकारी बँका स्थानिक पातळीवरील असल्याने कर्ज मंजूर होण्यात अडचणी येत नसत. राष्ट्रीयीकृत तसेच व्यापारी बँका कर्ज मंजूर करताना अनेक कागदपत्रांची मागणी करतात. ते टाळण्यासाठी शेतकरी खासगी सावकाराकडे वळतात. सावकाराकडून कर्जाच्या वसुलीसाठी तगादा लावला जातो. यातूनच सारे दृष्टचक्र सुरू होते.

### आधीच्या कर्जमाफी योजनांमध्ये अनेक त्रुटी

केंद्रातील काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २००८ मध्ये देशातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते. तेव्हा देशातील शेतकऱ्यांचे सुमारे ५२ हजार कोटींचे कर्ज माफ झाले होते. त्याचा काँग्रेसला २००९च्या लोकसभा निवडणुकीत राजकीय लाभही झाला. पण कर्जमाफीची योजना राबविताना अनेक त्रुटी आढळल्या होत्या. विशेषत: भारताचे महालेखापरीक्षक आणि नियंत्रकांनी (कॅग) या योजनेच्या अंमलजबजावणीवरून अनेक प्रश्न उपस्थित केले होते. कर्जमाफीचा लाभ मिळालेले ८.५ टक्के शेतकरी अपात्र होते. अनेक पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या योजनेचा लाभच मिळाला नाही. खासगी बँकांनी स्वत:चा फायदा करून घेतला. काही राज्यांमध्ये कर्जमाफीच्या फायद्यासाठी जुन्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड करण्यात आली होती. अशा अनेक त्रुटी 'कॅग'ला आढळल्या होत्या. अर्थात तेव्हा 'कॅग'च्या वतीने कठोर शब्दांत ताशेरे ओढले जात. आता 'कॅग'ची भाषा गुळमुळीत झाल्याची टीका होते.

महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस सरकारने २०१७ मध्ये राबविलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने'तही अनेक त्रुटी आढळल्या. या योजनेचा ३५ हजार कोटींचा बोजा तिजोरीवर आला होता. ती अमलात येऊन आठ वर्षे झाली तरी सहा लाख शेतकऱ्यांना या योजनेचा अद्यापही लाभ मिळालेला नाही. मध्यंतरी उच्च न्यायालयाने त्या योजनेतील पात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, असा आदेश दिला होता. फडणवीस सरकारची पहिली कर्जमाफी योजना यशस्वी ठरलेली नाही. सत्ताबदल झाल्यावर तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२३च्या अर्थसंकल्पात लाभापासून वंचित शेतकऱ्यांना कर्मजाफीच्या योजनेचा लाभ देण्याचे जाहीर केले होते. पण अजूनही सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही.

**महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत राबविलेल्या कर्जमाफी योजना**

- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना (२०१७-१८) : दीड लाखांपर्यंतचे कर्जमाफ – ३५ हजार कोटी खर्च (अजूनही काही शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही)
- महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०१९-२०) : दोन लाख कोटींपर्यंतचे कर्जमाफ – २२ हजार कोटी
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना (२०२६) : आकडेवारी अद्याप जाहीर नाही पण ३५ हजार कोटींचा बोजा अपेक्षित



उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने २०१९-२० मध्ये जाहीर केलेल्या 'महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'मुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे २२ हजार कोटींचा बोजा आला होता. फडणवीस सरकारच्या पहिल्या कर्जमाफी योजनेत गोंधळ झाला तशाच ठाकरे सरकारच्या कर्जमाफी योजनेत अनेक त्रुटी आढळल्या. अनेक पात्र शेतकरी या योजनेत अपात्र ठरले. आधार क्रमांक बँक खात्याला जोडलेला नसल्याने काही जण या योजनेतून वगळले गेले. नियमित कर्जाची परतफेड शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना तेव्हाही होती. पण अनेकांना ही रक्कमच मिळाली नाही.

केंद्रातील काँग्रेस सरकारची २००८ची देशपातळीवरील कर्जमाफी योजना किंवा राज्यात फडणवीस व ठाकरे सरकारने राबविलेल्या दोन कर्जमाफी योजनांमध्ये अनेक त्रुटी आढळल्या. काही ठिकाणी अपात्र शेतकऱ्यांनी सरकारी योजनेवर डल्ला मारला. तर काही ठिकाणी पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभच मिळालेला नाही. २०१७ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे सहा लाख शेतकरी अजूनही प्रतीक्षेत आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाच्या कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीतील गोंधळ व त्रुटी दूर करण्याचे फडणवीस सरकारसमोर आव्हान असेल.

### रिझर्व्ह बँकेचा धोक्याचा इशारा

विविध राज्य सरकारांकडून मतांसाठी शेतकऱ्यांना खूश करण्याकरिता कर्जमाफी योजना वेळोवेळी जाहीर केली जाते. विविध राज्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये दोन लाख कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. साधारणपणे निवडणुकांच्या तोंडावर शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाते. कर्जमाफी योजनेमुळे अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होतो, असा धोक्याचा इशारा वेळोवेळी रिझर्व्ह बँकेने राज्यांना दिला आहे. पण मतांसाठी राज्य सरकारांकडून या धोक्याच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले जाते. कधीतरी कर्ज माफ होईल या आशेवर मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जाची परतफेड करीत नाहीत, असे रिझर्व्ह बँकेचे निरीक्षण आहे. नवीन कर्जमाफी योजनेचा ३५ हजार कोटींचा बोजा येईल, असा प्राथमिक अंदाज आहे. म्हणजेच गेल्या दहा वर्षांत सरकारने जवळपास ९० हजार कोटींपेक्षा अधिक रकमेचे कर्ज माफ केले आहे. राज्यात प्रतिदिन सरासरी तीन शेतकरी आत्महत्या करतात, अशी कबुलीच सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रश्नोत्तराच्या तासात सरकारने दिली आहे. वाढता उत्पादन खर्च, शेतमालाला योग्य भाव न मिळणे, निसर्गाच्या लहरीपणाचा फटका, कर्जबाजारीपणा ही आत्महत्यांची कारणे त्यात देण्यात आली आहेत. कर्जमाफीने शेतकऱ्यांच्या जीवनमानात किती फरक पडला याचा अभ्यास राज्य सरकारने करणे अपेक्षित आहे. वैधानिक विकास मंडळे स्थापन केल्याने राज्याच्या मागास भागाच्या विकासावर किती परिणाम झाला याचा अभ्यास आयोगाने मागे केला होता.

### लोकप्रिय घोषणांचा विपरीत परिणाम


साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपाच्या वापरासाठी शेतकऱ्यांना वीज मोफत दिली जाते. त्यासाठी यंदाच्या वर्षात ३२ हजार कोटींचा बोजा आला. पुढील वर्षासाठी २० हजार कोटींची तरतूद करण्यात आली असली तरी अखेरच्या तीन महिन्यांसाठी ही रक्कम पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून वाढवावी लागण्याची शक्यता अधिक आहे. त्यातच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करण्यात आली. यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. राज्याचा अर्थसंकल्प हा ४०,५५२ कोटी महसुली तुटीचा तर दीड लाख कोटी वित्तीय तुटीचा असल्याने वित्तीय नियोजन आणखी कोलमडण्याची भीती व्यक्त केली जाते.'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'च्या अंमलबजावणीमुळे राज्य सरकारवर आधीच मोठा बोजा आहे. या योजनेसाठी अर्थसंकल्पात पहिल्या नऊ महिन्यांसाठी २७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यातील २१ हजार कोटी महिला व बालविकास विभाग तर सहा हजार कोटी अनुसूचित जाती व जमातीच्या निधीतून वळते केले जाणार आहेत. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अनुदानात १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढ, शेतकऱ्यांची कर्जमाफी तसेच शेतकऱ्यांना मोफत वीज अशी तीन लोकप्रिय घोषणांची आश्वासने दिली होती. यापैकी शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज दिली जाते. कर्जमाफीची घोषणा आता करण्यात आली आहे. लाडक्या बहिणींनी आता आपल्या अनुदानात १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढ कधी मिळते याची प्रतीक्षा आहे. 'आम्ही निवडणुकीपूर्वी आश्वासन दिले म्हणजे नक्कीच अनुदान वाढवून ते दरमहा २१०० रुपये करू, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. या अनुदानात नक्की कधी वाढ होणार याबाबत बहिणींना सध्या तरी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

शेतकऱ्यांची कर्जमाफीची घोषणा शक्यता निवडणुकीच्या तोंडावर केली जाते. पण राज्यात विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (२० जिल्हा परिषद निवडणुकांचे भवितव्य अद्यापही अधांतरीच आहे) पार पडल्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करून विरोधकांच्या भात्यातील एक शस्त्र काढून घेतले आहे. कर्जमाफी हा संवेदनशील विषय असल्याने शेतकऱ्यांमधील नाराजी वाढू नये या उद्देशाने मुख्यमंत्र्यांनी हे पाऊल उचलले असणार.

**संतोष प्रधान**

# यंदाही का करावा लागतो आहे अन्नत्याग?

१९ मार्च २६ रोजी (या वर्षीही) मला अन्नत्याग/उपवास करणे भाग पडले आहे. कारण या वर्षीही महाराष्ट्रात दोन हजाराहून अधिक शेतकऱ्यांना आत्महत्या करणे भाग पडले आहे. त्या थांबविण्यात मी कमी पडलो. सरकारकडून शेतकरीविरोधी कायदे रद्द करून घेणे या वर्षीही जमले नाही. या आत्महत्यांची सर्वस्वी जबाबदारी सरकारची आहे. पण सरकारला लाज वाटत नाही. सरकार कोडगे झाले आहे. सरकार मारेकरी असल्यामुळे त्याला शेतकरी मेल्याचे दुःख होत नाही. मी चळवळीतला कार्यकर्ता आहे. अजुनही माझ्या संवेदना जाग्या आहेत. निरपराध माणसाची पावले मरणाकडे जाताना पाहून माझे मन कासावीस होते. मरणाकडे जाणारी पावले मला थांबावता येत नाहीत, ही जाणीव मला अस्वस्थ करते. असाह्यतेची जाणीव करून देते. या जाणीवतून



मला अन्नत्याग / उपवास करावा लागतो.

१९ मार्च २०१७ला मी असा उपवास करण्याचे ठरवले. त्यास संतोष अरसोड सारख्या अनेक मित्रांनी पाठिंबा दिला. महागावला अनेक मान्यवर माझ्या सोबत उपोषणाला बसले होते. त्यानंतर दरवर्षी १९ मार्चला अन्नत्याग/उपवास होत आहे. लाखो लोक अन्नत्याग करतात. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात, देशात काही प्रमाणात व अन्य देशातील किसानपुत्र काही प्रमाणात सहभागी होतात. या दिवसाला 'शेतकरी सहवेदना दिवस' असे नाव पडले. अन्नत्याग करून दिवस पाळणारे हजारो कुटुंबे आहेत.

या दहा वर्षात सरकारवर शेतकरी आत्महत्याचा साधा ओरखडा देखील उमटला नाही पण शेतकरी जीवनात मोठी उलथापालथ झाली आहे. मागच्या दहा वर्षाच्या काळात शेती हे एकमेव उत्पन्नाचे साधन असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. हा एक मोठा बदल आहे. माझ्याकडे अधिकृत आकडेबारी उपलब्ध नाही पण माझा नजरी-अंदाज असा आहे की, आज ८५ टक्के ग्रामीण कुटुंबात शेतीबाह्य पैसा येऊ लागला आहे.

शेती हे जळते घरी आहे, आपण निखाऱ्यावर चालत आयुष्य काढले असले तरी हे जळते आयुष्य लेकरांच्या वाट्याला येऊ नये याची जाणीव झाल्या बरोबर १९८० पासून शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना शेतीतून बाहेर काढायला सुरुवात केली. हे शेतकऱ्यांचे उपजत शहाणपण होते. कोण्या नेत्याने सांगितले म्हणून त्यांनी हा मार्ग स्वीकारला नाही तर परिस्थितीने त्यांना हे शहाणपण दिले आहे. शहराच्या जवळच्या खेड्यात सत्तीच्या स्थलांतराचे प्रमाण खूप जास्त आहे. हे केवळ स्थलांतर नसून हे 'महान व्यवसायांतर' आहे. शेतीवरील अवलंबन कमी करनारी ही ऐतिहासिक घटना आहे.

शेतकरी आत्महत्या कोणत्या कुटुंबात होतात? हे बारकाईने पाहिले तर दिसून येते की १) तो अत्यल्पभूधारक असतो २) त्याचे एकमेव उत्पन्नाचे साधन शेती असते.

शेतजमिनीच्या विखंडनाचे मुख्य कारण सीलिंग कायदा आहे. हा कायदा कायदेभंग सत्याग्रह करून मोडता येतो नाही. सरकारी कायद्यामुळे शेतीचे


**अमर हबीब, आंबाजोगाई,**
किसानपुत्र आंदोलन
मो. ८४११९०९९०९

विखंडन शेतकरी थांबवू शकत नाही. तो कायदा सरकारच रद्द करू शकते. या ठिकाणी शेतकरी हतबल आहेत. पण 'उत्पन्नाचे एकमेव साधन शेती राहता कामा नये' यासाठी मात्र शेतकरी जीवाचा आटापिटा करू शकतात. तसा त्यांनी केला. ८५ टक्के शेतकरी कुटुंबात आज शेतीबाह्य पैसा येऊ लागला आहे. याचा अर्थ त्या कुटुंबातील आत्महत्या टळली आहे. आज फक्त १५ टक्केच शेतकरी कुटुंबावर आत्महत्यांची तलवार लटकती आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या घटली म्हणून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या त्या प्रमाणात घटली का?तर तसे दिसून येत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या तेवढ्या प्रमाणात कमी झालेली दिसत नाही. आजच्या पेक्षा दुप्पट कुटुंबे जेंव्हा शेतीवर अवलंबून होती, तेंव्हा जेवढ्या आत्महत्या होत असत, जवळपास तेवढ्याच आत्महत्या आजही होत आहेत. याचा अर्थ, शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती जास्त बिकट झाली आहे. काळोख अधिक गडद झाला आहे.

वरील पार्श्वभूमीवर यंदाच्या १९ मार्चला अन्नत्याग करणे संयुक्तिक ठरते म्हणून मी हा उपवास करण्याचे ठरवले आहे.२०१७ ला पहिला अन्नत्याग / उपवास मी चिलगव्हाण (दिवंगत साहेबराव करपे यांचे गाव) येथे सुरु केला होता. यावर्षी म. फुले यांच्या भावानी पेठ, पुणे येथील वाड्यात असणार आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करून १९ मार्चला अन्नत्याग करून आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांनां श्रद्धांधांजली अर्पण करणार आहे आणि शेतकरी स्वातंत्र्यासाठी शेतकरीविरिद्धी कायदे रद्द करण्याचा निर्धार करणार आहे. तुमचे तुम्ही ठरवा.

# आगीशी झुंज देताना वनपाल विजय सिंगणजुडे यांचे निधन!

## पुसदमध्ये शोककळा

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - जंगलाचे रक्षण करताना स्वतःचे प्राण पणाला लावणारे हिवरी वनपरिक्षेत्र अंतर्गत मनपूर वर्तुळातील वनपाल विजय सिंगणजुडे यांची जीवनयात्रा अखेर थांबली. जंगलातील भीषण आगीशी झुंज देताना गंभीर भाजलेल्या सिंगणजुडे यांनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतल्याने पुसदसह संपूर्ण यवतमाळ वनखात्यात शोककळा पसरली आहे. कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या या धाडसी वनरक्षकाला सर्व स्तरातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिवरी वनपरिक्षेत्रातील मनपूर नियत क्षेत्रातील कक्ष क्रमांक ४९५ मध्ये दि. ६ मार्च २०२६ रोजी भीषण वनअग्नी लागली होती. जंगलातील ही आग आटोक्यात आणण्यासाठी वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी जीवाची पर्वा न करता प्रयत्न करत होते. याच दरम्यान वनपाल विजय सिंगणजुडे हे आगीच्या विळख्यात सापडून गंभीररित्या होरपळले. त्यांना तातडीने उपचारासाठी यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील बेम्बडे हॉस्पिटल फॉर प्लास्टिक, कॉस्मेटिक, बर्न्स अँड हँड सर्जरी येथे हलविण्यात आले. तेथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. काही दिवसांत त्यांच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते आणि उपचारांना सकारात्मक प्रतिसादही मिळत होता. त्यामुळे कुटुंबीयांसह सहकाऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला होता. परंतु नियतीला काही वेगळेच मान्य होते. दि. १४ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० ते १२.४५ च्या दरम्यान अचानक त्यांना श्वास घेण्यास त्रास सुरू झाला आणि हृदयाचे ठोके थांबले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मावळली. जंगलाचे रक्षण करताना धैर्याने लढणारा हा कर्तव्यनिष्ठ वनपाल कायमचा निघून गेला. त्यांचे पार्थिव १५ मार्च रोजी पुसद येथील गांधी नगर परिसरातील त्यांच्या राहत्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच वन विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अश्रूंनी निरोप देत होते. त्यानंतर पुसद येथील मोक्षधाममध्ये शासकीय सन्मानात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी यवतमाळ वनवृत्ताचे मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर यांच्या उपस्थितीत स्व. विजय सिंगणजुडे यांना मानवंदना व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

उपवनसंरक्षक धनंजय वायभासे (यवतमाळ), बी.एन. स्वामी (पुसद), अभिजित वायकोस (वाशिम) यांच्यासह सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी दुःखद अंतःकरणाने या धाडसी सहकाऱ्याला अखेरचा निरोप दिला.

स्व. विजय सिंगणजुडे यांच्या पश्चात आई, पत्नी संध्याताई, मुलगा प्रणय, मुलगी खुशी आणि दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. कर्तव्य बजावताना कुटुंबाचा आधारवड हिरावून गेल्याने सिंगणजुडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. जंगलाचे रक्षण करताना स्वतःचे प्राण अर्पण करणाऱ्या या कर्तव्यनिष्ठ वनपालाची आठवण वनविभागासह संपूर्ण परिसर कायम जपून ठेवेल.

## चातारीचा दर्शन थोरकर क्रिकेटच्या पटलावर झळकला



उमरखेड - तालुक्यातील चातारी गावाने पुन्हा एकदा क्रिकेट क्षेत्रात आपली छाप उमटवली असून येथील तरुण क्रिकेटपटू दर्शन थोरकर याने उल्लेखनीय कामगिरी करत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. नागपूर येथे झालेल्या मुंबई इंडियन्स आंतरशालेय १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत दर्शन थोरकरने आपल्या संघाचे नेतृत्व करत संघाला विजय मिळवून दिला. या स्पर्धेतील अंतिम सामना द रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूल आणि राजेंद्र हायस्कूल यांच्यात झाला. कर्णधार म्हणून जबाबदारी पार पाडताना दर्शनने संघाला चार विकेट्सने विजय मिळवून देत उत्कृष्ट नेतृत्व दाखवले. तसेच उपांत्य सामन्यात पाच गडी बाद करत त्याने सामनावीराचा किताबही पटकावला. दर्शन सध्या नागपूर येथे महेंद्रसिंग धोनी क्रिकेट अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. त्याचे वडील शिवानंद थोरकर हे संभाजीनगर येथे यशस्वी उद्योजक असून सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. दर्शनच्या या यशामुळे चातारी गावासह उमरखेड तालुक्यात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आझाद मैदान मिना बाजार टेंडरप्रकरणी 'ऑनलाइन भ्रष्टाचाराचा आरोप; आयपी अ‍ॅड्रेस तपासणीची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ येथील आझाद मैदानावर भरविण्यात येणाऱ्या मिना बाजार व क्राफ्ट बाजारासाठी जागा वाटप प्रक्रियेत ऑनलाइन प्रणालीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणातील कथित भ्रष्टाचार उघडकीस आणण्याच्या मागणीसाठी पत्रकार परिषद घेण्यात आली असून, संबंधित आयपी अ‍ॅड्रेसची तपासणी करून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पंजाब उर्फ शंकर दलाराम चव्हाण (रा. केशव पार्क, यवतमाळ) यांनी आझाद मैदान येथे मिना बाजार व क्राफ्ट बाजारासाठी १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भाड्याने जागा घेतली होती. तसेच १२ मार्च २०२६ रोजी पुन्हा याच उद्देशाने अर्ज केल्याचे सांगण्यात आले. यावर्षीही हीच जागा पुन्हा चव्हाण यांनाच मिळण्याची शक्यता असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात संदीप रामदास गुल्हाणे व सागर नारायण देमनगुंडे (दोघेही रा. यवतमाळ) यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, उपविभागीय अधिकारी कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी संबंधित व्यक्तीसोबत संगनमत करून पैशांचा व्यवहार केल्यामुळे ऑनलाइन टेंडर प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा संशय आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, अशी त्यांची मागणी आहे. तसेच संबंधित व्यक्तीने "स्क्रिप्टिंग" व "बोट्स" या प्रकारच्या सॉफ्टवेअरच्या मदतीने ऑनलाइन बुकिंग विंडो सुरू होताच काही मिलीसेकंदात फॉर्म सबमिट केल्याचा आरोप करण्यात आला. सामान्य नागरिकांना अर्ज भरण्यासाठी ५ ते १० मिनिटे लागतात; मात्र विशिष्ट सॉफ्टवेअरच्या सहाय्याने काही लोकांकडून अल्पावधीत अनेक अर्ज भरले जाऊ शकतात, असा दावा त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर संबंधित व्यवहारात वापरलेल्या संगणकांचे आयपी अ‍ॅड्रेस तपासण्यात यावेत, तसेच ऑनलाइन प्रणालीचा गैरवापर झाला का याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रारही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, अशाच प्रकारचा प्रकार यापूर्वी म्हाडाच्या घरांच्या लॉटरी प्रक्रियेतही २०१७-१८ दरम्यान घडल्याचा उल्लेख करण्यात आला. त्या वेळी तांत्रिक फेरफार करून सॉफ्टवेअरच्या मदतीने काही सेकंदांत मोठ्या प्रमाणावर घरे बुक झाल्याचा आरोप झाला होता. या प्रकरणी अनिता पुनामेकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य (याचिका क्र. ७७/२०१८) अशी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती, ज्यामुळे म्हाडाच्या लॉटरी प्रणालीत नंतर बदल करण्यात आले होते. सदर प्रकरणातही ऑनलाइन प्रणालीचा गैरवापर झाला असल्यास संबंधितांवर कारवाई करावी व प्रक्रियेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

## • वेचक



### रवी भाऊ बनसोड यांचा ६५ वा वाढदिवस उत्साहात

महागाव - येथे जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने रवी भाऊ बनसोड यांचा ६५ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवाडे यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्य, पत्रकारिता, शिक्षक व आर्केस्ट्रा कलाकार म्हणून ओळख असलेल्या बनसोड यांच्या कार्याचा मान्यवरांनी गौरव केला. यावेळी भारत कावळे (API), कॉ. डी. बी. नाईक, सुरेश खंदारे, चंद्रकांत गिरी, रहीमभाई पठाण आदींसह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### जरांडी तांडा येथील ८० वर्षीय वृद्धेवरील अत्याचाराचा तीव्र निषेध; नराधमाला फाशी द्या!

पुसद - छत्रपती संभाजीनगर जिल्हा सोयगाव तालुक्यातील जरांडी तांडा येथे एका ८० वर्षीय बंजारा वृद्ध मातेवर झालेल्या अमानवीय बलात्कार प्रकरणाने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या घटनेचा अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला असून, आरोपीला 'फाशीची शिक्षा' देण्यात यावी, अशी आक्रमक मागणी करण्यात आली आहे. आज समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते संजय मदन आडे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना आडे म्हणाले की, "एका वृद्धेवर अशा प्रकारे अत्याचार होणे ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना आहे. समाजात अशा नराधमांना स्थान नाही. पीडित मातेला न्याय मिळवून देण्यासाठी हा खटला 'फास्ट ट्रॅक कोर्टात' चालवण्यात यावा आणि आरोपीला फाशीचीच शिक्षा व्हावी, ही आमची ठाम मागणी आहे." या निवेदनात प्रामुख्याने खालील मागण्या करण्यात आल्या आहेत: १. आरोपीवर कठोर कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला फाशीची शिक्षा द्यावी. २. खटल्याचा निकाल लवकरात लवकर लागावा यासाठी तो फास्ट ट्रॅक कोर्टात वर्ग करावा. ३. पीडित कुटुंबाला तातडीने शासकीय मदत व पोलीस संरक्षण मिळावे. जर प्रशासनाने यावर तत्काळ कठोर पावले उचलली नाहीत, तर अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. याप्रसंगी संजय मदन आडे यांच्यासह विकास राठोड, जिनकर राठोड, मनीष भाऊ जाधव शेतकरी नेते , सोनू पवार, अविनाश राठोड व बंजारा समाजातील इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### पाकीटमार २४ तासांत जेरबंद! आर्णी पोलिसांची तात्काळ कारवाई

आर्णी - बसस्थानक परिसरात प्रवाशाच्या खिशातील पाकीट चोरून नेणाऱ्या आरोपीला आर्णी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक करून गजाआड केले. ही घटना १३ मार्च रोजी घडली असून पोलिसांच्या तत्पर तपासामुळे गुन्ह्याचा वेगाने उलगडा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गणेश प्रताप लोकडे हे आर्णी येथून दिग्रसकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पँटच्या खिशातून पाकीट अलगद लांबवले. या पाकिटात सुमारे ९ हजार ७०० रुपये रोख रक्कम तसेच महत्त्वाची ओळखपत्रे होती. घटनेनंतर लोकडे यांनी आर्णी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. तपासादरम्यान तांत्रिक माहिती आणि मिळालेल्या सुगाव्यांच्या आधारे मोतीनगर (दिग्रस) येथील लादीन नावाच्या संशयिताला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी चौकशीदरम्यान पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून मुद्देमालातील २ हजार ५०० रुपये रोख रक्कम तसेच ओळखपत्रे जप्त करण्यात आली. याप्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावण्यात आर्णी पोलिसांना यश आले असून ही कारवाई पोलिस ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी मनोज, गुणवंत बोईनवाड, नितीन वास्टर, आकाश गावंडे आणि आसिफ खाल्लीखाऊ यांनी केली.

## पांढरकवड्यात गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रेरणा गॅस एजन्सीचे जाहीर आवाहन : अमित सिंघानिया

जनमाध्यम प्रतिनिधी




पांढरकवडा - शहरात सध्या घरगुती गॅस सिलिंडर पुरवठ्यात काही तांत्रिक व वितरणासंदर्भातील अडचणी निर्माण झाल्यामुळे ग्राहकांनी संयम बाळगून सहकार्य करावे, असे आवाहन प्रेरणा गॅस एजन्सीचे संचालक अमित सिंघानिया यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात त्यांनी सांगितले की, इंडियन ऑइल कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचणी येत असून सध्या मागणीच्या तुलनेत केवळ सुमारे २० टक्के गॅस सिलिंडरचा पुरवठा होत आहे. त्यामुळे काही प्रमाणात वितरणात उशीर होत आहे. तसेच मोठ्या संख्येने नागरिक एजन्सीच्या गोदाम व कार्यालयावर गर्दी करत असल्याने गॅस वाहतूक करणाऱ्या गाड्यांना रस्त्यातच थांबावे लागत आहे. एवढ्या मोठ्या गर्दीचे व्यवस्थापन करणे कर्मचाऱ्यांसाठी कठीण होत असल्याने नागरिकांनी गर्दी टाळावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. दरम्यान, काही हॉटेल व्यावसायिकांना सिलिंडर मिळत नसल्यामुळे बाजारातून जास्त दराने सिलिंडर खरेदी करण्याचे प्रकार घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही जण गरजेपेक्षा जास्त बुकिंग करून सिलिंडरचा काळाबाजार करत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ही बाब पूर्णपणे चुकीची असून प्रशासनाने हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडरचा वापर तातडीने बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गोंधळाच्या परिस्थितीत चोरी व हाणामारीचे प्रकारही घडत असल्याचे सांगताना आजच एका हॉटेल मालकाने गाडीतून दोन सिलिंडर घेऊन पळण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. मात्र एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी ते सिलिंडर परत आणल्याचेही सिंघानिया यांनी नमूद केले. प्रेरणा गॅस एजन्सीने गेल्या अनेक वर्षांपासून पांढरकवडा शहरात गॅस टंचाई दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

कोरोना काळ, उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा अशा प्रत्येक परिस्थितीत ग्राहकांच्या घरापर्यंत सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न केला असून पुढेही ही सेवा सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता घरी राहून नियमानुसार होम डिलिव्हरीची प्रतीक्षा करावी आणि एजन्सी व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही प्रेरणा गॅस एजन्सी यांनी केले आहे.

## जि.प. कर्मचारी पतसंस्थेतील नोकरभरती व भ्रष्ट कारभाराविरोधात सभासदांचे तीव्र आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था र.न. १०९ मधील कथित भ्रष्ट कारभार, आर्थिक अनियमितता आणि प्रस्तावित नोकरभरतीच्या विरोधात शेकडो सभासदांनी पतसंस्थेसमोर तीव्र आंदोलन केले. जि.प. प्राथमिक शिक्षक संघ र.न. २३५ यांच्या पुढाकाराने हे आंदोलन करण्यात आले.

एकेकाळी राज्यात अग्रगण्य मानली जाणारी ही पतसंस्था मागील चार वर्षांत अधोगतीकडे जात असल्याचा आरोप सभासदांनी केला आहे. सभासदांच्या मते संस्थेतील नियोजनशून्य कारभार, वाढता अनावश्यक खर्च आणि सुमारे ५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचलेला एन.पी.ए. यामुळे संस्थेचे आर्थिक भवितव्य धोक्यात आले आहे. सभासद संख्या आठ हजारांवरून सुमारे पाच हजारांपर्यंत घटली असून ठेवीत ६० कोटींची घट झाल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. अशा परिस्थितीत खर्चात कपात व एन.पी.ए. कमी करण्यावर लक्ष देण्याऐवजी संचालक मंडळाने नऊ जागांची नोकरभरती करण्याचा निर्णय घेतल्याने सभासदांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नौकरभरती तात्काळ रद्द करावी, कर्जावरील व ठेवीवरील व्याजदर ९ टक्के करावा तसेच पतसंस्थेतील भ्रष्टाचार थांबवावा, अशा विविध मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या. या आंदोलनात प्रवीण राणे, शशिकांत खडसे, अनिल सरतापे, अनिल भालेराव, प्रवीण कापर्तीवर, विनोद पाटील, कैलास चव्हाण यांच्यासह अनेक सभासद उपस्थित होते. नोकरभरती व भ्रष्टाचार तात्काळ थांबवला नाही तर पतसंस्थेसमोर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा आसाराम चव्हाण व इतर सभासदांनी दिला.

## एकाच छताखाली २००० हून अधिक सेवांचा लाभ!

### वाढोणा (बा.) येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' उत्साहात

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या निर्देशानुसार वाढोणा (बा.) येथे राम मंदिर देवस्थान परिसरात शनिवारी (दि. १४ मार्च) 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' उत्साहात पार पडले. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार अमित भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराची सुरुवात सकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून गावात काढलेल्या प्रभात फेरीने झाली. विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांनी या प्रभातफेरीत सहभाग घेतला. महसूल विभागासह पंचायत समिती, भूमी अभिलेख, कृषी, वन, पशुसंवर्धन, आरोग्य, महिला आर्थिक विकास महामंडळ, परिवहन मंडळ, पोलीस विभाग, पोस्ट विभाग, सहकार विभाग तसेच उमेद संस्था व प्रथम फाउंडेशन आदी विभागांनी स्टॉल उभारून नागरिकांना मार्गदर्शन व सेवा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्षस्थानी असलेल्या सुधीर पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. तहसीलदार अमित भोईटे यांनी प्रास्ताविकातून शिबिराची भूमिका स्पष्ट केली. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या योजनांची माहिती दिली. यावेळी महसूल विभागामार्फत ४८ जात प्रमाणपत्रे, १८ अधिवास प्रमाणपत्रे, १ राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, ६३० सातबारा उतारे, १७५ नमुना ८-अ, १० नवीन रेशन कार्ड, ६० दुय्यम रेशन कार्ड व २८ आधार कार्डांचे वितरण करण्यात आले. तसेच भूमी अभिलेख विभागाने १२५ प्रमाणपत्रे, एकात्मिक बाल विकास विभागाने ७० बेबी किट तर आरोग्य विभागाने ६८ नागरिकांची आरोग्य तपासणी केली. या शिबिरात समाज प्रबोधनात्मक कीर्तन, रक्तदान शिबिर तसेच युवकांसाठी प्रशिक्षण नोंदणीसारखे उपक्रमही घेण्यात आले. एकूण दोन हजारांहून अधिक प्रमाणपत्रे व विविध योजनांचे लाभ वितरित झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अर्थसंकल्पीय चर्चेत आ. किसनराव वानखेडे यांची विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्याची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - राज्याच्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेदरम्यान उमरखेड–महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांनी मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सरकारचे लक्ष वेधले. पायाभूत सुविधा, शेती, सिंचन आणि रोजगार निर्मिती या विषयांवर त्यांनी महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.

महागाव येथे सध्या पोलीस स्टेशनची स्वतंत्र इमारत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासी वसाहतीची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे महागाव येथे नवीन पोलीस स्टेशन इमारत व पोलीस वसाहत उभारण्यासाठी अर्थसंकल्पातून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकासाठी पीक पाहणी अ‍ॅपवरील नोंदणीची मुदत संपल्याने अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी पीक पाहणी अ‍ॅप नोंदणीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली. यासोबतच इसापूर डावा कालवा ० ते १५ किमीपर्यंत दुरुस्तीकरिता निधी मिळाला असला तरी १६ ते ५४ किमी दरम्यानचा कालवा अत्यंत नादुरुस्त असल्याचे सांगत त्याच्या दुरुस्तीकरिता अतिरिक्त निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच पैनगंगा नदी कोरडी पडल्याने परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्याने नदीपात्रात तातडीने पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी नमूद केले. देवसरी, दिघडी, उंचवडद, चातारी व बोरी परिसरातील कालव्यांची दुरुस्ती करून सिंचनासाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. याशिवाय मतदारसंघात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी किमान एक हजार कोटी रुपयांच्या विशेष निधीची तरतूद करून नवीन उद्योग-व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दमन–सिल्वासा शैक्षणिक सहल यशस्वी

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - मराठी विज्ञान परिषद मुंबई शाखा पुसद यांच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त २८ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान दमन, नगर हवेली व सिल्वासा परिसरासह शिर्डी, नाशिक, त्र्यंबकेश्वर, जव्हार, डहाणू, वापी व जुन्नर या ठिकाणांचा समावेश असलेली शैक्षणिक सहल यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीत सहभागी शिक्षकांनी विविध ऐतिहासिक, धार्मिक व शैक्षणिक स्थळांना भेट देत प्रत्यक्ष निरीक्षणातून माहिती घेतली.

सहलीच्या पहिल्या दिवशी शिर्डी येथे मुक्काम करण्यात आला. त्यानंतर नाशिक येथील बिटको राम मंदिर, मोक्षधाम, तसेच आगामी कुंभमेळा होणाऱ्या परिसराची पाहणी करण्यात आली. काळाराम मंदिर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १९३० मधील ऐतिहासिक सत्याग्रहाला ९६ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी पंजाबराव सुरोशे यांनी त्या आंदोलनाची माहिती दिली. पुढे जव्हार तालुक्यातील आदिवासी पाड्यांना भेट देऊन शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात आला. दमन येथे किल्ला, शासकीय कार्यालये व सार्वजनिक विद्यालयाला भेट देऊन शैक्षणिक कार्याची माहिती घेण्यात आली. विज्ञान प्रदर्शनीत प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थी ऋषी पटेल याचा सत्कार करण्यात आला. या सहलीचे आयोजन मराठी विज्ञान परिषद मुंबई शाखा पुसदचे अध्यक्ष पंजाबराव सुरोशे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या ज्ञानवर्धक सहलीत अनेक शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

## गटार योजनेच्या खड्ड्यात उतरून शिवसेना पदाधिकाऱ्यांचे लक्षवेधी आंदोलन

### योजनेच्या दिरंगाईने नागरिक हैराण

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - केंद्र व राज्य सरकारच्या सुमारे ३०२ कोटी रुपयांच्या अमृत योजनेचा यवतमाळ शहरात अक्षरशः फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. आजही शहरातील नागरिकांना पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक 21 मध्ये या योजनेअंतर्गत सुरू असलेल्या भूमिगत गटार कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात उतरून शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष तसेच सामाजिक कार्यकर्ते संजय उपगनलावार यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात परिसरातील नागरिकांनीही सहभाग घेत आपला संताप व्यक्त केला.

जीवन प्राधिकरणाने युद्धपातळीवर काम करून अमृत योजनेची कामे पूर्ण करावीत, यासाठी लोकप्रतिनिधींनी वारंवार सूचना दिल्या. तसेच नागरिकांनीही अनेकदा आंदोलनाचा मार्ग अवलंबला; मात्र तरीही ही योजना पूर्णत्वास गेलेली नाही. सन २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असलेली अमृत योजना अद्याप रखडलेलीच आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनातील नाराजी आणि संताप आज उफाळून आला. दाते कॉलेज रोड परिसरात भूमिगत गटार योजनेसाठी कंत्राटदाराने मोठा खड्डा खोदून ठेवला आहे. जेसीबीच्या कामादरम्यान अनेक पाईपलाईन फुटल्याने शास्त्रीनगर, दहीवलकर प्लॉट, शिवाजीनगर तसेच दाते कॉलेज परिसरातील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे.

आधीच सहा ते सात दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना अशा अडचणी निर्माण झाल्याने नागरिक हैराण झाले आहे. खोदलेला खड्डा अत्यंत मोठा असल्याने रस्ताही बंद झाला असून नागरिकांना वळसा घालून आपल्या घरी जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याने शिवसेनेचे पदाधिकारी संजय उपगनलावार यांनी पाण्याने भरलेल्या खड्ड्यात उतरून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. जीवन प्राधिकरणाचे अधिकारी उमप यांनी दोन दिवसांत संबंधित ठिकाणचे काम पूर्ण करून खड्डा बुजविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. दोन दिवसांत खड्डा बुजवून काम पूर्ण करण्यात यावे तसेच फुटलेल्या पाईपलाईनची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशा मागण्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेदरम्यान मांडण्यात आल्या आहेत. खड्ड्यात पडून नागरिकांच्या जीवाला धोका उत्पन्न होण्याची शक्यता असल्याने या मागण्या तातडीने पूर्ण करण्यात याव्या अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संजय उपगनलावार यांनी दिला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### लोकेश मडघे यांचा सत्कार

**अचलपूर-**तालुक्यातील कविठा येथील रहिवासी लोकेश माणिकराव मडघे यांनी चार्टर्ड अकाउंटंट ही कठीण व्यावसायिक पदवी प्राप्त करून गाव व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल अचलपूर तालुका काँग्रेस कमिटी (ग्रामीण) च्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी तालुका काँग्रेस कमिटी ग्रामीण अचलपूरचे अध्यक्ष नामदेवराव तनपुरे तसेच तालुका सेवा दलाचे अध्यक्ष सच्चिदानंदभाऊ बेलसरे यांच्या हस्ते लोकेश मडघे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### दिव्यांगांसाठी विशेष तपासणी मोहीम

**अमरावती-**जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे प्रलंबित दिव्यांग अर्जांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन युडीआयडी पोर्टलवर दिव्यांग प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केले आहेत, परंतु अद्याप वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहिलेले नाहीत, अशा सर्व अर्जदारांसाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.अर्जदारांनी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आपले मूळ अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा सामान्य रुग्णालयात उपस्थित राहावे. ही मोहीम पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी दिली.केंद्र शासनाच्या दिव्यांग अधिनियमांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, कॅन्सर, हृदयरोग, टी.बी., एचआयव्ही ग्रस्त, चर्मरोग व इतर दुर्धर आजार हे दिव्यांगत्वाच्या श्रेणीत मोडत नाहीत. त्यामुळे अशा आजारग्रस्तांनी ऑनलाईन अर्ज करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. अनेकदा माहितीअभावी असे रुग्ण अर्ज करतात आणि त्यांना आर्थिक तसेच शारीरिक त्रास सहन करावा लागतो. पात्र दिव्यांग बांधवांनी या संधीचा लाभ घेऊन आपली तपासणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन डॉ. पवार यांनी केले आहे.



### जागतिक स्थूलता दिनानिमित्त जनजागृती

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारे संचालित डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील बालरोग विभाग व इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स अमरावती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्थूलता दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम ४ मार्च २०२६ रोजी पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून स्थूलतेची वाढती समस्या व निरोगी जीवनशैलीचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.यावेळी बालरोग विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा काळे यांनी स्थूलतेच्या वाढत्या समस्येवर प्रकाश टाकत योग्य आहार, नियमित व्यायाम व संतुलित जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले.प्रमुख वक्ते डॉ. अविनाश सावजी होते. संचालन डॉ. आदित्य टांक यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, निवासी डॉक्टर, विद्यार्थी, रुग्ण तसेच नर्सिंग कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाद्वारे स्थूलता प्रतिबंध आणि निरोगी जीवनशैलीबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली.

### गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा

**चांदुरबाजार-** तालुक्यातील बेलोरा येथे गुढीपाडव्याच्या पवित्र



व मंगलमय मुहूर्तावर संत पुंजाजी महाराज समाधी मंदिरात भव्य मूर्ती प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये नामस्मरण, भजन-कीर्तन, प्रवचन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांद्वारे भक्तांना अध्यात्मिक चिंतनाची संधी उपलब्ध होणार आहे. या महोत्सवात श्रीरामकथा कथनासाठी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज आवारे यांची उपस्थिती लाभणार असून त्यांच्या प्रभावी कथनातून रामभक्तीचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचणार आहे. तसेच ज्ञानेश्वरी पारायणासाठी ह.भ.प. रमेश महाराज अवारे व्यासपीठ भूषवणार असून त्यांच्या मार्गदर्शनातून संत साहित्य व अध्यात्मिक विचारांचा प्रसार होणार आहे.गुढीपाडव्याच्या शुभप्रसंगी सकाळी ९ वाजता संत पुंजाजी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधीवत धार्मिक विधी व मंत्रोच्चारात पार पडणार आहे. या सोहळ्याला परिसरातील भाविक, ग्रामस्थ व विविध भागांतील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.`

### राजेश शर्मा यांचे निधन

**अचलपूर-**नगर परिषदेचे शिवसेनेचे माजी नगरसेवक राजेश



शर्मा यांचे १५ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.काही दिवसापासून त्यांच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू होते.त्यांचे निधन झाल्याची वार्ता जुळ्या शहरात पसरताच शोककळा पसरलेली आहे. शहरातील टक्कर चौक परिसरात श्री बाल ध्रुव गणेश मंडळाचे अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी यशस्वी रित्या जबाबदारी पार पाडली.तालुक्यात नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात सच्चा शिवसैनिक म्हणून राजेश शर्मा यांना ओळखले जात होते .त्यांच्यावर भैरवघाट हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील प्रतिष्ठित नागरिक,विविध पक्षातील नेते मंडळी,कार्यकर्ते ,व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# महावितरणच्या 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम'ला राष्ट्रीय पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व ग्राहकांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून देणे आणि तांत्रिक अचूकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने स्मार्ट ग्रीड अंतर्गत विकसीत केलेली 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम' देशात सर्वोत्तम ठरली आहे.

इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषदेमध्ये या तंत्रज्ञानासाठी महावितरणचा 'आयएसजीफ इनोव्हेशन अवॉर्ड २०२६' या सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे 'इंडिया स्मार्ट युटिलिटी विक २०२६' अंतर्गत १२व्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषद झाली. महावितरणच्या 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम'ची अंमलबजावणी व फलनिष्पत्तीचे सादरीकरण तीत करण्यात आले.

त्याचा अभ्यास करून पाच सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने या तंत्रज्ञानाची परिषदेतील सर्वोत्तम पुरस्कारासाठी निवड केली. सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव पी. उमाशंकर यांच्याहस्ते

## देशातील सर्वोत्तम स्मार्ट ग्रीड प्रकल्प



कार्यकारी संचालक दत्तात्रेय पडळकर व मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) अविनाश हावरे यांनी महावितरणच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऑनलाइन ग्राहकसेवा आणि अंतर्गत तांत्रिक कार्यप्रणालीला डिजिटल पद्धतीची जोड दिली आहे. यात प्रामुख्याने वीजपुरवठ्याशी संबंधित 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम'द्वारे राज्यातील ३ हजार २०० पेक्षा अधिक उपकेंद्रांना मुंबई मुख्यालयातील मध्यवर्ती 'कमाण्ड ॲण्ड कंट्रोल सेंटर'सोबत डिजिटल पद्धतीने जोडले आहे.

या प्रणालीमुळे प्रामुख्याने उच्च व लघुदाब वीजवाहिन्या (फीडर्स), ट्रान्सफॉर्मर्स, कॅपेसिटर बँक आणि ब्रेकर्स यांचे रिअल-टाइम नियंत्रण करणे शक्य झाले आहे.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी अत्यंत महत्वाच्या २ हजार ७०० पेक्षा अधिक सौर कृषी वीजवाहिन्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा व सुरळीत वीजपुरवठा करणे आणि सौर ऊर्जेचा प्रभावी वापर करणे अत्यंत सहजसोपे व प्रभावी झाले आहे.

## भुसावळ रेल्वे मंडळ सदस्यांची बैठक
# अचलपूर-चांदुरबाजार रेल्वे सुविधेबाबत चर्चा

**अचलपूर/वार्ताहर**



भुसावळ रेल्वे मंडळाची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत रेल्वे मंडळाचे सदस्य कुंदन यादव यांनी विविध रेल्वे संबंधित प्रश्न सभेत मांडत प्रवाशांना अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी पुढाकार घेतला. बैठकीदरम्यान अचलपूर-मुर्तीजापूर शकुंतला रेल्वे पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच अचलपूर रेल्वे स्थानक परिसरात वाढलेले अतिक्रमण हटवून परिसर स्वच्छ ठेवावा, स्थानक परिसरात विद्युत रोषणाईची व्यवस्था करावी, काटेरी झुडपे काढावीत व अवैध कामांना आळा घालण्यासाठी नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय चांदूरबाजार-बोराळा-अमरावती मार्गावरील रेल्वे गेट परिसरात फ्लायओव्हर ब्रिज उभारण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.अमरावती-मुंबई-पुणे रेल्वे गाड्यांमध्ये अचलपूर व मेळघाट भागातील प्रवाशांसाठी आरक्षण कोटा वाढविण्याची मागणीही कुंदन यादव यांनी बैठकीत प्रभावीपणे मांडली. या बैठकीला रेल्वे विभागाचे अधिकारी पुनीत अग्रवाल, सुनीलकुमार सुमन,मुकेशकुमार मीना, डॉ. सी. ई. शिवकुमार, अजय कुमार तसेच रेल्वे बोर्डाचे इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

## जप्त वाहनांचा २५ ला लिलाव

**अमरावती-**अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध अचलपूर तहसील प्रशासनामार्फत गौणखनिज भरारी पथकाने विविध कारवायांमध्ये जप्त केलेली मात्र दीर्घकाळापासून दंडाची रक्कम न भरलेली १३ वाहने आता जाहीर लिलावात काढण्यात येणार आहेत. हा लिलाव येत्या २५ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता तहसीलदार, अचलपूर यांच्या दालनात पार पडणार आहे.तहसील कार्यालय, अचलपूर अंतर्गत भरारी पथकामार्फत अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई करून अनेक वाहने जप्त करण्यात आली होती. नियमानुसार या वाहन मालकांना दंडाची आकारणी करण्यात आली होती, परंतु अनेक गैरअर्जदारांनी अद्याप शासकीय दंडाचा भरणा केलेला नाही किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही. परिणामी, ही वाहने तहसील कार्यालयाच्या आवारात जमा आहेत. संबंधित वाहन मालकांना पत्राद्वारे दंड भरण्याची शेवटची संधी देऊनही त्यांनी प्रतिसाद न दिल्याने, अखेर या वाहनांची विल्हेवाट लावून शासकीय दंडाची वसुली करण्यासाठी लिलावाचा मार्ग अवलंबण्यात आला आहे. या लिलावासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय , अमरावती यांच्याकडून सर्व १३ वाहनांचे तांत्रिक मूल्यांकन मागविण्यात आले होते. आरटीओकडून प्राप्त झालेल्या मूल्यांकन आणि घोषित 'हातच्या किमती'नुसार हा लिलाव केला जाणार आहे.

# डीपीला लागलेल्या आगीमुळे संत्रा बाग जळून खाक

**वरुड/वार्ताहर**

तालुक्यातील पुसला जवळील सावंगी शेतशिवारात विद्युत डीपीला लागलेल्या आगीमुळे संत्र्याची बाग जळून खाक झाल्याची घटना ३ मार्च रोजी दुपारी घडली. या आगीत शेतकरी रमेश महादेव भामकर यांच्या संत्रा बागेसह इतर फळझाडांचे मोठे नुकसान झाले असून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेस महावितरणचे अक्षम्य दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरुड येथील शेतकरी रमेश भामकर यांचे पुसला नजीक सावंगी शिवारात शेत असून त्यांनी तेथे संत्रा बाग विकसित केली आहे. बागेत ठिबक सिंचन, स्प्रिंकलर यांसारख्या सुविधा उपलब्ध असून संत्र्यांसोबतच पेरू, सीताफळ, आवळा व निंबूची झाडेही लावण्यात आली होती. ३ मार्च रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास शेताजवळील विद्युत डीपीला अचानक आग लागली. या आगीच्या ज्वाळा बागेत पसरल्याने संत्र्याची संपूर्ण बाग आगीच्या विळख्यात सापडली.

## सावंगी शिवारातील घटना



परिसरातील शेतकऱ्यांच्या निदर्शनास ही बाब येताच शेंदुर्जना घाट व वरुड नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या दोन वाहनांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले; मात्र तोपर्यंतङ ङबागेतील अनेक संत्रा झाडांसह इतर फळझाडे जळून खाक झाली होती.

यामुळे हाती येणारे संत्र्याचे पीकही नष्ट झाले आहे. यासोबतच लाखो रुपयेङ ङकिमतीचे ठिबक सिंचन, स्प्रिंकलर आणि तुरीचे कुटार देखील जळून खाक झाले आहे.या घटनेमुळे रमेश भामकर यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून ते आर्थिक संकटात सापडले आहेत. महावितरणच्या दुर्लक्षामुळे डीपीला आग लागून आपली बाग जळून गेल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणाची दखल घेऊन पंचनामा करून त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी भामकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## कडधान्यांच्या पदार्थांनी सजली 'आरोग्यम'ची पाककला स्पर्धा
### महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; पौष्टिक आहाराचा संदेश

**अमरावती/का.प्र.**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांमध्ये निरोगी जीवनशैलीची जाणीव निर्माण करण्यासाठी आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट आणि ओलावा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहांतर्गत कडधान्यावर आधारित पाककला स्पर्धा नुकतीच आरोग्यम हॉस्पिटल येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत शहरातील अनेक महिलांनी पौष्टिक व आरोग्यवर्धक पदार्थ सादर करून निरोगी आहाराचे महत्त्व अधोरेखित केले.

आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सभागृहात आयोजित या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी अनुराधा आंबुलकर होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये ओलावा फाउंडेशनच्या संगीताताई हातगावकर आणि आरोग्यमचे अस्थिरोग तज्ञ डॉ. आशिष हटवारे, आहार तज्ञ डॉ. ऋतुजा शिंगरूप उपस्थित होते.यावेळी संगीता हातगावकर व डॉ. आशिष हटवारे यांच्या हस्ते अनुराधा आंबुलकर यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.स्पर्धेच्या परीक्षक म्हणून अनुराधा आंबुलकर यांनी सहभागी महिलांनी सादर केलेल्या विविध पदार्थांची पाहणी करून क्रमवारी निश्चित केली.यावेळी आरोग्यमचे अस्थिरोग तज्ञ डॉ. आशिष हटवारे यांनी आरोग्यम हॉस्पिटलतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती दिली.



अशा उपक्रमांमुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.संचालन आहारतज्ज्ञ डॉ. ऋतुजा शिंगरूप तर आभार प्रदर्शन डॉ. मयुरी भूगुल यांनी मानले. या पाककला स्पर्धेला शहरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कडधान्यावर आधारित पौष्टिक पदार्थांच्या माध्यमातून निरोगी आहाराचा प्रभावी संदेश दिला.

## विविध क्षेत्रांतील महिलांचा गौरव

**अमरावती-** जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या विदर्भ प्रदेशाध्यक्षा आणि मातृशक्ती बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा मनीषा टाकसाळ यांच्या विद्यमाने अमरावती येथे एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात समाजातील विविध स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'महाराष्ट्र उद्योजिका गौरव पुरस्कार' व 'उत्कृष्ट कामगिरी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माधुरीचंदनखेडे (रेल्वे), छाया लोहकरे (रेल्वे), लता सोमकुवर (कामगार विभाग



मंत्रालय), संध्या टिकले,सुरेखा खांडेकर, ॲड. प्रीती रेवणे (नगरसेविका), डॉ. मधुरा कहाळे, सुमती ढोके (नगरसेविका), पत्रकार प्रियांका केदार, चंदा वानखेडे (महिला विभाग) आणि आनंद दादा जयस्वाल (युवा स्वाभिमान) आदी मान्यवर उपस्थित होते. सोहळ्यात सचिव वृषाली धावडे, कुमुदिनी मंडले, मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार दिले.

## 'आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर!'
# संमतीने घटस्फोट घेण्याकरिता आलेत आणि नांदायला गेलेत

**अमरावती/का.प्र.**

आज कौटुंबिक न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. या लोक अदालतीमध्ये पहिलेच प्रकरण निघाले ते म्हणजे आपसी संमतीने घटस्फोटाचे.

ग्रामीण भागातील पती-पत्नी म्हणजे अक्षय आणि दिपाली या दोघांनी कौटुंबिक न्यायालय अमरावती येथे आपसी सहमतीने घटस्फोट मिळावा याकरिता प्रकरण दाखल केले होते.

या प्रकरणांमध्ये ऑगस्ट २०२५ पासून कौटुंबिक न्यायालयाच्या समन्वयक तसेच कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश आणि पती-पत्नी या उभयतांचे वकील यांनी हे कुटुंब तुटू नये आणि संसार उध्वस्त होऊ नये याकरिता विशेष प्रयत्न केलेत व या दोघा पति-पत्नी मध्ये पुन्हा समेट घडावा यासाठी दोघांचेही समुपदेशन करण्यात आले. या



समुपदेशनानंतर दोघाही पती-पत्नींना त्यांच्या असलेल्या अपत्याचे भविष्य कसे नष्ट होईल याबाबत समजावून सांगण्यात आलेले विचार पटलेत आणि त्याचा परिणाम राष्ट्रीय लोक अदालती मध्ये दिसून आला.

कौटुंबिक न्यायालयाचे मुख्य न्याय न्यायाधीश शेळके व त्यांच्यासोबत उपस्थित असलेल्या पॅनल ॲडव्होकेट यांच्या उपस्थितीमध्ये पती-पत्नी न्यायालयात हजर झालेत आणि त्यांनी विद्यमान न्यायालयाला सांगितल.

आम्ही आमच्या लहान मुलाचा आणि आमच्या संसाराचा विचार करून आपसी सहमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय रद्द केला आहे आणि मागील तीन महिन्यापासून आम्हा दोघांचेही वकील ॲड. चंद्रशेखर डोरले, ॲड. सुयश डोरले, ॲड प्रथमेश गणेशकर, आणि ॲड. निसार खान एडवोकेट यांचे सांगणे ऐकले आणि घटस्फोटाच्या निर्णयावर फेरविचार केला व एकत्र संसार पुन्हा सुरू केलेला आहे. सर्व उपस्थितानी या दोघांनाही शुभेच्छा दिल्यात.

सर्वोच्च न्यायालयाने ज्या हेतूने लोक अदालत सुरू केलेले आहेत त्याचा असा सकारात्मक प्रभाव या प्रकरणातील निकालावरून किंवा तडजोडी वरून पुन्हा एकदा सिद्ध झालेला आहे.

# विधीमंडळे पांढरा हत्ती झाली आहेत?

**व्दि-सभागृहांची लोकशाही व्यवस्था स्विकारताना राज्यघटनाकारांना अपेक्षीत कामकाज आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक या पवित्र लोकशाहीच्या मंदीरात आता होत आहे का? या सार्वभौम सदनांचे महत्व, आवश्यकता आता राहिली आहे का? दांत-नख्या नसलेल्या सिंहासारख्या किंवा पांढरा हत्ती झालेल्या या व्यवस्थांकडे लक्ष कधी देणार आहोत?**



### जुन्या-नव्यांचा मेळ

महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या सत्राची सुरुवात २३ फेब्रुवारीला झाली आणि तीन सप्ताहाचे कामकाज पूर्ण झाले आहे. आता २५ मार्च पर्यत सुमारे सहा दिवसांचे कामकाज अपेक्षीत आहे. या सत्रात चिमूटभर दिसणा-या विरोधीपक्षांच्या सदस्यांकडून त्यांचे विरोधकांचे काम सरकारच्या चुका उणिवा दाखवणे आणि जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी जागे करणे हे अगदी चांगल्या पध्दतीने केले जात असल्याचे सांगता येईल. फ्लोअर मॅनेजमेंट हा प्रकार फारसा नसतानाही विरोधकांकडून विस्कळीत स्वरुपात का होईना सरकारला धारेवर धरल्याचे पहायला मिळत आहे. त्यात वरुण सरदेसाई, सिध्दार्थ खरात, अभिजीत पाटील, रोहित पाटील या पहिल्यांदाच सभागृहात आलेल्या सदस्यांचाही चांगला प्रभाव दिसून आला आहे. तर भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार अमीन पटेल जयंत पाटील अमीत देशमुख नितीन राऊत नाना पटोले त्यांच्या अनुभवानुसार संख्याबळ नसतानाही चांगल्या पध्दतीने सरकारला आरसा दाखविण्याचे काम करत आहेत.

### सरकारच्या त्रिपक्षांत मरगळ?

मात्र यावेळी विशालकाय बहुमत असलेल्या सरकारच्या तीनही पक्षांमध्ये मात्र समन्वय असल्याचे दिसत नाही, अजीत पवार यांच्या गुढ अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून अद्याप संसदीय राजकारणाची तोंडओळख सुरू असल्याने आणि या धक्क्याने त्यांच्या पक्षातील सदस्यांवर अनामिक दडपण असल्याने त्यांच्याकडून फारसे काही अपेक्षीत नाही. मात्र अमोल मिटकरी यांच्यासारखे किंवा सरोज अहिरे यांच्यासारखे काही सदस्य सध्या लढायच्या पवित्र्यात दिसतात.

### मग मंत्रिमंडळ आणि खातेवाटपाचा अर्थ काय?

एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या मंत्री आणि सदस्यांकडूनही त्यांच्या त्यांच्या खात्याच्या किंवा मतदारसंघाच्या कामकाजाचा चांगला प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. खासकरून निलेश राणे, मुरजी पटेल यांच्या सारख्या नवख्या सदस्यांचा कामकाजात सहभाग लक्षणीय आहे. तर प्रताप सरनाईक उदय सामंत शंभुराज देसाई या मंत्र्याकडे शिंदे यांच्या मंत्रालयांचा अतिरिक्त भार देवून स्वत: शिंदे विधानसभेत प्रश्नोत्तरे लक्षवेधी विधेयके या कामकाजापासून स्वत:ला दूर ठेवत असल्याचे दिसले. आता तर मुख्यमंत्र्याकडूनही या चुकीच्या पायंड्याचे अनुकरण होताना दिसत आहे. मंत्री आपल्याकडच्या विभागांची सभागृहासमोर जावून चर्चा टाळणार असतील तर मग मंत्रिमंडळ आणि खातेवाटपाचा अर्थ काय? त्यांच्या सरकारच्या सदस्यांकडून मांडण्यात आलेल्या विषयांना हवा तसा न्याय मिळत नसल्याचे सांगण्यात येत आहे. सभागृहात विषय मांडायचा आणि नंतर भाईना दालनात जावून भेटायचे असे काही सदस्यांकडून केले जाते मात्र पटलावर त्याची अधिकृत नोंद होताना दिसत नाही. याचा परिणाम शिंदे यांचे अफाट काम सभागृहाच्या नोंदीत मात्र आभावानेच येताना दिसते. त्यांची विधानपरिषदेचे नेते म्हणून तेथे जास्त उपस्थिती असते मात्र त्या सभागृहात त्यांच्या समोर शिवसेना काँग्रेसच्या राष्ट्रवादीच्या चार पाच दिग्गजांकडून मांडण्यात येणा-या विषयांना राजकीय टोलवाटोलवी पलिकडे फारसे महत्व नसल्याने संसदीय कामकाजात शिंदे यांच्या खात्यावर फारशी काही कामगिरी नोंदवली जात नाही. त्यांच्या सल्लागारांकडून मात्र त्यांना याची जाणिव करून दिली जात नसावी. त्यामुळे उद्या विधीमंडळाच्या रेकॉर्डवर त्यांच्या कामकाजाच्या नोंदीत त्यांचा मंत्री म्हणून जो कामाचा झपाटा आहे विवीध समस्या सोडविण्याचे कसब उत्तरे देताना मार्ग काढण्याचे कोशल्य याचा आभावानेच उल्लेख येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सध्या सरकारच्या वित्त ऊर्जा गृह अश्या महत्वाच्या तीन विभागांचा भार आहे. महसूल उत्पादन शुल्क आणि नगरविकास या अन्य महत्वाच्या खात्यांचा भार भाजपच्या सहकारी पक्षांकडे आहे. मात्र अर्थसंकल्पाच्या महत्वाच्या चर्चाना मंत्री आणि त्या विभागांचे प्रधानसचिव दर्जाचे आधिकारी हजर रहात नसल्याने सभागृहात सत्ताधारी बाजुच्या सुधीर मुनगंटीवार दिलीप वळसे पाटील अश्या दिग्गजांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी तर सनदी अधिका-यांना शेवटची सूचना म्हणत उपस्थिती बाबत गांभिर्य ठेवण्याची सूचना करताना गंभीर कारवाईचे संकेत दिले.

### आयुधांची धार कमी, व्यवस्थेचा धाक कमी!

सभागृहात अर्थसंकल्पाची सर्वसाधारण चर्चा नियमानुसार सात दिवसांची असते, त्यात सरकारच्या धोरणांबाबत आणि त्रुटी उणिवांबाबत तसेच योजनांच्या अडचणीबाबत सदस्यांकडून धोरणात्मक चर्चा अपेक्षीत असतात. सरकारच्या कामकाजात पूर्वी कपात सूचनांचे महत्व होते. मात्र आताशा एक ठरावच वित्तमंत्री चर्चेआधी मांडतात त्यात कुणीही कपात सूचना देणार नाही असे गृहीत धरले जाते आणि वाघाच्या जश्या नख्या आणि दात काढले की तो निष्प्रभ होतो तसे या आयुधाची धार कमी केली जाते. त्यामुळे सभागृहाच्या चर्चा आणि मुद्द्यांचे गांभिर्य संपले आहे. तर सात दिवसांच्या चर्चा देखील ठराव मांडून केवळ दोन दिवसांच्या केल्या जात आहेत. त्यातही त्यांना प्राधान्य न देता महिला दिवस, किंवा प्रासंगिक काही विषयांच्या अन्य बाबीवर वेळ घेतला जातो. त्यामुळे सभागृहाचा प्राधान्याने १-१ रूपयांच्या खर्चाचा हिशेब घेण्याचा अधिकार बासनात गुंडाळला जातो आणि सभागृहात स्वच्छंदपणे मग लक्षवेधी सूचनांच्या २०-२५ सूचनांचे च-हाट दिवसभर चालवले जाते. त्यातही काही लक्षवेधी या निकषात बसणा-याही नसतात, तर काही विषय प्रश्नोत्तरात आधीच होवून गेलेले असताना त्यावर पुन्हा लक्षवेधी घेतल्या जातात. त्यामुळे विधीमंडळाच्या कामकाजाचा धाक पावित्र्य आणि सार्वभौमत्वाला आपणच हरताळ फासतो आहोत याचे भान सध्या सुटल्यासारखी स्थिती आहे.

### लाखोंच्या खर्चाचे ऑडीट हवे

या कामकाजाच्या व्यवस्थेसाठी लाखो करोडो रुपये शासन खर्च करते मात्र त्यातून जनतेच्या कोणत्या प्रश्नाना न्याय खरेच सध्या मिळाला आहे याचे ऑडिट करण्याची गरज निर्माण झाली आहे. सदस्यांच्या वर्तनाबद्दल माध्यमांना लिहिण्याच्या काही मर्यादा आहेत. त्या पलिकडे त्यांच्या चुकीच्या वर्तनावर माध्यमांकडून सातत्याने लिहिण्यात आले तर त्यांचा वृथा अभिमान अहंकार दुखावला जातो, ज्याला विशेषाधिकार म्हटले जाते त्याची ढाल करून मग पत्रकारांना शिक्षा केल्या गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. पण कोट्यावधीचा खर्च केला जाणा-या विधीमंडळाची व्यवस्था आता 'पांढरा हत्ती' झाल्या आहेत का? याचा जाब जनतेला आणि त्यांच्या वतीने कुणीतरी विचारणार आहे किंवा नाही? हा खरा प्रश्न आहे.

सध्या तर कामकाजाचे लाइव्ह कव्हरेज समुह माध्यमांत दाखवले जाते. त्यामुळे लोकांसमोर आपले लोकप्रतिनिधी काय काम करतात ते नेमके समोर येते. अनेकदा तर भाषण झाल्यानंतर लगेच त्याची क्लिप आमदारांच्या मार्फत त्या त्या गावच्या व्हाटसप समुहांवर टाकून प्रसिध्दी घेतली जाते. मात्र दिवसभरात पाच दहा मिनीटे बोलून दिवसभर सभागृहाबाहेर फिरण्याची मोकळीक या सदस्यांना मिळते. जी लाखो रुपये खर्चून व्यवस्था केली आहे ती जागेवर राहते आणि सभागृहात अनेकदा कोरमच्या गणसंख्ये इतकेही सदस्य नसताना रात्री ११- १२-१ वाजेपर्यंत कामकाज केले जाते. पुन्हा त्याची देखील शेखी मिरवली जाते! असा हा विधीमंडळ कामकाजाचा खेळखंडोबा कधी थांबणार आहे की नाही? असे मग जुने जाणकार लोक खाजगी चर्चेत विचारताना दिसतात.

### तरीही नव्यांकडून नवी आशा

सभागृहात सध्या मंत्र्यापेक्षा अनेक नवे तयारीचे सदस्य चांगली भाषणे मुद्दे मांडतानाही दिसतात, अगदी पहिल्यांदा सदस्य असलेले विक्रम पाचपुते, निलेश राणे वरुण सरदेसाई यांच्या सारखे अनेक सदस्य चांगली भाषणे करताना दिसतात. मात्र अनेक दिवस २९३-२६० च्या च्रर्चाना उत्तरेच दिली जात नाहीत. अशासकीय कामकाजात महेश शिंदे सुधीर मुनगंटीवार चेतन तुपे यांच्यासारख्या सदस्यांकडून चांगल्या विषयावर सरकारकडून उत्तरे घेण्याचा प्रयत्न होताना दिसतो. पण मंत्री आणि सरकारकडून वेळ मारुन नेण्यापलिकडे गुणात्मक दर्जाचे कामकाज होताना दिसत नाही. ही व्यवस्था आता गंजू लागली आहे की काय? असा प्रश्न त्यामुळे जाणकार विचारतात.

प्रत्येक सप्ताहात दोन्ही बाजुचे दोन दोन महत्वाचे चर्चाचे प्रस्ताव प्रलंबित असतात त्यावर दोन तीन आठवड्यानंतरही उत्तरे दिली जात नाहीत. पिठासीन अधिकारी विधिमंडळ सचीव आणि यंत्रणा देखील यासाठी जबाबदार आहेत मात्र त्यांच्याकडून याबाबत काही सुधारणा होताना दिसत नाहीत. विधिमंडळाची दोन्ही सभागृहे हे जनतेच्या लोकशाही व्यवस्थेचे दोन डोळे, कान आणि नाक आहेत. त्यांच्या समोर दिसणा-या बाबी येथे मांडल्या गेल्यानंतर सरकारच्या डोक्यातून त्याबाबत योग्य ती दखल घेवून हाताने कृती होण्याची आवश्यकता आहे ते होत नसेल तर ही व्यवस्था 'पांढरा हत्ती' म्हणून केवळ शोभिवंत दिसेलही तीचा उपयोग होणार नाही.

सध्या जीएसटी परिषदे सारख्या तरतूदी केल्यामुळे या सभागृहांच्या कर रचना कमी करण्याच्या आणि लागू करण्याच्या अधिकाराचा अधिक्षेप झाला आहेच. त्यामुळे आता सरकारला त्याबाबतअर्थसंकल्पात काही मांडायची सोयच राहिली नाही. मग विधीमंडळात 'देखल्या देवा..' म्हणतात तसे केवळ 'संविधानिक कर्मकांड' केल्यासारखे 'होय चे बहुमत' वगैरे देखावे केले जात आहेत. त्याचा मूळ गाभा केंव्हाच नष्ट झाला आहे. सदस्यांना अर्थसंकल्पात कपात सूचना देण्याचा त्यातील अनावश्यक तरतूदींना बाजुला करून महत्वाच्या तरतूदी सूचविण्याचा मान्य करून घेण्याचा अधिकार संपला असेल तर केवळ 'व्यवस्थांचा सापळा' या पलिकडे त्याला महत्व राहिले आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे 'दात आणि नखे काढलेलेल्या' या वाघाचा धाक ना लोकप्रतिनिधीना राहिला ना सनदी अधिकारी आणि नोकरशाहीला राहिला नाही. या 'पांढ-या हत्ती' साठी जो खर्च केला जातो त्याच्या लेखांचे कधी सभागृहात सादरीकरण चर्चा आणि त्यातील उणिवांवर बोलले जात नाही. अश्या या लोकशाहीच्या पवित्र मंदीराची ही अवहेलना नाही का? यावर आपण आता लक्ष देणार आहोत की नाही? हा खरा प्रश्न आहे. तुर्तास इतकेच!

**किशोर आपटे**

## स्वयंपाक चुलीवरचा..



चुलीवरचा स्वयंपाक
आहे खरी कला बरे
ये-या गबाळ्याचे काम
नाही, बोल मात्र
खरे...

लाकडांची रचनाही
करायची विचाराने
कसेतरी रचल्याने
जाळ नाही, धूर
आणे..

हळुहळु पेटल्याने
चटक्यांची गर्दी नाही
मंद मंद ज्वाला कशा
स्वयंपाका रुची राही...

फुंकणीने धूर कमी
कधी धुराचा वास ये
पदार्थांना चव जावी
बिघडता कामा नये..

अन्नपूर्णा प्रसन्नता
मन ओती रांधतांना
पंचपक्वानही फिके,
पाणी तोंडा
सांगतांना..

गॅस पूर्वीचा पर्याय
पुन्हा येई कामी असा,
गोल गोल फिरून ते
जूने तेच सोने म्हणा..

**ॲड.सुलभा गोगरकर,** अमरावती
मो.९४२३६०४६८

# रंगरेषांचा कलात्मक दृष्याविष्कार

## शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे ५९ वे वार्षिक कला प्रदर्शन



**चि**त्रकला ही मानवी भावना, संवेदना आणि विचार व्यक्त करणारी प्रभावी कला आहे. चित्रकार या कलेच्या माध्यमातून आपल्या कलाकृतीत समाजातील वास्तव, दैनंदिन जीवनातील विषय, ऐतिहासिक संदर्भ एकूणच सामाजिक-सांस्कृतिक जडण-घडणीचे सूक्ष्म प्रतिबिंब उमटवित असतो. उत्स्फूर्त आणि आंतरिक आवेगातून कॅनव्हॉसवर उमटलेल्या प्रत्येक रंगरेषांतून चित्रकाराचे भावविश्व, संवेदनशीलता आणि सृजनशीलतेचे प्रकटीकरण होत असते. शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर येथे ५९ वे वार्षिक कला प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात रेखा व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला आणि कलाशिक्षक व प्रशिक्षण या विभागातील विद्यार्थ्यांच्या विविध माध्यमांतील अभ्यास कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. रंग-रेषांचा हा कलोत्सव १८ मार्च पर्यंत सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत कलारसिकांना बघता येणार आहे.

'तारपा' द्वार: आदिवासी समाजात सण-उत्सव आणि आनंदाच्या प्रसंगी 'तारपा' वाद्य वाजविण्याची परंपरा आहे. या वाद्याचा अधिकाधिक प्रचार, प्रसार व्हावा या उद्देशाने महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर 'तारपा'ची हुबेहुब प्रतिकृती साकारली. अतिशय आकर्षक असलेली ही प्रतिकृती बांबू, गोणी, कापड आणि टाकाऊ वस्तूंपासून बनविली आहे. साधारणतः १५ फुट उंच



असलेली ही प्रतिकृती 'इमल्शन' रंग प्रकारातील असून, सजावटीसाठी वाद्यावर वारली पेंटिंग व निसर्गचित्रे चितारली आहेत. महाविद्यालयात प्रवेश करताच, 'तारपा' लक्ष वेधून घेते.

'स्त्री संघर्ष'- सृष्टी खेडकर या विद्यार्थिनीने साकारलेल्या 'स्त्री संघर्ष' या कलाकृतीत 'स्त्री' जिवनातील सामर्थ्य आणि संघर्ष यांचा प्रभावी दृश्यसंवाद दिसून येतो. 'स्त्री'च्या आकृतीची मध्यभागी रचना करतांना; तिच्या विविध हातांच्या माध्यमातून 'स्त्री'च्या अनेक भूमिका आणि तिच्या जबाबदाऱ्यांचे प्रतीकात्मक चित्रण केले आहे. विशेषतः चित्र रचनेत शिक्षण, परंपरा आणि प्रगती यांचे संकेत देणाऱ्या घटकांचा समतोल साधला आहे. काळा-पांढऱ्या रंगसंगतीतील ठळक विरोधाभासामुळे चित्राला नाट्यमयता आणि दृश्यभाषा प्राप्त झाली आहे. तसेच सूक्ष्म रेषांकन आणि सजावटीतील फुलांची नक्षी पारंपरिक भारतीय कलेची आठवण करून देतात. संपूर्ण रचनेत आकृतीभोवती केलेली संतुलित मांडणी 'स्त्री' शक्तीची जाणीव करुन देते. ही कलाकृती स्त्रियांच्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या सामर्थ्याचा आणि सामाजिक बदलातील त्यांच्या योगदानाचा प्रभावी कलात्मक वेध घेते.

'अस्तित्वाची झुंज'- रोहन पदाडे या विद्यार्थ्याची चित्रकृती माणसाच्या ओळख हरविण्याच्या प्रक्रियेवर भाष्य करते. चित्रकृतीत व्यक्तीच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष आणि बदलत जाणाऱ्या ओळखीचे प्रभावी चित्रण केले आहे. चित्रात दृश्यभास निर्माण करणारे चेहरे व्यक्तीच्या सामाजिक भूमिका व अंतर्गत संघर्ष सूचित करतात. चित्रात काही चेहऱ्यांना 'मास्क' परिधान केले आहेत, ज्यातून समाजात टिकून राहण्यासाठी धारण करावी लागणारी कृत्रिम ओळख अधोरेखित होते. चित्रचौकटीतील घटकांची मांडणी आणि रचना विभागली असून; त्यातून विखुरलेल्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव



व्यक्त केली आहे. निळा, हिरवा, करडा आणि जांभळ्या रंगांमुळे चित्रात गुढता आणि शांतता प्रस्थापित झाली आहे. टेक्स्चर आणि रंगछटांच्या थरांमुळे काही चेहरे स्पष्ट दिसतात, तर काही धूसर भासतात. या चित्रकृतीतून आधुनिक जीवनातील संघर्ष, तुटलेपणा आणि ओळखीच्या शोधाचे प्रभावी दृश्यरूप साकारले आहे.

'द हिजाबी वुमन'- सदफ अंजुम या विद्यार्थिनीच्या कलाकृतींमध्ये आस्था, स्वावलंबन आणि परंपरेशी असलेले नाते यांचे एकत्रीकरण दिसून येते. ही कलाकृती साकारतांना विद्यार्थिनीने हिजाबकडे धार्मिक बंधन म्हणून न पाहता, वैयक्तिक निवड आणि स्वायत्ततेची सशक्त अभिव्यक्ती या संकल्पनेतून कलाकृतीची मांडणी केली आहे. मुस्लिम 'स्त्री' स्वतःचा सर्वांगीण विकास करुन, आपली वेगळी ओळख निर्माण करु शकते; या आशयाला दृश्यरूप देतांना, हिजाबच्या आधुनिक रूपाला मुघल कलेतील पारंपरिक शैलीशी जोडले आहे. कलाकृतीतील आकृत्या केवळ सजावटीपुरत्या मर्यादित नाहीत, तर 'स्त्री'च्या अंतर्मनातील सामर्थ्य, शालीनता आणि सौंदर्याचे प्रतीक म्हणून पुढे आल्या आहेत. ही कलाकृती प्रिंट मेकींग प्रकारातील असून, रंगसंगतीत काळा, हिरवा आणि लाल या रंगछटांचा प्रभावी वापर केला आहे. विशेषतः काळ्या रंगाचा नेमका वापर केल्यामुळे आकृती खिळवून ठेवते, तर हिरवा आणि लाल रंग श्रद्धा, ऊर्जा आणि संघर्षाचे प्रतीक म्हणून दर्शविले आहे. ही प्रतीकात्मक कलाकृती श्रद्धा आणि 'स्त्री' स्वातंत्र्य यांच्यातील संवाद अधोरेखित करते.

'द फिफ्थ मेंबर'- सन २०२४-२५ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्या यातनांतून निर्माण झालेली उद्विग्नता, कोलाहल प्रतिक खापरे या विद्यार्थ्याने आपल्या कलाकृतीतून मांडण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, अनिश्चितता आणि त्याग यांचे प्रतीकात्मक चित्रण सौंदर्यपूर्ण दृष्टीकोनातून उलगडून दाखविले. चित्राच्या मध्यभागातील मानवी आकृती आणि तिच्या भोवती दिसणारे हात शेतकरी कुटुंबाच्या सामूहिक जीवनाशी असलेले नाते आणि त्यांची जबाबदारी अधोरेखित करतात. पार्श्वभूमीत दिसणारे हात मानवी शक्ती, नियती किंवा समाजाची सामूहिक जबाबदारी यांचे रूपक म्हणून पुढे आले आहेत. तसेच चित्र रचनेत विषयाला अनूरुप दृश्यघटकांची मांडणी करुन; एका बाजूला घर आणि बुजगावणे, तर दुसऱ्या बाजूला मृत्यूनंतरची विधी, त्याग आणि वेदनेचे सूचक घटक आहेत. अँक्रेलिक रंग प्रकारातील मातीसदृश पिवळसर, हिरवा आणि गडद छटांचा वापर करून ग्रामीण भागातील वातावरणनिर्मिती केली आहे. आकृत्यांच्या प्रतीकात्मक आकारांमुळे चित्रात एक प्रकारची नाट्यमयता निर्माण झाली आहे. एकूणच ही कलाकृती शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, त्याग आणि समाजाशी असलेले त्यांचे अविभाज्य नाते यांचा कलात्मक वेध घेते.

'अनटायटल्ड'- विविध लैंगिक ओळख आणि लैंगिक आकर्षण असलेल्या व्यक्तींच्या समुदायातील भावनिक नातेसंबंधांचा वेध घेणारी शिर्षक नसलेली चित्रमालिका क्रिश या विद्यार्थ्याने साकारली. या मालिकेतील सर्व कलाकृतींमध्ये




वेगवेगळ्या चित्र रचनेतून 'एलजीबीटीक्यू' समुदयातील नातेसंबंधांचे विविध पैलू उलगडून दाखविले आहे. विशेषतः मॅट पृष्ठभागावरील बहुरंगी प्रतीकात्मक कलाकृती लक्ष वेधून घेते. एका रचनेत 'सॅपिओसेक्शुॲलिटी'च्या संकल्पनेतून बौद्धिक आकर्षणावर आधारित नातेसंबंध, तर दुसऱ्या कलाकृतीत समलिंगी नात्यातील शांत, अंतरंग आणि भावनिक जवळीक अधोरेखित केली आहे. मिश्र माध्यमात साकारलेल्या या चित्रमालिकेतील वेगवेगळ्या फ्रेममध्ये विविध प्रतिमा, टेक्स्चर आणि अमूर्त आकृत्यांची केलेली रचना खिळवून ठेवते. मध्यभागातील अर्धवर्तुळाकार प्रतिमा आणि खालच्या उजव्या भागातील मानवी चेहरा या घटकांमुळे संपूर्ण रचनेला



भावनिक केंद्र प्राप्त झाले आहे. रंगसंगतीत निळा, हिरवा, जांभळा आणि पिवळ्या छटांचा प्रभावी वापर केला आहे. शांत आणि गूढ वातावरण निर्माण करणाऱ्या या रंगांमध्ये विखुरलेले बहुरंगी ठिपके 'एलजीबीटीक्यू' व्यक्तींच्या समुदायातील विविधतेचे प्रतीकात्मक संकेत देतात. चित्रातील धूसर आणि प्रवाही आकारांबरोबरच स्पष्ट भूमितीय विभाग एकत्र येऊन गुंतागुंतीचे रूपक उभे करतात. तसेच संपूर्ण रचनेत आत्मचिंतन, अंतर्मुखता आणि विविधतेचा स्वीकार या संकल्पना सूचकपणे व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे ही चित्रमालिका केवळ दृश्यात्मक न राहता; समकालीन सामाजिक वास्तवाशी संवाद साधणारी आहे.

'फ्राजील युनिटी'- ओमप्रकाश घोडखांदे या विद्यार्थ्याने 'फ्राजील युनिटी' या आकर्षक इंस्टॉलेशनच्या माध्यमातून 'युनिटी' आणि 'सबुरी' या भारतीय मूल्यांचा आणि 'कोविड' महामारीनंतर वाढलेल्या व्यक्तीगत संघर्षाचा शोध घेतला आहे. कलाकृतीची मांडणी करतांना; विणलेल्या पट्ट्यांचा प्रभावी वापर करून नाते-संबंधातील गुंता आणि दुरावा उलगडून दाखविला आहे. इंस्टॉलेशनची उभारणी करतांना भिंतीपासून खाली झेपावणारे पट्टे आणि मध्यभागी ठेवलेली मानवी आकृती यामुळे दृश्यात प्रतीकात्मक ताण निर्माण झाला आहे. विशेषतः मानवी शिल्पाभोवती गुंतलेले पट्टे हे आधुनिक जगात अडकत चाललेल्या व्यक्तीला अधोरेखीत करतात. कापडी पट्ट्या, मानवी शिल्प आणि एकसंध फिकट रंगछटा वापरल्यामुळे संपूर्ण कलाकृतीत शांतता पसरली आहे. एकूणच हे इंस्टॉलेशन जुन्या आणि नव्या संस्कृतीतील संघर्ष, अस्वस्थ वर्तमान आणि बदलत्या सामाजिक वास्तवाचे प्रभावी दृश्यरूप आहे.

चित्रकार हा केवळ रंग, रेषा आणि आकारांची मांडणी करीत नाही, तर त्याच्या अंतर्मनातील भावना, संवेदना, विचार, अनुभव आणि नवनवीन कल्पनांना दृश्यरूप देण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे चित्रकलेकडे शुद्ध व्यासंग म्हणून पाहण्याची गरज आहे.



**आशिष यावले**
नागपूर
मो. ९९२२२९००२२

# गॅसचा साठा असल्याचा दावा ; तरी हॉटेल व्यवसायिकांवर निर्बंध का ?

## हॉटेल व्यावसायिकांचा बैठकीत उमटला सूर : आज जिल्हाधिकारी यांना देणार निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने १३ मार्च २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार व्यावसायिक एलपीजी गॅस वापरासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. मात्र या निर्णयामुळे अकोला शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट व केटरिंग व्यवसायिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.*



शासनाच्या आदेशानुसार रुग्णालये, शैक्षणिक संस्था तसेच सार्वजनिक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अकोला शहरातील हॉटेल व खाद्य व्यवसायिकांची तातडीची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शासनाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत त्याचा फेरविचार करण्याची मागणी करण्यात आली.

व्यवसायिकांचे म्हणणे आहे की, एका बाजूला अनेक मंत्री देशात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा करतात; मात्र दुसऱ्या बाजूला हॉटेल व्यवसायावर गॅस पुरवठ्याचे निर्बंध लादले जात आहेत. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट आणि केटरिंग व्यवसाय मोठ्या अडचणीत सापडणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली.

शासनाने हा निर्णय त्वरित मागे घेतला नाही तर आगामी दोन दिवसांत अकोला शहरातील सुमारे ५० टक्के हॉटेल व्यवसाय बंद ठेवण्याचा इशारा देखील व्यवसायिकांनी दिला आहे. तसेच या संदर्भात सोमवारी अकोला जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन समस्यांचे निराकरण करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या बैठकीस अकोला हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष योगेश अग्रवाल, ओमप्रकाश गोयंका, कृष्णकुमार राठी, भावेश खिलोसिया, श्रीराम पांडे, जसपाल सिंग नागरा, प्रशांत देशमुख, बार असोसिएशनचे श्रीकांत देशमुख, विवेक मंत्री, डॉ. मनोज अग्रवाल, बोनीभाई शहा, पिंटू सेठ गोसावी, संजय सिसोदिया, गुड्डू ठाकूर, दिपक वोरा, भूषण मेहता, ईश्वर जैन, आनंद अग्रवाल, सागर अमानकर, हर्षल भांबेरे, रविभाऊ घाटे, गजानन खंडेलवाल, धनुभाई खिलोसिया, अश्विनभाई खिलोसिया, यश मेहता यांच्यासह मोठ्या संख्येने हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट व केटरिंग व्यवसायिक उपस्थित होते.

**प्राधान्य यादीतून वगळल्याने व्यवसाय अडचणीत**

शासनाने काढलेल्या परिपत्रकात व्यावसायिक सिलेंडर वितरणाच्या प्राधान्य यादीतून हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट व केटरिंग व्यवसायिकांना वगळण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण खाद्य व्यवसाय संकटात आला असून शासनाने या निर्णयाचा फेरविचार करून व्यवसायिकांनाही काही प्रमाणात प्राधान्य द्यावे.

**- योगेश अग्रवाल,**
अध्यक्ष, अकोला हॉटेल असोसिएशन

.............

**लग्नसराईत सिलेंडर टंचाई; केटरर्स अडचणीत**

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असून अनेक लग्न समारंभांच्या ऑर्डर प्रलंबित आहेत. अशा वेळी सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने केटरिंग व्यवसायासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. शासनाने त्वरित व्यावसायिक सिलेंडर उपलब्ध करून दिलासा द्यावा.

**- संजय सिंग सिसोदिया,**
केटरर्स व्यवसाय

# गॅस सिलेंडर टंचाईच्या अफवा विरोधकांकडून पसरविण्याचा प्रयत्न – खा. अनुप धोत्रे



■ प्रतिनिधी | बाळापूर ■

अकोला जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा तुटवडा असल्याच्या बातम्या पूर्णपणे अफवा असून त्या विरोधकांकडून जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत. नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे स्पष्ट मत खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केले. तसेच कुठेही गॅस टंचाई असल्याचे एखाद्या एजन्सीधारकाकडून सांगितले जात असेल तर त्यांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

बाळापूर येथील उत्सव मंगल कार्यालयात आयोजित दीनदयाल उपाध्याय कार्यकर्ता प्रशिक्षण महाअभियान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बोलताना खा. धोत्रे यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल करत सरकारविरोधात वातावरण निर्माण करण्यासाठी गॅस टंचाईसारख्या मुद्द्यांची मुद्दाम हवा केली जात असल्याचा आरोप केला.

ते पुढे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारकडून जनतेसाठी अनेक लोकाभिमुख योजना राबवल्या जात आहेत. त्यामुळे विरोधकांकडे टीका करण्यासाठी कोणताही ठोस मुद्दा उरलेला नाही. परिणामी सरकारची बदनामी करण्यासाठी गॅस सिलेंडर टंचाईसारख्या खोट्या बातम्या पसरवल्या जात आहेत. मात्र अकोला जिल्ह्यात पुरेसा गॅस सिलेंडर साठा उपलब्ध असून कुठेही टंचाई नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावरही सरकार संवेदनशील असल्याचे त्यांनी नमूद केले. एखाद्या रुग्णावर अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार शक्य नसल्यास त्याला नागपूर येथील एम्स रुग्णालयात उपचारासाठी पाठवून सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. त्या रुग्णालयाच्या समितीत आपण सदस्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागाच्या विकासासाठी भाजपला सत्तेत आणण्याचे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जिल्हा निवडणूक प्रमुख डॉ. अमित कावरे, जिल्हा सरचिटणीस माधव मानकर, राजेश नागमते, अंबादास उमाळे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश तायडे, ज्येष्ठ नेते रामदास लांडे, जिल्हा सचिव विलास पोटे, उमेश जाधव, दिलीप पटोकार, तालुका अध्यक्ष किशोर कुचके, राजेश्वर वैराळे, योगेश पटोकार, माधव म्हैसने, चंद्रकांत माळी, सुनील मानकर, संजय देऊळकर, सुनील ठोकणे, ज्ञानेश्वर भगत, किशोर टिकार, विष्णु वराळे, सुभाष धुमाळे, गजानन कराळे, रवींद्र अवतीरकर, सचिन खोट्टे, ज्योती टाले, अर्चना मसने, छाया मानकर यांच्यासह जिल्हा व तालुक्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# मुंडगावसह परिसरात स्मार्ट मीटर बसविण्याचा सपाटा

## ग्रामपंचायतीचा ठराव, नागरिकांचा तीव्र विरोध

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगावसह परिसरातील गावांमध्ये घराघरांत स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याचा सपाटा सुरू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. कोणतीही पूर्वकल्पना किंवा सविस्तर माहिती न देता घरांवर स्मार्ट मीटर बसविले जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी याविरोधात ग्रामपंचायतीकडे धाव घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर मुंडगाव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत स्मार्ट मीटर बसविण्याच्या विरोधात ठराव मंजूर करण्यात आला. मौजे मुंडगाव (ता. अकोट, जि. अकोला) येथे घरगुती वीज ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवू नयेत, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.

ग्रामपंचायत सभेत सरपंचांच्या अध्यक्षतेखाली हा विषय चर्चेला आला. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून घरगुती वीज ग्राहकांच्या घरी जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविले जात असल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतीला प्राप्त झाल्याचे सभेत नमूद करण्यात आले. त्यामुळे नागरिकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवू नयेत, असा निर्णय घेण्यात आला.

‘गावातील नागरिकांना न विचारता स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. हा प्रकार थांबवला नाही तर गावकरी आंदोलन छेडतील आणि वेळ पडल्यास आमरण उपोषणालाही बसतील.’

**- मंगेश दहिभात** नागरिक, मुंडगाव

------------------------

‘ग्राहकांच्या मागणीनुसारच आमचे कर्मचारी घरी जाऊन स्मार्ट मीटर बसवित आहेत. कोणालाही न विचारता मीटर बसविले जात नाहीत.’

**- शेंद्रे,** साहाय्यक अभियंता, मुंडगाव

ठराव क्र. ०९ अंतर्गत सुचक अरविंद फुसे व अनुमोदक नितीन गाडगे यांच्या प्रस्तावावर सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांच्या स्वाक्षरीने हा ठराव मंजूर करण्यात आला. मात्र ग्रामपंचायत सचिवांनी यावर वैयक्तिक मत नोंदविताना शासन निर्णयाच्या विरोधात असा ठराव घेणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. तरीही सभेत उपस्थित सदस्यांनी ठरावाला मंजुरी दिली.

दरम्यान, स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न सुरूच राहिल्यास नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

गरज पडल्यास आमरण उपोषणाचा मार्गही अवलंबला जाईल, असेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले. तर स्मार्ट मीटर बसविण्याच्या मुद्द्यावर आता मुंडगावात नागरिक आणि वीज वितरण कंपनी यांच्यातील वाद चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ला राष्ट्रीय पुरस्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व ग्राहकांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून देणे आणि तांत्रिक अचूकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने स्मार्ट ग्रीड अंतर्गत विकसीत केलेली ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ देशात सर्वोत्तम ठरली आहे. इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषदेमध्ये शुक्रवारी (दि. १३) या तंत्रज्ञानासाठी महावितरणचा ‘आयएसजीफ इनोव्हेशन अवॉर्ड २०२६’ या सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे ’इंडिया स्मार्ट युटिलिटी विक २०२६’ अंतर्गत १२व्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषद झाली. महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ची अंमलबजावणी व फलनिष्पत्तीचे सादरीकरण तीत करण्यात आले. त्याचा अभ्यास करून पाच सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने या तंत्रज्ञानाची परिषदेतील सर्वोत्तम पुरस्कारासाठी निवड केली. सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव पी. उमाशंकर यांच्याहस्ते कार्यकारी संचालक दत्तात्रेय पडळकर व मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) अविनाश हावरे यांनी महावितरणच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

# रंगारंग झाला अग्रवाल महिला संमेलनाचा महिला दिन व गणगौर उत्सव



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व सांस्कृतिक सेवेत सक्रिय असलेल्या अग्रवाल महिला मंडळ आणि अग्रनारी प्रांतीय महिला असो.द्वारे संचालित महाराष्ट्र राज्य अग्रवाल महिला संमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन आणि राजस्थानी समाजातील सुहागरूप गणगौर गोठ उत्सव रंगतदार वातावरणात साजरा करण्यात आला. स्थानिक खदान परिसरातील अनिता किशोर अग्रवाल यांच्या बिट्टी सेठ बंगल्यात संमेलनाच्या उषा अग्रवाल यांच्या नेतृत्वात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमात डॉ. रुपाली चौधरी, डॉ. मनिषा अग्रवाल, डॉ. ममता जयकुमार अग्रवाल, अखिल भारतीय अग्रवाल महिला संमेलनाच्या अध्यक्षा निर्मला बंसल, अग्रवाल महिला मंडळाच्या अध्यक्षा निशा लोहिया, सचिव मीना बाजोरिया, कोषाध्यक्ष दर्शना गोयनका, अनिता अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.माता गणगौर व इसरजी यांच्या शोभायात्रेने उत्सवाची सुरुवात झाली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत विविध मान्यवर महिलांचा सत्कार करण्यात आला, ज्यात रुपाली चौधरी, डॉ. मनिषा अग्रवाल, डॉ. ममता अग्रवाल, किरण अग्रवाल, अकोला जिल्हाध्यक्ष लता खिरवाल, दर्शना गोयनका, मीना बाजोरिया, निशा लोहिया, आदींनी केले.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (J6012229) From
**NEETU DUMBANI**
-- TO --
**ISHIKA GIRISH TOLANI**
My Residential Address is -- Baba Hardasram Nagar Kacchi Kholi Sindhi Camp Akola Maharashtra 444004.

# प्रभात प्रि-प्रायमरीचा प्रेरणादायी ‘ग्रॅज्युएशन सेरिमनी’

■ प्रतिनिधी | अकोला ■



अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरण, पालकांनी भरगच्च भरलेले सभागृह, कार्यक्रमासाठी समर्पक वैशिष्ट्यांनी सजलेले व्यासपीठ आणि मान्यवरांची उपस्थितीने प्रभात प्रि-प्रायमरी मधील सिनिअर के.जी. पूर्ण केलेल्या १८० चिमुकल्यांना प्रेरणादायी ठरावा असा दिमाखदार ‘ग्रॅज्युएशन सेरिमनी’ कार्यक्रम प्रभात किड्स स्कूलच्या भव्य सभागृहात दि. १४ मार्च २०२६ रोजी संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अ‍ॅड. आशिष पवित्रकार व सुप्रसिध्द होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. सौ.कल्याणी आशिष पवित्रकार उपस्थित होते.प्रभात प्रि-प्रायमरीच्या ‘ग्रॅज्युएशन सेरिमनी’ च्या बहारदार सोहळ्यात प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, ज्येष्ठ नाट्यकर्मी अशोक ढेरे, सचिव नीरज आवंडेकर, शिल्पा आवंडेकर ,प्रभात प्रि-प्रायमरीच्या प्राचार्या सौ. वैशाली टोलमारे, प्रभात किड्स स्कूल (वरिष्ठ) प्राचार्या सौ. वृषाली वाघमारे, उपप्राचार्या सौ. अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, सिनिअर को-ऑर्डीनेटर मो. आसिफ, सीबीएसई चे को-ऑर्डीनेटर प्रशांत होळकर, प्रा. डॉ .सुहास उगले, प्रभात संचालक मंडळाच्या सदस्य व्हि. अनुराधा ह्या व्यासपीठावर उपस्थित होत्या.

समारंभाप्रारंभी पदवी सोहळ्याची विशिष्ट व आकर्षक वेशभूषा असलेल्या चिमुकल्यांची सभागृहाकडे शिस्तबद्ध मिरवणूक निघाली व ते सभागृहात स्थानापन्न झाल्यावर शिक्षणाबाबत प्रेरणादायी शपथ त्यांनी देण्यात आली. प्रभात प्रि-प्रायमरी ‘ग्रॅज्युएशन सेरिमनी’ समारंभाचे प्रास्तविक व भूमिका कथन जान्हवी गेही यांनी केले. आपल्या शैक्षणिक पर्वातील पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल विद्यार्थ्यांना आकर्षक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य व आनंद उपस्थितांना भावपूर्ण करणारा होता.

या समारंभा दरम्यान ज्युनिअर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण व विविधांगी नृत्यांनी उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांची प्रचंड टाळ्यांनी दाद मिळविली.

# सावरगाव : विहिरींच्या सर्वेक्षणात घोळ उघड; चौकशी अहवाल सीईओंकडे

### पात्र नसलेल्या लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न; कारवाईची मागणी



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव येथे गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात गंभीर अनियमितता झाल्याचा प्रकार समोर आला आहे. ग्रामपंचायत सचिव समाधान साळोकार व कृषी सहाय्यक अरुण ताले यांनी काही पात्र नसलेल्या लाभार्थ्यांना आर्थिक व्यवहार करून पात्र ठरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असून, फेरचौकशीत हा प्रकार उघड झाल्याची माहिती मिळाली आहे. या संदर्भातील अहवाल चौकशी समितीने २ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

महादेव पायगन यांनी ७ जानेवारी रोजी सीईओंकडे दिलेल्या तक्रारीत सचिव व कृषी सहाय्यक यांनी आर्थिक व्यवहार करून गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात घोळ केल्याचा आरोप केला होता. या तक्रारीनंतर पातुर पंचायत समितीच्या समितीने १२ जानेवारी रोजी स्थळ पाहणी केली. मात्र या समितीने सादर केलेला अहवाल संशयास्पद असल्याचा आक्षेप घेण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मुर्तीजापूर पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यासह तिघांची स्वतंत्र चौकशी समिती गठित केली. समितीने २४ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता गजानन बलक, धोंडू लाड, वासुदेव लाड आणि मधुकर इंगळे यांच्या विहिरी गाळलेल्या नसतानाही त्यांना पात्र ठरवून सर्वेक्षणात घोळ झाल्याचे निदर्शनास आले.

**कारवाईची मागणी**

दरम्यान, गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात घोळ केल्याप्रकरणी संबंधित सचिव व कृषी सहाय्यकांवर तसेच पातुर पंचायत समितीच्या चौकशी समितीतील अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच प्रारंभीच्या चौकशीतही दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप होत असल्याने या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणीही करण्यात येत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाद्वारे राष्ट्रीय विकास साधावा-खा. धोत्रे

## चाणक्य करिअर पॉईंटच्या अ‍ॅडमिशन गाईडचे भव्य प्रकाशन संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्टाचे तज्ञ वैद्यकीय व अभियंता वर्ग आज जगाला विकासाची दिशा देत आहेत. आधुनिक युद्धकाळात राष्ट्राने ज्याप्रमाणे आपल्या तंत्रज्ञानाने परकीय ड्रोन हल्ले निकामी केले, त्यावरून आपल्या देशातील बुद्धिमत्तेची जागतिक पातळीवरील श्रेष्ठता सिद्ध होते.अशा प्रतिभावान गुणवंतांना योग्य दिशा देण्याचे कार्य ’चाणक्य’ सारखी संस्था करत असून ही महानगरासाठी मोठी उपलब्धी असल्याचे प्रतिपादन अकोला खा अनुप धोत्रे यांनी केले.



शनिवारी केडीया प्लॉट परिसरातील सेन्ट्रल प्लाझा सभागृहात ’चाणक्य करिअर पॉईंट’च्या वतीने आयोजित अ‍ॅडमिशन गाईड नीट युजी २०२६’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी मंचावर संस्थेचे संचालक शुभम देशमुख उपस्थित होते.सर्वप्रथम दीप प्रजवलन, माता सरस्वती पूजन व मान्यवरांच्या स्वागताने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.कार्यक्रमात खा धोत्रे यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना शैक्षणिक मार्गदर्शन करीत ’एंट्रन्स ते पोस्ट अ‍ॅडमिशन’ या संकल्पनेचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.यावेळी संस्था संचालक शुभम देशमुख यांनी या आगळ्या वेगळ्या शैक्षणिक उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी ’चाणक्य’चा गौरवशाली इतिहास आणि या मार्गदर्शक पुस्तिकेच्या सहा वर्षांच्या प्रवासावर प्रकाश टाकला.

या ६ व्या आवृत्तीची वैशिष्ट्ये सांगीत हे पुस्तक केवळ माहितीचे संकलन नसून तांत्रिक निकषांवर आधारित केलेले एक शास्त्रोक्त विश्लेषण आहे. यामध्ये देशातील आणि महाराष्ट्रातील कॉलेजेसची सविस्तर माहिती रेटिंगच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांनुसार सर्वोत्तम कॉलेज निवडणे आता या पुस्तकामुळे सोपे होणार असल्याचे सांगितले.त्यांनी यावेळी उपस्थित पालक आणि शिक्षकांना नीट प्रवेश प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगत मार्गदर्शन केले.प्रस्तुत पुस्तक हे पुणे, अकोला, बुलढाणा व अहमदनगर येथील चाणक्य करिअर पॉईंटच्या अधिकृत केंद्रांवर प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध असून विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.या कार्यक्रमात परिसरातील पालक, वैद्यकीय तज्ज्ञ, डॉक्टर्स व शैक्षणिक संस्थांचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिंदी ड्राय पोर्टच्या नावाखाली तरुणांच्या स्वप्नांची 'धूळधाण'

**६७३ कोटींचा डोलारा असूनही प्रकल्प 'व्हेंटिलेटर' वरच!**

**सेलु / जनमाध्यम**

तालुक्यातील सिंदी (रेल्वे) हे विदर्भाच्या आर्थिक क्रांतीचे केंद्र आणि लाखो हातांना काम देणारे स्वप्न... अशी ओळख असलेल्या 'सिंदी ड्राय पोर्ट'च्या लॉजिस्टिक्स पार्क चे भवितव्य सध्या गडद अंधारात सापडले आहे. 'बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी' या म्हणीप्रमाणे १४ फेब्रुवारी २०२४ रोजी मोठ्या थाटामाटात उद्घाटन तर झाले, पण आज हा प्रकल्प प्रशासकीय अनास्थेच्या विळख्यात अडकला आहे. कोट्यवधींचा खर्च होऊनही हा परिसर केवळ धूळ खात पडला असल्याने, तालुक्यातील त्यापेक्षाही स्थानिक

तरुणांच्या रोजगाराच्या स्वप्नांचा अक्षरशः चक्काचूर होताना दिसत आहे.

तब्बल ६७३ कोटी रुपये खर्ची पडले, पण पदरात पडणारे यश मात्र 'भोपळा' आहे. ५३५ एकरपैकी १५० एकरांवर भव्य नियोजनाचे स्वप्न दाखविण्यात आले होते.मात्र सध्या तिथे केवळ शुकशुकाट आहे. 'गरज सरो आणि वैद्य मरो' या वृत्तीने प्रशासनाने या प्रकल्पाकडे पाठ फिरवल्याचे दिसते. गेल्या ९ महिन्यांपासून प्रकल्पातील कामाची एक वीटही हललेली नसून तारीख पे तारीख नशीबी येत आहे. फक्त तांत्रिक कारणे आणि 'लालफितीशाहीच्या' कारभा रात विकासाची फाईल अडकून पडली आहे.

**नेत्यांची स्वप्ने अन् प्रशासनाची 'ढिम्म' गती**

येणाऱ्या दोन दशकांत या परिसराचा कायापालट होईल, असा ठाम विश्वास दोन वर्षांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला होता. मात्र, आजची भीषण परिस्थिती पाहता 'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला' अशी अवस्था झाली आहे. मा.गडकरींचे स्वप्न आणि मा. फडणवीसांचे नियोजन प्रशासकीय



दिरंगाईमुळे धुळीस मिळताना दिसत आहे.

४१ वर्षांपासून उपेक्षित असलेल्या ५३५ एकर जमिनीला या प्रकल्पामुळे संजीवनी मिळेल, ही आशा बेरोजगारी दूर होऊन औद्योगिक वसाहत फुलेल, या आशेने हजारो तरुण डोळे लावून बसले आहेत. मात्र, काम ठप्प असल्याने आता या आशेचे रूपांतर संतापात होत आता मावळू लागली आहे.

**तरुणांचा सवाल: आमच्या भविष्याशी खेळ का?**

सिंदी रेल्वे परिसर सह तालुक्यातील आहे. 'हाता तोंडाशी आलेला घास' हिरावला गेल्याची भावना स्थानिक बेरोजगारांमध्ये आहे.

६७३ कोटी रुपये खर्च झाले असताना प्रकल्प आजही 'लॉक' का आहे?

उद्घाटनाचा नारळ फोडल्यानंतर कामाचा वेग कुणी मंदावला?

विदर्भाच्या हक्काचा रोजगार लाल फितीशाहीत कां अडकला?

जर तातडीने प्रशासकीय हालचाली झाल्या नाहीत, तर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केवळ कागदावरच 'स्मार्ट' राहील. विदर्भाच्या विकासाचा हा 'महामार्ग' खरोखरच प्रगतीकडे नेणार की आश्वासनांच्या 'डेड एंड'वर संपणार, याचे उत्तर आता सरकारनेच देणे गरजेचे आहे. अन्यथा, 'कधी गाडीवर नाव, तर कधी नावेवर गाडी' या न्यायाने जनता आपला हिशोब चुकता केल्याशिवाय राहणार नाही.

आमच्या पिढ्यानपिढ्यांची जमीन आम्ही विकासाच्या नावाखाली सुपूर्द केली. ६७३ कोटी रुपये खर्चून तिथे उभ्या राहिलेल्या त्या भव्य भिंती म्हणजे आमच्या बेरोजगारीची क्रूर थट्टा आहे. जर ६७३ कोटी खर्च होऊनही स्थानिक तरुणाच्या हाताला काम मिळत नसेल, तर त्या सिमेंटच्या जंगलाचा उपयोग काय? सरकारला फक्त कंत्राटदारांचे खिसे भरायचे होते की खरोखर रोजगार द्यायचा होता, आम्हाला निर्जीव इमारती नकोत, तर सुरू असणाऱ्या कंपन्या आणि स्वाभिमानाचा रोजगार हवा आहे.'



**रुपाली राऊत**

गावच्या शिवारात लॉजिस्टिक्स पार्क येणार म्हणून आम्ही करिअरची स्वप्नं पाहिली, पदव्या घेतल्या. पण आज प्रकल्प ठप्प आहे आणि आमचा उत्साह मातीमोल होतोय. प्रशासकीय लालफितीशाहीच्या कारभारामुळे हा प्रकल्प विदर्भाच्या छातीवरचा 'पांढरा हत्ती' ठरतोय. आमच्या डोळ्यादेखत आमचं भविष्य अंधारात जात असताना प्रशासन अजून किती काळ कुंभकर्णी झोप घेणार? व आम्हा युवा बेरोजगाराच्या जीवनाची राख रांगोळी करणार हे तरी कळू द्या.हा प्रकल्प म्हणजे विकासाचे स्वप्न नसून आमच्या आयुष्याशी खेळलेला एक मोठा जुगार ठरत आहे.



**दामिनी बेलखोडे**

## सर्पदंशाने ५ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

**समुद्रपूर :** दसोडा गावात अंगणात खेळत असलेल्या पाच वर्षीय मुलीचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. पौर्णिमा रामकृष्ण मस्करं (५, रा. दसोडा) असे मृत मुलीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास पौर्णिमा घराच्या अंगणात खेळत असताना विषारी सापाने तिला दोन वेळा दंश केला. अचानक घडलेल्या या प्रकाराने कुटुंबीय घाबरून गेले. तिला तातडीने समुद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात येत असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला.या दुर्दैवी घटनेमुळे मस्करं कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून दसोडा गावात शोककळा पसरली आहे. ग्रामस्थांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

## आर्वी ठाणेदार सतीश डेहनकर यांची बदली

**आर्वी :** येथील पोलीस ठाण्याचे ठाणेदार सतीश डेहनकर यांची अचानक बदली करण्यात आली असून त्यांची जिल्हा विशेष शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे.नुकत्याच झालेल्या अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार दादाराव केचे यांनी आर्वी शहरातील वाढत्या अवैध व्यवसायांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. शहरात खुलेआम सुरू असलेला अवैध दारू व्यवसाय, इतर बेकायदेशीर धंदे तसेच अलिकडील दीड महिन्यात बाजारपेठेत झालेल्या खुनांच्या घटनांवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. खून झाल्यानंतर पोलिसांचा उशिरा प्रतिसाद मिळाल्याचाही मुद्दा त्यांनी अधोरेखित केला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने पावले उचलत सतीश डेहनकर यांची उचलबांगडी केली. दरम्यान, जिल्हा विशेष शाखेचे ठाणेदार सदाशिव ढाकणे यांची आर्वी येथे नव्या ठाणेदारपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे.शहरातील कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी ही बदली महत्त्वाची ठरेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

## अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**समुद्रपूर :** अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करत समुद्रपूर पोलिसांनी विना क्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉलीसह चालकास अटक केली. ही कारवाई १४ मार्च रोजी सकाळी समुद्रपूर-वायगाव गोंड मार्गावरील पुलाजवळ करण्यात आली. पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. तपासणीदरम्यान ट्रॅक्टरमध्ये सुमारे एक ब्रास काळी रेती आढळून आली. चालकाकडे परवाना व रॉयल्टीची कागदपत्रे नसल्याने वाहन जप्त करण्यात आले. महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा सुमारे १० लाख ९ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. सचिन चिंदजी घोटे (रा. रामनगर) याला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी पसार आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## चाकू हल्ल्यात युवक गंभीर जखमी; आरोपी अटकेत

**आर्वी :** प्रेमविवाहाच्या वादातून तरुणावर चाकूने हल्ला करून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना लहादेवी येथे घडली. १३ मार्च रोजी सायंकाळी झालेल्या या प्रकारात सुनील विनायक धुर्वे (वय २६) हा गंभीर जखमी झाला. घरासमोर झालेल्या कौटुंबिक वादात उमेश बिसन कोकाटे याने संतापाच्या भरात सुनीलवर झडप घालत छातीवर चाकूने वार केल्याचे सांगितले जाते. उपस्थित नातेवाईकांनी हस्तक्षेप करून जखमीला तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. घटनेनंतर आर्वी पोलिसांनी आरोपीस अटक केली. या प्रकरणी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# हिंगणघाटात ड्रग विकणाऱ्या युवकाला अटक; सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट /जनमाध्यम**

शहरातील चौका शाळा परिसरात ड्रगची विक्री करणाऱ्या एका युवकाला अमली पदार्थ प्रतिबंधक विशेष चमू व डीबी पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपीकडून मॅफेड्रोन या अमली पदार्थासह दुचाकी व मोबाईल असा एकूण १ लाख १० हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाचे कर्मचारी परिसरात नियमित पेट्रोलिंग करत असताना चौका शाळा व टाका ग्राउंड परिसरात अमली पदार्थांची विक्री होत



असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. त्यावेळी समीर खुशालराव गायकवाड (वय ३०, रा. नन्नाशा वॉर्ड) याला ताब्यात घेऊन कायदेशीर झडती घेण्यात आली.

झडतीदरम्यान आरोपी कडील प्लास्टिक पिशवीत मॅफेड्रोन (मनोव्यापारावर परिणाम करणारा अमली पदार्थ) आढळून आला. प्लास्टिकसह एकूण वजन ५.७८ ग्रॅम असून त्याची किंमत सुमारे १५,९३० रुपये आहे. याशिवाय टीव्हीएस कंपनीची ज्युपिटर मोपेड (क्र. एमएच ३२ एक्यू ९४१४) किंमत ८० हजार रुपये आणि एक अँड्रॉइड मोबाईल (किंमत १५ हजार रुपये) असा एकूण १,१०,९३० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सपोनि पद्माकर मुंडे, उपनिरीक्षक सादिक शेख तसेच अमली पदार्थ विरोधी कृती दल व डीबी पथकातील अधिकारी-कर्मचारी सहभागी होते.

## हिंदी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरास प्रारंभ

**वर्धा /जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत १३ ते १९ मार्चदरम्यान आयोजित विशेष शिबिराचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १३) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

विद्यापीठाच्या उत्तरी परिसरात परीक्षा नियंत्रक व प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेंद्र गादेवार तसेच 'मेरा युवा भारत'चे उपनिदेशक शिवधन शर्मा यांच्या हस्ते शिबिराचा शुभारंभ झाला.

या प्रसंगी एनएसएस एककाचे संयोजक डॉ. बालाजी चिरडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. विधु खरे दास, डॉ. शिव सिंह बघेल, डॉ. हेमचंद्र ससाने यांच्यासह स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी शिबिराचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण होण्यास अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. सहभागी विद्यार्थ्यांना टी-शर्टचे वितरणही करण्यात आले.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी गुर्रम जाशुवा सभागृहात 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते कॅप्टन मोहन गुजरकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा उल्लेख करत युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असल्याचे सांगितले.

**गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी**

# अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष

**मुंबई / वर्धा जनमाध्यम**

इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## जिल्हास्तरीय समित्या स्थापन

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत.

यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

## निधन वार्ता

### गोदावरी पालीवाल



**सिंदी रेल्वे -** येथील पालिकेच्या माजी उपाध्यक्ष गोदावरी आईदानजी पालीवाल यांचे वृध्दापकाळी वयाच्या ८७ व्या वर्षी शनिवारी सायंकाळी निधन झाले. मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर रविवारी अंत्यसंस्कार पार पडला. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंड आणि मोठा आप्तपरिवार आहे

### राजाराम वरघणे



**सिंदी रेल्वे -** माजी शासकीय कर्मचारी राजाराम वरघणे यांचे अल्प आजारात शनिवारी निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. स्थानिक मोक्षधामात दुपारी अंत्यसंस्कार पार पडला.त्यांच्या पश्चात दोन मुले,तीन मुली, सुना, जावई ,नातवंडे आणि मोठा परिवार आहे.


# जाहीर सूचना

माझे पती विष्णुदास रामराव धवणे याचे दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दूचाकी वाहन क्रमांक MH32AN2156 आणि MH32AC7917 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव छाया विष्णुदास धवणे वय (४९) रा. वाघोली ता. देवळी जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र

**छाया विष्णुदास धवणे**

रा. वाघोली ता. देवळी जि. वर्धा


८०८०१३४३८९


# डिजिटल तारांगणातून विद्यार्थ्यांचा नभांगणाशी साक्षात्कार

**देवळी (वर्धा) /जनमाध्यम**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे आणि खगोलशास्त्राची आवड निर्माण करणे या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आयोजित चालते-फिरते डिजिटल पोर्टेबल तारांगण या उपक्रमाला देवळीतील सृजन इंग्लिश ज्ञानपीठ येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाचवी ते नववी व अकरावीतील सुमारे १२०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नभगंगनाचा अद्भुत अनुभव घेतला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्हा व देवळी शाखा तसेच सृजन इंग्लिश ज्ञानपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या नव्याने बांधलेल्या सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी राज्य प्रधान



सचिव गजेंद्र सुरकार, शाळेच्या प्राचार्या डॉ. श्रद्धा चोरे, देवळी शाखेचे कार्याध्यक्ष विक्की बिजवार, प्रधान सचिव विजय पचारे व महिला विभागाच्या कार्यवाह अनुराधा उटाणे प्रमुख उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना गजेंद्र सुरकार यांनी ग्रह, तारे, पृथ्वी, सूर्य, चंद्र, गुरू, शनी तसेच आकाशगंगेची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत दिली.

आकाशातील ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर थेट परिणाम होत नसून प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून तपासून सत्य वाटल्यासच स्वीकारावी, असे त्यांनी सांगितले.यानंतर विद्यार्थ्यांनी कृत्रिम रित्या उभारलेल्या डोममध्ये प्रवेश करून ब्रह्मांडाची निर्मिती, सौरमाला, पृथ्वीचा उगम, जीवसृष्टीचा विकास, मानवाचा जन्म तसेच कोपर्निकस, गॅलिलिओ आदी शास्त्रज्ञांचे खगोलशास्त्रातील योगदान यांची माहिती दृकश्राव्य माध्यमातून घेतली. सूर्यग्रहण-चंद्रग्रहण, पौर्णिमा-अमावस्या यांसारख्या खगोल घटनांमागील वैज्ञानिक कारणेही त्यांनी समजून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पचारे यांनी केले, तर प्रस्तावना विक्की बिजवार यांनी मांडली. आभार प्रदर्शन प्राचार्या डॉ. श्रद्धा चोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पारिसे, नेहा घोडे, प्रशांत खोब्रागडे, मधुकर तेलंग तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष -१४ अंक -१०८**

**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालयः-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८

ई-मेल-atimadhyam@gmail.com

abhiramdeshpande@gmail.com

# अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी.ड्रग्स तस्करीचे हब - आ.संजय खोडके

## डीआरआय ने केला पर्दाफाश, तरीही अमरावती पोलीस विभाग ठप्प

**मुंबई/प्रतिनिधीः-** फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यातमध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त जप्त करीत शहरातील ड्रग्स तस्करीचा पर्दाफाश केला. या गंभीर प्रकरणाला घेऊन राज्यअधिवेशनात लक्षवेधी लावत असतांना हा विषय संबधित विभागाकडे जाताच नुकतीच महाराष्ट्र पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने धाड टाकत अमरावती शहरातून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी.ड्रग्स तस्करीचे हब बनत असतांना अमरावती शहर पोलीस, संबंधित विभाग व पोलीस स्टेशन हे ठप्प बसले आहेत. असे सांगून आमदार संजय खोडके यांनी शहरातील एम.डी. ड्रग्स तस्करीबाबत राज्याविधिमंडळात प्रश्न उपस्थित केला.

राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासांमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती मधील एम.डी. ड्रग्स तस्करीला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे ? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी संभागृहा समक्ष सांगितले कि, अमरावती शहरामध्ये फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यामध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. यावेळी त्यांनी शहर पोलीस विभागाला माहिती देऊन ही कारवाई केली. यापूर्वी सुद्धा अमरावती शहरात एका वर्षात २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अमरावती शहरात काही टोळी सक्रिय असून त्या शहरातील विविध भागात ड्रग्स ची विक्री करत असतात. मात्र ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ड्रग्स विक्री होते , तेथील पोलीस मात्र याबाबत ठप्प असून अमरावती शहरात पोलिसातील बडे अधिकारी यांचे सुद्धा याकडे



दुर्लक्ष करत असल्याने अमरावती शहर ड्रग्स तस्करीचे हब बनत चालले असल्याचे आ. संजय खोडके यांनी सभागृहा समक्ष स्पष्ट केले. या संदर्भात आपण अधिवेशनात लक्षवेधी लावून धरत असतांना जेव्हा हा विषय संबंधित विभागाकडे जातो, त्यानंतर लगेच अमरावती शहरात गुन्हे शाखेने धाड टाकून नागपुरी गेट ठाण्या हद्दीतून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. ज्या पोलीस स्टेशन मध्ये धाडी करण्यात आल्यात, त्यात गुन्हे शाखेने कारवाई केली. परंतु संबंधित पोलीस स्टेशन व अधिकारी मात्र ठप्प बसले असल्याने यामध्ये अमरावती पोलीस विभागातील बडे अधिकाऱ्यांचे साटेलोटे आहे का ? असा प्रश्न उपस्थित करून आ. संजय खोडके यांनी अमरावती शहराच्या पोलीस प्रशासनात नव्याने बदल करण्याची गरज असल्याचे सभागृहासमक्ष सांगितले. मागील अधिवेशनातही अमरावती मधील एम.डी. ड्रग्स प्रकरणाबाबत लक्षवेधी मांडली असता ,यावर शासनाच्या वतीने योग्य धोरण ठरविणार असल्याचे सांगण्यात आले होते. आता यासंदर्भात निर्णय घेणार का ? असा प्रश्न सुद्धा अधिवेशनातून करण्यात आला. यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले कि, अमरावती शहरात डीआरआय तसेच क्राईम ब्रँच मार्फत एम. डी. ड्रग्सबाबत कारवाई करण्यात आली. हे खरे असून पोलीस स्टेशन स्तरावर सुद्धा कारवाई होत आहे. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये प्रामुख्याने महानगर पालिकांच्या हद्दीमध्ये नवीन फोर्स तयार करून कार्यवाही करण्यात येत आहे. एम.डी. ड्रग्स विरोधी कारवाई व प्रतिबंध लावण्याला घेऊन महानगर स्तरावर ए.एन.डी.एफ. स्थापन करण्यात आले असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी शासनाच्या वतीने आपल्या उत्तरात म्हटले आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात मूट ट्रायल स्पर्धा उत्साहात

## -विद्यार्थ्यांनी दाखवली वकिली कौशल्यांची चमक - १५ चमूंचा उत्स्फूर्त सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना ट्रायल न्यायालयातील वकिली कौशल्यांची प्रत्यक्ष अनुभूती मिळावी या उद्देशाने 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती मूट ट्रायल स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा २८ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान महाविद्यालयाच्या मूट कोर्ट हॉलमध्ये पार पडली. स्पर्धेत महाविद्यालयातील सुमारे १५ चमूंनी सहभाग नोंदविला.



स्पर्धेचे उद्घाटन २८ फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ एक्झामिनेशन अँड इव्हॅल्यूएशनचे संचालक डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेश पाटील यांनी केले. प्राचार्या प्रा. डॉ. वर्षा देशमुख यांनी स्पर्धेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कोळी यांनी भविष्यातील सक्षम वकील घडवण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगत महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी व्यासपीठावर डॉ. एन. के. रामटेके व अॅड. नमिता अवस्थी उपस्थित होते. स्पर्धेच्या प्रारंभिक फेऱ्या २८ फेब्रुवारी रोजी पार पडल्या, तर अंतिम फेरी १ मार्च रोजी झाली. अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून अमरावतीतील प्रख्यात विधिज्ञ अॅड. परीक्षित गणोरकर, अॅड. दिलीप तिवारी, अॅड. शिरीष जाखड व अॅड. परवेज खान यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. भैय्यासाहेब पाटील पुसदेकर होते. यावेळी मंचावर प्रा. डॉ. राजेश पाटील व डॉ. एन. के. रामटेके उपस्थित होते. स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**स्पर्धेतील विजेते बेस्ट टीम :** प्रतीक्षा मेटकर, समृद्धी गिरी, गोविंद कोलिया

**उपविजेता टीम :** कृष्णा नलवाडे, प्रज्वल गायगोले, प्रज्वल उपासने

**बेस्ट अॅडव्होकेट :** कृष्णा नलवाडे, बेस्ट फीमेल अॅडव्होकेट : प्रतीक्षा मेटकर, बेस्ट चीफ एक्झामिनेशन : समृद्धी गिरी, प्रथमेश थोरात, बेस्ट क्रॉस एक्झामिनेशन : वैभव तायडे

**बेस्ट जज :** मयुरी चटाले

बेस्ट विटनेस : लवकुश तिडके याशिवाय इतरही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तीका कुबडे यांनी केले, तर रेणू उत्तमनी यांनी आभार प्रदर्शन केले.

# विष प्राशन करून तरूणाची आत्महत्या



**मोर्शी/प्रतिनिधीः-** एका ३७ वर्षीय युवकाने आपल्या स्वतःच्या शेतात विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना दि.१३ मार्च रोजी उघडकीस आली.मृतक युवकाचे नाव आशिष शरद मानकर रा. ज्ञानदीप कॉलनी मोर्शी असे आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की फिर्यादी संदीप शरद मानकर यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली की आशिष मानकर हा दारु पिण्याच्या सवईचा होता.दोघांच्या नावाने मौजा जामठी शेत शिवारात शेती असून आठ दिवसापूर्वी पासून आशिष शरदराव मानकर हा शेतातच राहत होता तेथेच दारू पिऊन झोपत होता. दि.१३ मार्च रोजी ११:४५ वा संदीप याला दूरध्वनी वरून अशी माहिती मिळाली की आशिष शरदराव मानकर याने शेतातच किटकनाशक औषध प्राशन केले.लगेच त्याला शेतात काम करणाऱ्या मजुरांनी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे आणून भरती केले. परिस्थितीचे गांभीर्य पाहून उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आशिष मानकर यांचेवर तात्काळ उपचार सुरू केले.मात्र उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.आशिष हा दारु पिण्याच्या सवईचा होता त्याने दारुच्या नशेमध्ये विषारी औषध प्राशन केल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नांदगावकर अधिक तपास करीत आहे.

# गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टला एक कोटी रुपये- आ.सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुरुदेव सेवाश्रमट्रस्ट राधानगर ही संस्था राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराच्या प्रचार प्रसाराचे कार्य निष्ठा पूर्वक करणारी अमरावती शहरातील महत्वाची संस्था आहे

त्यांचे कार्य मी गेल्या पंधरा वीस वर्षापासून पहात आहे म्हणून या ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे या संस्थेच्या नवीन इमारतीचा चार कोटी रुपयाचा प्लॅन मी तयार केला आहे व त्यापैकी एक कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. लवकरच नवीन इमारतीच्या कामाला सुरुवात होईल व बाकीचा तीन कोटी रुपयांचा निधी टप्प्याटप्प्याने मंजूर केला जाईल अशा आशयाचे उद्गार अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी काढले.

गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधानगर अमरावती येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यस्मरण महोत्सवात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

सेवाश्रमाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सतीश तराळ समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी अतिथी म्हणून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे संचालक माजी मंत्री सुरेन्द्र भुयार, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ मोझरीचे प्रचार विभाग प्रमुख गोपाल कडू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगेबाबा अध्यासन केंद्राचे अध्यासन प्रमुख प्राचार्य डॉ. दिलीपराव काळे, प्राचार्य दिलीपसिंह खांबरे,



साई संस्थान पुलगावचे अध्यक्ष व गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे मानद संस्थापक वसंतराव वंडलकर उपस्थित होते . अतिथी आणि समारंभाचे अध्यक्ष यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अलौकिक कार्यावर प्रकाश टाकला.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातकीर्त कीर्तनकार कीर्तनकेसरी लक्ष्मणरावदास काळे महाराज यांचे दोन तास सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांनी गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधानगर ही अमरावती शहरातील दीर्घ काळापासून राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रचार प्रसार करणारी, जनजागरण,प्रबोधन करणारी एकमेव संस्था असल्याचे प्रतिपादन केले. या पुण्यस्मरण सोहळ्यात अमरावती महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अविनाश मार्डीकर, लक्ष्मणदास काळे महाराज, सेवाश्रमाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष शंकरराव वसू यांचा अतिथींच्या वतीने हस्ते सत्कार करण्यात आला . अविनाश मार्डीकर यांनी सत्कारला समायोजित उत्तर दिले.

सकाळी पाच वाजता मनोहरराव पोहोकार व सौ पोहोकारताई यांच्या हस्ते तीर्थ स्थापना करण्यात आली. साडेपाच वाजता झालेल्या ध्यानानंतर प्रा. अंकुश मानकर यांचे ध्यानाच्या महत्त्वावर भाषण झाले. दुपारी दीड वाजता पासून महाप्रसादाला सुरुवात झाली. संध्याकाळी सात वाजता ट्रस्टचे सचिव श्रीधर डहाके यांचे सामुदायिक प्रार्थने नंतर सामुदायिक प्रार्थनेच्या महत्त्वावर भाषण झाले. पुण्यस्मरण महोत्सवाच्या यशस्वीते करिता संस्थेचे विश्वस्त व कोषाध्यक्ष रामदासजी सदार, बाळासाहेब महल्ले डॉ.श्रीधरराव जावरकर, मनोहरराव वाठ, अनंत हागवणे चंद्रकांत बकाले,हरिभाऊ ठाकरे नारायण भाटी इत्यादींनी परिश्रम घेतले. पुण्यस्मरण सोहळ्याकरता शहरातील गुरुदेव प्रेमी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# डॉ.राम शेवाळकर जयंतीनिमित्त व्याख्यान व भक्तिसंगीताचा सुरेल स्वरोत्सव

**अचलपूर/प्रतिनिधीः-** येथील शेवाळकर प्रतिष्ठानच्या वतीने प्रख्यात वक्ते, साहित्यिक आणि विचारवंत 'वक्तादशसहस्त्रेषु' डॉ. राम शेवाळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान आणि भक्तिसंगीताचा भव्य स्वरोत्सव अचलपूर शहरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. माळवेशपुरा येथील शेवाळकर सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात अचलपूर-परतवाडा परिसरातील स्थानिक कलावंतांनी आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रा. भा. महाजन होते. प्रमुख वक्ते म्हणून शिशिर देशपांडे यांनी डॉ. राम शेवाळकर यांच्या जीवनप्रवास, साहित्यिक योगदान आणि प्रभावी वक्तृत्वशैलीवर अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी व्याख्यान दिले. यावेळी नगराध्यक्षा रुपाली अभय माथने, नगरसेवक कल्लू महाराज दीक्षित तसेच नगरसेविका कविता नितीन आखुड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. शेवाळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक हर्षदा उकळकर यांनी केले. व्याख्यान सत्रात शिशिर देशपांडे यांनी शेवाळकर सरांच्या विचारांची व्यापकता, त्यांच्या भाषणातील ओजस्विता आणि समाजमनाला घडविणाऱ्या त्यांच्या कार्याचा वेध घेतला. अध्यक्षीय भाषणात प्रा. महाजन यांनी शेवाळकर प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक उपक्रमांचे कौतुक करत अशा कार्यक्रमांमुळे समाजात विचारांची जागृती होत असल्याचे नमूद केले. या सत्राचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन गंधार कुलकर्णी यांनी केले.

व्याख्यानानंतर आयोजित 'स्वर-संवाद' या भक्तिसंगीताच्या कार्यक्रमाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. प्रा. सोनाली कलोती, अभय जोशी, प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी, प्रा. डॉ. उत्तरा प्रधान, डॉ. भाग्यश्री मोकासदर, डॉ. कनका उधळीकर, मोहना तोंडगावकर, श्रीरंग तारे, स्वराली श्रीनाथ, प्रा. रवींद्र श्रीनाथ, प्रा. डॉ. सारिका श्रावणे आणि सुनील बहोरिया यांनी विविध भक्तिगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या सादरीकरणाला प्रथमेश मोरे (तबला), सारंग पेंडसे (पखवाज), रविंद्र श्रीनाथ व पल्लवी गणोरकर (संवादिनी), सुनील बहोरिया (कीबोर्ड) आणि अप्पा वाले (तालवाद्य) यांनी प्रभावी साथसंगत देत कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली.

कार्यक्रमाची सांगता प्रा. सोनाली कलोती यांनी सादर केलेल्या 'पसायदान' या भावपूर्ण सादरीकरणाने झाली. भक्तिसंगीत सत्राचे आभार प्रदर्शन सारंग पेंडसे यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन नंदकिशोर पेंडसे यांनी केले, तर सारंग पेंडसे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन करण्यात आले. या सांस्कृतिक सोहळयास परिसरातील रसिक नागरिक, साहित्यप्रेमी आणि शेवाळकर सरांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम अचलपूरच्या सांस्कृतिक जीवनाला समृद्ध करणारा आणि डॉ. राम शेवाळकर यांच्या विचारांची आठवण करून देणारा ठरला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# स्व.अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालयात एचपीव्ही लसीकरणाबाबत पालकांना मार्गदर्शन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने स्व. अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालय,मोर्शी येथे गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरणाबाबत मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी यांच्या सहकार्याने पार पडला. उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रकाश मंगळे यांनी १४ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांना गर्भाशय मुख कर्करोगाची कारणे, लक्षणे तसेच त्यापासून बचाव करण्यासाठी लसीकरणाचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. योग्य वयात एचपीव्ही लस घेतल्यास गर्भाशय मुख कर्करोगासारखा गंभीर आजार टाळता येऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.दिलीप टिगंने तसेच कर्मचारी विनय शेलुरे, प्रशांत बेहरे, कल्पना पंधरे व पुष्पा पंधरे उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले.पालकांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. डी.जुनघरे सर होते.यावेळी पालक प्रतिनिधी नंदकिशोर वडुळकर, मनीषा संतोष मोहोड, पालकवृंद, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही.व्ही. करडे यांनी केले तर आभार प्रदर्शन ए.एस.धांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळाव्यात ३२ महिला उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यास जिल्ह्यातील महिला उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रोजगार मेळाव्याला एकूण ५० रिक्त पदांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन ९६ महिला उमेदवारांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ५६ उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ३२ महिला उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाकरिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती कार्यालयाचे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी अभिषेक ठाकरे उपस्थित होते. या मेळाव्यात नामांकित खासगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यामध्ये ओरस एच. आर. सोलुशन नांदगाव पेठ, रेडीयंत हॉस्पिट च्या वैशाली लाहे, एस बी.आय क्रेडीट कार्डचे राहुल सवाई या उद्योजकांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली.

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्री. विनायक विश्वनाथ इंगोले,** वय ६९ वर्षे, रा. सुतगिरणी रोड, अन्नपूर्णा प्राव्हीजन्स जवळ, सरोज कॉलनी, अमरावती यांनी खालील वर्णन केलेला लेआऊट प्लॉट विकत घेण्याचा सौदा करण्याचे ठरवलेले आहे. सदरहू मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

नोंदणी पोटतुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व म.न.पा.अमरावतीचे हद्दीतील मौजे बडनेरा भाग-३, प्रगणे- बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.३११ मधील जमिनीतील रा.मा.क. एन.ए.पी.३४/बडनेरा-१०७/२००१-२००२, नि.ता.१८.१०.२००२ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या लेआऊट मधील प्लॉट नं.८१ (एक्क्याऐंशी) याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे पुर्व बाजू २०.१० मी., पश्चिम बाजू १७.१० मी., उत्तर बाजू १७.४५ मी. व दक्षिण बाजू १७.०० मी. असून याचे एकुण क्षेत्रफळ ३१६.२० चौ.मी. (३४०२.३१ चौ.फुट) याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे - पुर्वेस - सर्व्हे नं.३१२ चे लेआऊट, पश्चिमेस - लेआऊट रोड, उत्तरेस - लेआऊट रोड, दक्षिणेस - प्लॉट नं.८२-ए तसेच सदरहू मिळकतीची खरेदी ही दि.३१.०३.२०२६ किंवा त्यापुर्वी करण्याचे ठरविले आहे व कोणत्याही व्यक्तिंचा काही आक्षेप असल्यास वरील नमुद खरेदीच्या तारखेपुर्वी माझे पक्षकाराला येऊन प्रत्यक्ष भेटावे व शहानिशा करून घ्यावी.

येणेप्रमाणे वर्णन केलेल्या प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, कर्ज, ताबा, गहाणखत, वारसा हक्क, कुळ हितसंबंध, अतिकमण, सरकारी अथवा निमसरकारी कर्ज, हाऊसिंग फायनान्स व कोर्टाचा हुकूमनामा अथवा जप्ती असल्यास लेखी कागदोपत्री पुराव्यासह किंवा सबळ कारणासह मला माझ्या खालील पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांचे आत लेखी कळवावे. वरील मुदतीनंतर कोणत्याही प्रकारची तकार अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार वरील मिळकतीच्या सौद्याचा व्यवहार पूर्ण करतील. कृपया याची संबंधितांनी नोंद घ्यावी, कळावे.

अमरावती दि.१५.०३.२०२६

आपला,
**(अॅड.आर.डी.वानखडे)**
सांगाणी नगर, अमरावती-४४४६०५
मो.नं.९८२२९७१२१५

## अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये

# आरबीएसके योजनेतून १२ बालकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

### राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा-आ.संजय खोडके

**अमरावती/का.प्र.**
नवजात बालकांमधील जन्मजात व्यंग ओळखून त्यांची तपासणी व शस्त्रक्रिया द्वारे बालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके ) च्या माध्यमातून अमरावती स्थित विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात आतापर्यंत १२ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. बालकांच्या आरोग्याच्या बाबतीत राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब मंत्री ना.प्रकाश आबिटकर चांगले काम करत आहे. पुढेही राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम चांगल्या पद्धतीने राबविण्यासाठी व जास्तीत जास्त बालरुग्णांना याचा लाभ मिळावा



म्हणून आरबीएसके योजनेचा अधिक विस्तार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, अशी लक्षवेधी मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून राज्य शासनाकडे केली आहे.

राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात बोलत असतांना आ. संजय खोडके यांनी सांगितले कि, आरोग्य सुविधांच्या बाबतीत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग अत्यंत तत्परतेने काम करत आहे.नवजात बालकांमधील जन्मजात व्यंग ओळखून दोन वर्ष वयाच्या आतील बालकांच्या विविध जटिल शल्यक्रिया या महात्मा फुले जनआरोग्य योजना असो किंवा राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातून मोफत करण्यात येतात. शासनाच्या वतीने या शस्त्रक्रियेचा खर्च उचलला जात आहे. परंतु योजनेमध्ये केवळ २ वर्षाच्या आतील बालकांना लाभ दिला जात असल्याने अनेक वेळा ते योजनेच्या लाभात बसत नाही. म्हणून बालरुग्णांना योजनेच्या लाभात सामाविष्ट करण्यासाठी वयोमर्यादा वाढविण्यात यावी , अशी सुचना आ. संजय खोडके यांनी केली. महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम चांगल्या पद्धतीने राबविण्यासाठी व जास्तीत जास्त बालरुग्णांना



याचा लाभ मिळावा म्हणून आरबीएसके योजनेचा अधिक विस्तार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, अशी लक्षवेधी मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून राज्य शासनाकडे केली आहे.

# मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी घराचे नकाशे शोधणार

**अमरावती/का.प्र.**
मालमत्ता कर वसुलीसाठी महानगर पालिकेच्या कर विभागाने सध्या जोरदार मोहीम सुरू केली आहे. ज्या मालमत्ता धारकांकडे १ लाखावरील मालमत्ता कर थकीत असेल त्यांच्या घराचे नकाशे अभिलेखागारातून शोधून संबंधित झोनच्या अभियंत्यांना दिले जाणार आहेत. त्यानंतर अभियंता उपलब्ध नस्तीच्या आधारे झोन कार्यालयातील उपअभियंत्यांसह स्थळ निरीक्षण करून प्रत्यक्ष जागेवर करण्यात आलेल्या बांधकामाची तपासणी करून त्यामध्ये नियमांचे उल्लंघन केलेले आढळले तर वस्तुस्थिती अहवाल तयार करून मालमत्ता धारकावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

कारवाईसाठी झोन क्र. १, झोन क्र. २ व ५ तसेच झोन क्र. ३ व ४ यानुसार पथक

### मनपापुढे आव्हान

स्थापन करण्यात आले आहे. थकबाकीदारांना नोटीस बजावल्यानंतर तसेच त्यांच्यासाठी विविध योजना आणल्यानंतरही मालमत्ता कर भरला जात नसल्यामुळे महानगर पालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीसाठी सध्या मालमत्ता सील करण्यास सुरुवात झाली आहे. मनपा क्षेत्रातील पाच मालमत्ताही सील करण्यात आल्या आहेत.मनपाने मोठ्या प्रमाणात केलेल्या प्रयत्नांमुळे १ एप्रिल २०२५ ते १० मार्च २०२६ या कालावधीत पाचही झोनमधून ५७ कोटी ८८ लाख रुपये कर वसुली केली. यात नियमित तसेच थकीत कराचाही समावेश आहे.

गेल्या काही वर्षात मनपाची कर वसुली फारच कमी झाल्यामुळे त्यांच्यापुढील आर्थिक संकट वाढले असून मनपाला आर्थिक चणचणीमुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यात मुख्यत्वे शहरातील विकासकामे रखडणे, कंत्राटदारांची देयके प्रलंबित राहणे, कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित न होणे अशा अनेक समस्यांचा समावेश आहे. सध्या १ लाखावर कर थकीत असलेल्या मालमत्तांविरोधात कारवाई सुरू झाली आहे. या मालमत्ता धारकांना नोटीस बजावल्यानंतरही त्यांनी कर भरण्यास मनपाला सहकार्य केले नसल्याने सील ठोकण्याची कारवाई गेल्या अनेक वर्षांत प्रथमच सुरू करण्यात आली. अन्यथा याआधी मनपा केवळ नोटीस देऊन मोकळी होत होती. परिणामी कराच्या थकबाकीचा आकाडा चांगलाच फुगला आहे.

## संक्षिप्त

### प्रसाद तरेकरची वैद्यकीय क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी



**नांदगाव खंडेश्वर-** अखिल भारतीय वैद्यकीय क्षेत्रामध्ये बायो मॅट्रिक या विषयात प्रश्नमंजुषा कार्यक्रमात प्रसाद गजानन तरेकर शिवनी रसूलापुर यांचा तिसरा क्रमांक आला. प्रसाद तरेकर हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथे एमबीबीएसच्या द्वितीय वर्षाला शिकत आहे. त्याचा अखिल भारतीय मेडिकल कॉलेज तर्फे सत्कार करण्यात आला.या यशाचे श्रेय तो मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ कांबळे व सर्व प्राध्यापक आई वडील व मित्रमंडळी यांना देतो.



### पिंपळखुटा येथे महिला दिन साजरा

कुऱ्हा-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळखुटा येथे जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. अध्यक्ष स्थान शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष प्रीती उके यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचे स्थान भाग्यश्री गव्हांडे यांनी भूषविले. या कार्यक्रमात अंगणवाडी मदतनीस तथा पालक सदस्य योगिता नाखले उपस्थित होत्या. या कार्यक्रमा ला मातापालक सदस्य राजश्री कानतोडे,अश्विनी उरकुडे,प्रिया मेश्राम,सुवर्णा महालगाये उपस्थित होत्या. संचालन व फलक लेखन अमृता शाम भोयर हिने केले व आभार प्रदर्शन वेदिका रामेश्वर शेंडे हिने केले. या कार्यक्रमात रांगोळी स्पर्धा, महिलांचे खेळ व स्पर्धा याचे आयोजन मोहिनी सुनील इंगोले हिने केले या कार्यक्रमात शाळेच्या शिक्षिका हर्षाली तरार यांनी महिला भगिनींना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. महिला दिनाच्यानिमित्याने कष्ट करून आपल्या मुलांना शिकवणाऱ्या महिला पुष्पा केवट यांचा शाळेचे मुख्याध्यापक भारत वानखडे आणि शिक्षिका तरार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाळेतील स्वयंपाकी ज्योर्ती इंगोले यांनी सुद्धा सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. अशाप्रकारे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

## अमरावती पोलीस आयुक्तालया अंतर्गत

# तीन नवीन पोलीस स्टेशनचा प्रस्ताव कधी मान्य होणार-आ.सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**
शहराचा विस्तार झपाट्याने होत चालला असून लोकवस्ती वाढत आहे. शहरातील गुन्हेगारीला आळा बसवण्यासह कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने शहरात सुरक्षात्मक उपाययोजना करून पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करणे महत्वाचे आहे. त्यानुषंगाने अमरावती शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत तपोवन,साई नगर व एमआयडीसी असे तीन नवीन पोलीस स्टेशन निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव कधी मान्य करणार ? असा प्रश्न आ.सुलभा खोडके यांनी विधानसभेमध्ये उपस्थित केला.

वर्ष २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करतांना आ.खोडके यांनी सांगितले की, अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या गाडगे नगर व नांदगांव पेठे पोलीस स्टेशनचे विभाजन करून नविन तपोवन पोलीस स्टेशन निर्माण करण्यात यावे. तसेच राजापेठ व बडनेरा पोलीस स्टेशनचे विभाजन करून नवीन साई नगर पोलीस स्टेशन व फ्रेजरपुरा व राजापेठ हद्दीतील वाढत्या लोकसंख्या लक्षात घेता कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने नवीन एमआयडीसी पोलीस स्टेशन निर्माण करण्यात यावे .अशी मागणी आमदार .सुलभा खोडके यांनी शासनाकडे वारंवार प्रत्येक अधिवेशनातून लावून धरली आहे. तसेच शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहती जुन्या व जीर्ण झाल्या असून पोलीस कर्मचाऱ्यांना नवीन क्वार्टर उभे करणे महत्वाचे आहे. त्यासाठी सुद्धा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे आ. खोडके यांनी चर्चेतून नमूद केले.

अमरावती शहरात वाढत्या एम.डी ड्रग्स तस्करीच्या कारवाई मध्ये बहुतांश धाडी या गुन्हे शाखेच्या वतीने घालण्यात आल्या आहे. त्यामुळे स्थानिक पोलीस स्टेशन व आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या कामगिरीबाबतही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याबाबत अशी माहिती मिळाली आहे की, त्याठिकाणी कार्यवाही करण्याचे अधिकार गुन्हे शाखेला दिलेले आहेत. संबाधित



घटनास्थळाच्या हद्दीतील एम.डी ड्रग्स तस्करीच्या कारवाई बाबत स्थानिक पोलीस स्टेशनला कारवाई करण्याचे अधिकार नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे अमरावती मधील कमिशनरेट रँकचे पोलीस अधिकारी सुद्धा हतबल झाले आहेत. अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी ड्रग्स तस्करीचे हब बनत चालले आहे. यावर लक्ष देण्यासाठी अधिकाधिक कार्यवाह्या करणे आवश्यक आहे. त्यामुळे गुन्हे शाखेबरोबरच संबंधित पोलीस स्टेशनद्वारा सुद्धा कारवाई वाढविण्याची गरज असल्याचे आ. खोडके यांनी अधिवेशनातून सांगितले.

अर्थसंकल्पिय अनुदानावर विधानसभेत आ. खोडके यांनी चर्चा करतांना अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मल निस्सारण व स्वच्छतेची प्रभावी व्यवस्था उभी करण्यासाठी भुयारी गटार योजना प्रभावीपणे राबविण्याची गरज असल्याचे सांगितले.

शहरी भुयारी गटार योजना गेल्या २८ वर्षांपासून निधी अभावी अर्धवटरित्या रखडलेली आहे. अमरावती महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता मनपा आपला स्वहिस्सा देऊ न शकत नसल्याने निधी अभावी अनेकदा भुयारी योजनेची कामे हाती घेणे शक्य नाही.

शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व पुढील तीन वर्षाचे भुयारी गटार योजनेचे नियोजन करायचे असल्याने अमरावती शहरात भुयारी गटार योजनाचे सुधारित प्रारूप कृती आराखडा हा २,५०० कोटींवर गेला आहे. अमरावती शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने योजना अत्यंत महत्वाकांक्षी असल्याने शासनाने याबाबत बैठक घेऊन योजनेच्या २,५०० कोटींच्या आराखड्यास मंजुरी देण्याची मागणी अधिवेशनातून केली आहे.

# सीटीईटी उत्तीर्ण शिक्षकांचा पदोन्नती सेवाजेष्ठता यादीत समावेश करण्याची मागणी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती करिता तयार करण्यात येत असलेल्या सेवा जेष्ठता यादीमध्ये सी टी ई टी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या शिक्षकांचा समावेश करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई-३२, जिल्हा शाखा अमरावती तर्फे करण्यात आली आहे.

यासंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित व जिल्हा सचिव किशोर मालोकार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद अमरावतीचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन सादर करण्यात आले. सध्या केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती करिता सेवाजेष्ठता यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान नुकत्याच पार पडलेल्या सी टी ई टी परीक्षेची उत्तरसूची प्रसिद्ध झाली असून अंतिम निकाल अंदाजे पंधरा दिवसांत जाहीर होण्याची शक्यता आहे.निकाल जाहीर होण्यापूर्वी सेवाजेष्ठता यादी निश्चित झाल्यास पात्र शिक्षकांवर अन्याय होऊ शकतो. त्यामुळे सी टी ई टी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या शिक्षकांचा देखील सेवाजेष्ठता यादीत समावेश करण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. यासंदर्भातील निवेदनाची प्रत जिल्हा परिषद अमरावतीचे



मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही देण्यात आली आहे.

# शिरजगाव कसबा रविवारी श्रीराम मुर्तीची प्राणप्रतिष्ठा

**चांदूरबाजार/वार्ताहर**
तालुक्यातील शिरजगांव कसबा येथील सटवाई पुर्यातील, श्रीराम मंदिर संस्थानला शंभर वर्षे पूर्ण झाले आहे. त्या अनुषंगाने श्रीराम मंदिर संस्थान व्दारे १९ मार्च ते २७ मार्च दरम्यान, मंदिराचा शतकोत्तर तपपूर्ती सोहळा साजरा करण्यात येत आहे. शतका नंतर सदर मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.या नूतन मंदिरात श्रीराम प्रभूंच्या नविन मुर्तीचा,प्राण प्रतिष्ठापणा सोहळा २१ मार्च ला सकाळी ८ ते १०.३० दरम्यान संपन्न होणार आहे.

सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ५ ते ६.३० दरम्यान काकड आरती होईल.तसेच सकाळी ९ ते १२ दरम्यान, श्रीराम चरित मानस या पवित्र ग्रंथाचे सामुहिक पारायण संपन्न होईल.तर दुपारी २ ते ५ दरम्यान, श्रीराम कथा निरूपण सोहळा संपन्न होणार आहे.या प्रसंगी कथा प्रवक्ता म्हणून रामायणाचार्य ह.भ.प.नंदकिशोर महाराज खरात , श्रीक्षेत्र नेवासे हे व्यासपीठावर विराजमान असतील.तसेच २० मार्च ते २६ मार्च दरम्यान,रोज रात्री ८ ते १० किर्तन सोहळा संपन्न होईल.२७ मार्च ला सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन होईल. या सोहळ्यात अनुक्रमे ह.भ.प.योगेश महाराज गोरे, ह .भ.प.शरदचंद्र महाराज बंड,ह.भ.प.श्रीराम महाराज गोसावी,ह.भ.प.कैलास महाराज येवले,ह.भ.प.संजय महाराज अलोणे, ह.भ.प.रविंद्र महाराज हरणे,ह.भ.प.नंदकिशोर महाराज खरात,ह.भ.प.शारंगधर महाराज गोळेगांवकर ही मंडळी आपली किर्तन सेवा देणार आहेत.अध्यात्मिक सोहळ्याचे विशेष धार्मिक कार्यक्रमा मध्ये १९ मार्चला, पहाटे ५.५३ गुढी उभारणी,९ ते १२ तिर्थस्थापना,मंडप स्थापना,देवता आवाहन सोहळा संपन्न होईल.तर दुपारी ४ वाजता श्रीराम प्रभूंच्या देव मुर्तीची, नगरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दिनांक २० मार्चला सकाळी ११.३० अग्नी स्थापना,वास्तू पूजन,जल यात्रा,जलाधिवास व देव स्थापना विधी संपन्न होईल.तर सायंकाळी ५ वाजता फलाधीवास व पुष्पाधीवास विधी संपन्न होणार आहे.

# नूतन मूकबधिर व स्पेशल स्कूलला महापौरांची भेट



**अमरावती-** मंदबुध्दी व शारीरिक अपंग विकास संस्था, इंदला फाटा, मार्डी रोड, अमरावती येथे नूतन मूकबधिर विद्यालय व विद्यापीठ स्पेशल स्कूलसाठी आयोजित कार्यक्रमाला अमरावती नगरीचे प्रथम नागरिक मा.महापौर श्रीचंद तेजवाणी तसेच राजु कुरील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या भेटीद्वारे संस्था व विद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रोत्साहन देण्यात आले. संस्था अध्यक्ष डॉ. संजय गुडधे यांनी मान्यवर पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी महामहीम राष्ट्रपतींच्या कार्यक्रमात द्विभाषिक म्हणून कार्य करणारे निरज तिवारी यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर मा. अमेय कुलकर्णी तसेच मोहोड उपस्थित होते. संस्थेचे कार्याध्यक्ष अजिंक्य गुडधे आणि सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.संचालन प्रतिभा दुधे यांनी केले, प्रास्ताविक मुख्याध्यापक जितेंद्र ढोले यांनी मांडले, तर आभार मुख्याध्यापक सचिन तामस्कर यांनी व्यक्त केले.या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास व प्रोत्साहन मिळाले असून, संस्था आणि शहरातील प्रशासन व नागरिक यांच्यातील सहकार्याची उर्जा अनुभवता आली. कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.संस्था व विद्यालयाच्या विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ही भेट एक प्रेरणादायी व ऐतिहासिक क्षण ठरली.

# कवी संमेलनातून शेताच्या बांधावर कृषी योजनेचा जागर ठरला प्रभावी

**अमरावती/का.प्र.**
हवामान बदलाच्या संकटाचा सामना करताना बळीराजा अधिक सक्षम व्हावा, शेती व्यवसाय किफायतशीर व शाश्वत व्हावा यासाठी शासनाच्या कृषी योजना थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अध्ययन समाचारच्या तपपूर्ती निमित्त ‘कवी संमेलनातून शेताच्या बांधावर कृषी योजनांचा जागर’ हा अभिनव कार्यक्रम १३ मार्च रोजी हनवतखेडा येथील शेतकरी देवानंद आमले यांच्या शेतात कृषी विभागाच्या सहभागातून आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अमरावती जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते म्हणाले की, शासनाचे धोरण शेतकरी हिताला बळ देणारे असून शेतकऱ्यांच्या समस्या समजून विविध कृषी योजना राबविण्यात येत आहेत. महाविस्तार एआय ॲपच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अध्ययन समाचारने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी प्रकल्प संचालक (आत्मा) अर्चना निस्ताने, उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल्ल सातव, तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षीरसागर, वऱ्हाडी कवी प्रा. विठ्ठल कुलट, विजय सोसे, राजा धर्माधिकारी, गौतम गुळधे, गजानन मते, अध्ययन समाचारचे संपादक जितेंद्र रोडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अतुल वाठ, अचलपूर खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष प्रभुदास ठाकरे



आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी कवी संमेलनाच्या माध्यमातून कृषी योजनांचा जागर करण्यात आला.प्रा. विठ्ठल कुलट यांनी कवितेतून सांगितले ‘कृषी विभागाच्या यांत्रिकीने गाव शेतीत क्रांती केली,ट्रॅक्टर, पाणी, बियाणे अनुदानाची पहाट उगवली,कृषीदूतांनो सेवा करा, अन्नदात्यांचा सन्मान करा.’राजा धर्माधिकारी यांनी भारूडातून संदेश दिला ‘आता शेती विकायची नाही, गोंधळून जायचे नाही,महाविस्तार एआय सांगतो, शेतीतून मार्ग काढायचा आहे.’विजय सोसे यांनी कविता सादर केली ‘कृषी यंत्राला मिळे अनुदान, कास्तकाराला पहिलाच मान,थांबू पाण्याची नासाडी, ठिबक-तुषाराची लागली नाडी. कृषी खात्याची गोठच न्यारी’गजानन मते यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा संदेश देत म्हटले ‘जुन्याबरोबर नवे तंत्रज्ञान, मातीतून उगवेल सोनं,कृषी खात्याच्या आधाराने, शेतकरी होईल सक्षम.

’गौतम गुळधे यांनी शेतकऱ्यांना आवाहन करत कविता सादर केली ‘शासनाकडे योजनांचा साठा, घ्या त्याचा योग्य फायदा,उत्पन्न वाढवा बळीराजा, कमी होईल तुमचा त्रास मोठा.’प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने म्हणाल्या की, शेताच्या बांधावर थेट संवाद साधत कवितेतून दिलेली माहिती अधिक प्रभावी ठरते.

यावेळी पी.एम. किसान व इतर योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

कृषी विद्यापीठाचे प्रा. पी.एच. महल्ले यांनी संत्रा फळबागाबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल्ल सातव यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती प्रोजेक्टरच्या माध्यमातून दिली, तर तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षीरसागर यांनी विविध अनुदान योजनांची माहिती दिली.याप्रसंगी शेताच्या बांधावर शिदोरी कार्यक्रमातून पंरपरागत खाद्य संस्कृतीची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र गोरले, अमोल चिमोटे, रविंद्र पाटील, सुधीर रहाटे, गोपाल लहाने, ज्ञानदेव पाटील, अमोल बोरेकर, अनिल पवार, भावेश अग्रवाल, कैलास आवारे, ख.वि.संघाचे संचालक विलास बोंडे, गजानन बानाईत, सरपंच विजय ढेपे, रूपेश ढेपे, तुषार खेरडे, राजकुमार महल्ले, निलेश वऱ्हेकर, जय हावरे, उद्योजक रविंद्र अग्रवाल, बाळासाहेब देशमुख, सुधीर देशमुख, किशोर गावंडे, ॲड. प्रशांत गाठे, कुलदीप बावरी, निलेश लोखंडे तसेच हनवतखेडा व पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन हरीष फुटनाईक आभार सुशांत इंगळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील ढेपे, देवानंद आमले तसेच अध्ययन समाचारचे प्रतिनिधी अरुण काकड, अनिल माथने, मोनू सुळे, किशोर वडतकर, अमित अडगोकर, प्रमोद गुल्हाने, शानू खान, हरिदास धोटे, आदींनी परिश्रम घेतले.


GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# शाळेतील अस्वच्छता शिक्षकांना भोवली

## नगराध्यक्ष अविनाश गायगोलेनी पगारवाढ रोखली

### -वर्ग खोल्यातून निघाला दिड ट्राली कचरा

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अविनाश गायगोले यांनी शहरातील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी कंबर कसली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून ९ मार्च रोजी त्यांनी शहरातील सर्वात जुनी शाळा असलेल्या 'किल्ला' शाळेला अचानक भेट दिली. यावेळी शाळेची दुरवस्था पाहून संतापलेल्या नगराध्यक्ष व सोबत असलेल्या नगर सेवकांनी स्वतः हातात झाडू






घेऊन संपूर्ण शाळा स्वच्छ केली, तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या सर्व शिक्षकांची एक पगारवाढ रोखण्याचे आदेश दिल्याने शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली आहे. अंजनगाव सुर्जी नगरपालीका ही ब वर्ग दर्जाची नगरपालीका असून शहरात वर्ग १ ली ते ४ च्या मराठी आणि उर्दु मिळून ९ प्राथमीक शाळा आहे. तर एक उर्दू आणि मराठी अशा दोन माध्यमीक शाळा आहेत.तर विना अनुदानीत तत्वावर चालनारे एक ज्युनीअर कॉलेज सुद्धा आहे.शहरातील न.प. शाळान मधून (पान २ वर)

# विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष पदासाठी गिरीश गांधी विजयी

**नागपूर/प्रतिनिधीः-** विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुका पार पडल्या असून आज अध्यक्षपदाच्या मतमोजणीचे निकाल जाहीर झाले आहे. त्यानुसार विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून गिरीश गांधी निर्वाचित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉ. गिरीश गांधी यांना एकूण २२६१ मते पडलीत. उर्वरित २२ कार्यकारणी सदस्य पदाचे निकाल उद्या रात्रीपर्यंत लागण्याची शक्यता आहे. त्यांचे फक्त ६०० मत मोजून झाले आहेत.

आज मतमोजणीला सकाळी साडेनऊ वाजता प्रारंभ



झाला. अध्यक्षपदासाठी उभे असलेले पाच उमेदवाराना मिळालेली मते खालील प्रमाणे.

गिरीश गांधी यांना एकूण २६६१ तर प्रदीप दाते यांना ११८७ तसेच डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना ७०१ तर डॉ. रवींद्र शोभने यांना २०५ आणि रंजन दारव्हेकर यांना ११४ मते पडली.

एकूण ६३ मतं अवैध ठरली आहेत. या निवडणुकीसाठी ४९३५ मतदारांनी आपला हक्क बजावला होता. गिरीश गांधी हे एकूण १४७४ मतांची आघाडी घेऊन विजयी झाले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी पारखी यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सदर मतमोजणी सुरू आहे. संपूर्ण मतमोजणी आणि उर्वरित सदस्यांचे निकाल उद्या रात्रीपर्यंत लागण्याची शक्यता आहे.

# नवीन वर्गखोल्यांचे बांधकामामुळे गुणवत्ता वाढीस हातभार लागेल- आ.सुलभा खोडके

## महापालिकेच्या ५ शाळांमध्ये भौतिक सुविधांच्या कामांचे भूमिपूजन थाटात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

गरीब व आर्थिक दुर्बल घटक तसेच सर्वसामान्य परिवारातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणायचे असेल तर आजच्या बदलत्या युगात महापालिकांच्या शाळांनी अद्यावत व आधुनिकतेची कास धरणे जरुरीचे आहे. परंतु महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता मनपा फंडातून महापालिकांच्या शाळांमध्ये भौतिक सुविधांची कामे करणे कठीण आहे. अशा परिस्थितीत जिल्हा नियोजन समिती मार्फत स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करून महानगरपालिकेच्या शाळांना निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला आहे. महापालिकेच्या



शाळांचा दर्जा सुधारण्यासह त्याठिकाणी चांगल्या शैक्षणिक सुविधा व भौतिक संसाधनाची पूर्तता करण्याला घेऊन आपले सर्वोतोपरी प्राधान्य राहणार असल्याचा विश्वास आ. सुलभा संजय खोडके यांनी व्यक्त केला. (पान २ वर)

# राष्ट्रीय लोक अदालतीत ७०९२ प्रकरणांचे यशस्वी निवारण

## २४,८९,४९४४६ रुपये तडजोडीच्या रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा व सत्र न्यायालयांच्या सहकार्याने १४ मार्च रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत एकूण ७०९२ प्रकरणांचे यशस्वी निवारण करण्यात आले. विविध प्रकारची प्रकरणे निकाली काढल्याने पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अमरावती जिल्ह्यातील लोक अदालतीत मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, दिवाणी व फौजदारी प्रकरणे, बँकांचे प्रलंबित प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, विवाह संबंधित दावे आणि इतर विविध प्रकरणांचा त्वरित निवारण करण्यात आले. संपूर्ण जिल्ह्यातील ५० मंडळांच्या माध्यमातून न्यायाधीश, अधिकारी आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश करून लोक अदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आणि अनेक प्रकरणांचा यशस्वी निकाल काढण्यात आला. या अदालतीत एकूण २४,४५५ दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामधून ३,८३५ प्रकरणे त्वरित निवारित झाली, तर १२,१६९ प्रलंबित प्रकरणांपैकी १,८१४ प्रकरणे निकालात येऊन एकूण ५,६४९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. सदर राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून एकूण २४ कोटी ८९ लाख ४९ हजार ४४६ रुपये तडजोडीच्या (पान २ वर)

### दर्यापूरात १६८ प्रकरणे निकाली

दर्यापूर येथे १४ मार्च २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोक न्यायालयात एकूण १६८ प्रकरणांचे यशस्वी निवारण झाले. यामध्ये ८७ प्रलंबित व ८१ दाखलपूर्व प्रकरणे त्वरित निकाली काढली. पॅनल प्रमुख जिल्हा न्यायाधीश सत्यवान डोके, दिवाणी न्यायाधीश महेश शिलार, आशिष जोशी, अजयप्रकाश यादव व एस. डी. कमलाकर उपस्थित होते. न्यायालयाचे अधीक्षक मोरे, सहायक अधीक्षक चतुर, नाझर विनोद गवई, कर्मचारी लोणारे व अभिजीत धांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. एका मोटार अपघात प्रकरणात वारसांना १ कोटी ५० लाख रुपयांची तडजोड करून नुकसानभरपाई दिली गेली.

# अल्पवयीन मुलीचा विवाह रोखला

## धामणगाव तालुक्यात बालविवाह प्रतिबंधक कारवाई

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** बालविवाह ही समाजातील गंभीर कुप्रथा असून कायद्याने त्यावर स्पष्ट बंदी घालण्यात आलेली आहे. तरीही काही ठिकाणी अशा घटना घडत असल्याचे समोर येत आहे. धामणगाव तालुक्यातील येरली मंगरूळदस्तगिर येथे एका अल्पवयीन बालिकेचा विवाह लावण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे उधळला गेला.



माहितीनुसार, १५ मार्च रोजी वरपक्षाकडील समाज मंदिरामध्ये विवाह होत असल्याची माहिती चाइल्ड हेल्पलाइन १०९८ वर प्राप्त झाली. संबंधित बालिका ही वर्धा जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे समोर आले. घटना समजताच अमरावती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले यांनी त्वरित संबंधित यंत्रणांना सूचना देऊन घटनास्थळी भेट देण्याचे आदेश दिले. अधिकारी घटनास्थळी पोहोचल्यावर परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. बालिकेच्या जन्मतारखेचा अधिकृत पुरावा उपलब्ध नसल्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्या. त्यावेळी वर्धा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कांबळी व चाइल्ड हेल्पलाइन समन्वयक आशिष मोडक यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून दिली गेली. सदर कागदपत्रांच्या आधारे (पान २ वर)

# परिचारिकेची १ लाख १८ हजारांची ऑनलाइन फसवणूक

## टेलिग्रामवर 'स्टार रेटिंग'चे आमिष

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरबसल्या टेलिग्राम ॲपवर 'स्टार रेटिंग' देऊन पैसे कमावण्याचे आमिष दाखवत अज्ञात सायबर भामट्यांनी चांदूर रेल्वे येथील एका नर्सची १ लाख १८ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुरुवातीला थोडी रक्कम परत देऊन विश्वास संपादन केल्यानंतर आरोपींनी विविध खात्यांमध्ये मोठी रक्कम ट्रान्सफर करून घेतली.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ही चांदूर रेल्वे येथील रहिवासी असून नर्सिंग स्टाफ म्हणून कार्यरत आहे. १० मार्च रोजी तिच्या टेलिग्राम ॲपवर एका अज्ञात आयडीवरून मेसेज आला. या मेसेजमध्ये घरबसल्या टेलिग्रामवर 'स्टार रेटिंग' देऊन पैसे मिळतील, असे आमिष दाखवण्यात आले.

सुरुवातीला पीडितेने दिलेले रेटिंगचे काम पूर्ण केल्यानंतर तिच्या खात्यात १५० रुपये जमा करण्यात आले. त्यानंतर आरोपींनी १ हजार रुपयांची गुंतवणूक केल्यास १ हजार ४३० रुपये परत मिळतील, असे सांगितले आणि ती रक्कमही खात्यात जमा केली. त्यामुळे पीडितेचा विश्वास बसला. यानंतर (पान २ वर)

# अवैध दारू विक्री करणारे तीन जण ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा हद्दीत गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध दारू विक्रीविरुद्ध विशेष मोहीम राबवली. या कारवाईत १४ मार्च रोजी पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले आणि अवैध दारू व संबंधित मुद्देमाल जप्त करून पुढील कारवाईसाठी फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन येथे दाखल केले.

पोलिसांनी आरोपी महेबूब सक्रू मांजरे ( वय ४५, रा. फ्रेजरपुरा) यांच्या ताब्यातून १० लिटर गावठी दारू (किंमत अंदाजे ३,००० रुपये) जप्त



केली, तसेच भुगनाबाई बाबुलाल रायलीवाले (वय ५८, रा. कुंभारवाडा, फ्रेजरपुरा) हिच्या ताब्यातून १० लिटर गावठी दारू (किंमत अंदाजे ३,००० रुपये) जप्त केली आणि सुनिल दत्तूपंत आठवले (पान २ वर)

# पिकनिकसाठी निघालेल्या कुटुंबांच्या ऑटोला अपघात

## लहान मुलांसह आठ जण जखमी

**सेलू/प्रतिनिधीः-** नागपूर येथील दोन कुटुंबीय पिकनिकसाठी निघाले असताना देवळी-पेंढरी परिसरातील घाट मार्गावर त्यांचा ऑटो उलटून अपघात झाला. या दुर्घटनेत लहान मुलांसह आठ जण जखमी झाले. ही घटना रविवारी दुपारी सुमारे १.३० वाजता घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या सुभाषनगर येथील सिन्हा व डोंगरे कुटुंबीय एमएच-४९ एस-४४३६ क्रमांकाच्या ऑटोने (पान २ वर)



# जंगलातील वणव्याशी दोन हात करताना वनपाल विजय सिंगनजुडे यांचा मृत्यू

**यवतमाळ :** जंगलातील वणव्याशी दोन हात करताना यवतमाळचे वनपाल विजय रामदास सिंगनजुडे (४७) यांचा मृत्यू झाला. या घटनेची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंगनजुडे यांना 'वन शहीद' संबोधून श्रद्धांजली अर्पण केली.

शनिवार, ७ मार्च रोजी दुपारी ३ च्या सुमारास हिवरी वनपरिक्षेत्रातील मनपूर नियतक्षेत्रात भीषण वणवा पेटला होता. कर्तव्यदक्ष वनपाल विजय सिंगनजुडे आपल्या पथकासह



तातडीने घटनास्थळी पोहोचले. मात्र, वाऱ्याचा वेग आणि कोरड्या पालापाचोळ्यामुळे आगीने अचानक रौद्र रूप धारण केले. आग विझवण्यासाठी आवश्यक असलेला 'ब्लोअर पंप' उपलब्ध नसल्याने, हातात असलेल्या (पान २ वर)

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भावूक संदेश

या घटनेनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्स' (ट्विटर) वर पोस्ट करून सिंगनजुडे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. या संदेशात ते म्हणाले, 'यवतमाळच्या हिवरी वनपरिक्षेत्रात लागलेली आग विझवण्याच्या धाडसी प्रयत्नात गंभीर जखमी झालेले वनपाल विजय सिंगनजुडे यांचे निधन झाले, ही अत्यंत दुःखद बातमी आहे. महाराष्ट्र सिंगनजुडे यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांचे बलिदान सदैव लक्षात ठेवेल. आपल्या जंगलांचे आणि नैसर्गिक संपदेचे रक्षण करताना जीवाची बाजी लावणारे ते खरे 'वन शहीद' आहेत. राज्य त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला सदैव कृतज्ञतेने स्मरणात ठेवेल.'

### वनशहिदाला अखेरचा निरोप-

दरम्यान, वन शहीद विजय सिंगनजुडे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, मुलगा, मुलगी आणि दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. वनसंपत्ती आणि वन्यजीवांचे रक्षण करताना बलिदान देणाऱ्या या वीर सुपुत्राचे पार्थिव शनिवारी सायंकाळी पुसद येथे आणण्यात आले. आज रविवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# चिखलदरा हद्दीत ५.५ किलो गांजा जप्त

## मध्यप्रदेशातील आरोपी अंमली पदार्थ प्रकरणात अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या गांजा बाळगणाऱ्या आरोपीविरुद्ध धडक कारवाई करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवारी गौलखेडा बाजार परिसरात छापा टाकत सुमारे ५ किलो ५५५ ग्रॅम गांजा जप्त केला. जप्त केलेल्या गांजाची किंमत अंदाजे ८३ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थाविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याच अंतर्गत, १४ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गस्त घेत असताना संशयित आरोपी मंगळजी नानकराम बारसकार (वय ५६, रा. पाटोळी, बैतूल, मध्यप्रदेश) याला ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान त्याच्याकडील पिशवीत गांजासदृश अंमली पदार्थ सापडल्याचे आढळले. पंचासमक्ष वजन केल्यानंतर ५.५ किलो गांजा जप्त करण्यात आला. या कारवाईनंतर आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला चिखलदरा पोलीसांच्या ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, तसेच धारणी उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली एपीआय अभय चौथनकर, पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, अंमलदार रविंद्र बावने, बळवंत दाभणे, भुषण पेटे, प्रज्वल राऊत, तसेच चिखलदरा ठाण्यातील पोलिस अंमलदार (पान २ वर)

# डीजे धुमाल वाहनाला मालवाहूची धडक

## १ ठार, १४ जखमी, वर्धा-आर्वी मार्गावर मध्यरात्री भीषण अपघात

**खरांगणा (मो.)/ प्रतिनिधीः-** वर्धा-आर्वी मार्गावरील खरांगणा (मो.) परिसरात मध्यरात्री भीषण अपघात होऊन एक जण ठार तर १४ जण जखमी झाले. समोरासमोर झालेल्या या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली.

ही घटना शनिवार-रविवारच्या मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास घाट मार्गावर घडली. मिलिंद उर्फ



मिलन अनिल एकापुरे (वय २५, रा. सुकळी-भादोड) असे मृताचे नाव आहे. तो एमएच-४० एन-२६३८ क्रमांकाच्या मालवाहू वाहनाने खरांगणाहून आर्वीकडे जात होता. त्याच वेळी एमएच-३१ एफसी-५६६६ क्रमांकाचे डीजे धुमाल बँड पार्टीचे वाहन आर्वी येथील विवाह सोहळा आटोपून वर्धाकडे परतत होते.

घाट मार्गावर दोन्ही वाहने समोरासमोर येताच जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की दोन्ही वाहने उलटली व चक्काचूर झाली. या दुर्घटनेत मालवाहू चालक मिलिंद एकापुरे याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा साथीदार मोहन उईके गंभीर जखमी झाला.

धुमाल बँडच्या वाहनातील चालक (पान २ वर)